CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

लातूर | बुधवार, १७ डिसेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २८७ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



निसर्गाप्रमाणे आपल्याकडेही सुखाची अभिलाषा आहे. परंतु, सुखाची आमची कल्पना आणि ते प्राप्त करण्याचे मार्ग भिन्न आहेत. सुख म्हणजे शारीरिक सुख नाही. सुख म्हणजे मन, शरीर, आत्मा, बद्धीचे सुख. ते निरंतर आणि शाश्वत असले पाहिजे. त्यालाच परम सुख किंवा मोक्ष म्हटले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपापल्या परीने त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**- दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# जिल्ह्यातील तब्बल दीड हजार महसूल कर्मचारी सामुहिक रजेवर

- निलंबित केलेल्यांना कामावर घेईपर्यंत आंदोलन
- कोरोना काळाप्रमाणे होता शुकशुकाट
- तहसीलदार संघटनांचाही आंदोलनात सहभाग







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**
नागपूर येथे पार पडलेल्या विधीमंडळाच्या अधिवेशनात महसूल मंत्र्यांनी अवैध गौण उपसाप्रकरणी ४ तहसीलदार, ४ मंडळ अधिकारी आणि २ तलाठ्यांना दोषी धरुन थेट निलंबित केले आहे. ही कारवाई चुकीची आणि कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्चीकरण करणारी आहे. याकडे लक्ष वेधत सोलापूरसह पुणे विभागातील महसूल कर्मचारी आज (दि.१६) सामुहिक रजा आंदोलन केले.

यात सोलापूर जिल्ह्यातील दीड हजार कर्मचाऱ्यांचा समावेश होता. कोरोना काळा प्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयात शुकशुकाट दिसून आला. थेट निलंबित करण्यात आलेल्या तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांना पुन्हा सन्मानपूर्वक कामावर घ्यावे. अनेक बिगर महसूली कामे महसूल कर्मचाऱ्यांना लावली जातात. अवैध गौण खनिजाची वाहतूक रोखण्यासाठी कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जात नाही. अनेकवेळा अवैध गौण खनिजाची वाहतुक करणाऱ्यांकडून हल्ले झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्या परिस्थितीतही महसूल कर्मचारी काम करतात. असे असताना चौकशी न करता थेट निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या आंदोलनात कोतवाल संघटना, महसूल सहाय्यक संघटना, तलाठी आणि तहसीलदार संघटनाही सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे महसूल विभागाचे कामकाज ठप्प झाले आहे. जोपर्यंत निलंबित कर्मचाऱ्यांना कामावर घेतले जाणार नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरुच राहणार असल्याचे सांगण्यात आले. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी पांडुरंग हिप्परकर, प्रकाश जगताप, गणेश फडतरे, संतोष सुरवसे, विजय जाधव, संदीप चव्हाण यांच्यासह इतर संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### डॉ. स्नेहल डोंगरदिवे पुरस्काराने सन्मानित



**अकोला** : भारतीय कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान संशोधन आणि नवोपक्रम या विषयावर आधारित बारावी आंतरराष्ट्रीय परिषद कृषी महाविद्यालय गोवा व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीच्या वतीने नुकतीच गोवा येथे संपन्न झाली. या परिषदेत कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डॉ. स्नेहल डोंगरदिवे (पांडागळे) यांनी सादर केलेल्या 'एकात्मिक कृषी सौर व पर्जन्य जल साठवणूक प्रणाली द्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात होणारी दुप्पट वाढ' या तंत्रज्ञानासाठी त्यांना 'यंग वुमन सायंटिस्ट' पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. स्नेहल या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभागात प्रकल्प सहायक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय दर्जाच्या विविध परिषदांमध्ये १५ पेक्षा अधिक संशोधन पेपर आणि पाच पुस्तके प्रकाशित केली आहे

# कर्जापायी शेतकऱ्याने विकली किडनी!

### एक लाखाचे कर्ज व्याजासह तब्बल ७४ लाखांवर गेले | सावकारांच्या व्याजवसुलीने रोशन कुडे हवालदिल | सहा जणांवर गुन्हा दाखल, दोघांना अटक

◆ **नागभीड/चंद्रपूर, १६ डिसेंबर**
मन हेलावून सोडणारी, माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना पुढे आली असून, एका शेतकऱ्याला कर्जफेडीसाठी चक्क किडनीच विकावी लागली! चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्याच्या मिंथुर गावातील गरीब शेतकरी रोशन कुडे यांच्यावर असलेल्या कर्जासाठी सावकारांकडून होणाऱ्या तगाद्यातून हा लाजीरवाणा प्रकार घडला! या प्रकरणी सावकारांसह सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यातील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.



शस्त्रक्रियेची खूण दाखवताना शेतकरी

या क्रूर प्रकाराने पुरोगामी महाराष्ट्र पुरता हादरला असून, एका बळीराजाची वेदना पाहून दगडालाही पाझर फुटेल, अशी ही घटना आहे. रोशन कुडे यांच्याकडे चार एकर शेती आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती कधी फायदेशीर ठरलीच नाही. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय करण्याचे त्यांनी ठरवले. दुग्ध व्यवसायातून थोडी मिळकत होईल म्हणून गायी खरेदी केल्या होत्या. त्यासाठी दोन सावकारांकडून ५०-५० हजार रुपये कर्ज घेतले होते. मात्र, नशिबाने धोका दिला. खरेदी केलेल्या गायी मरण पावल्या.

### ...तर मंत्रालयापुढे कुटुंबासह आत्मदहन

**एक लाख कर्ज घेतले होते. त्याचे आता ७४ लाख झाले. अजूनही कर्ज पूर्णपणे फिटलेले नाही. पैशासाठी तगादा सुरूच आहे. कर्जासाठी किडनी गेली. आता हाती काहीच उरले नाही. मंत्रालयापुढे संपूर्ण कुटुंबासह आत्मदहन करू का, असा प्रश्न रोशन कुडे यांनी उपस्थित केला.**

### तक्रारीनंतर केला बारकाईने तपास

हे प्रकरण २०२० ते २०२१-२२ चे आहे. माझ्याकडे आता तक्रार आली. पुराव्यांच्या तपासणीसाठी मी स्थानिक ठाणेदारांना निर्देश दिला आणि तक्रार वर्ग केली. अतिरिक्त पोलिस अधीक्षकांना चौकशी करायला लावली. शेतकऱ्यांना पैसे परत हवे होते, बाकी काही नको. सावकारांसह सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, दोन आरोपींना अटक केली आहे, अशी माहिती चंद्रपूर जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी 'तरुण भारत'शी बोलताना दिली.



# मंत्री माणिकराव कोकाटे यांची शिक्षा कायम

**सदनिका घोटाळा प्रकरण**
**मंत्रिपद जाण्याची शक्यता**

**नाशिक** : नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने मंगळवारी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका घोटाळ्यात ठोठावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली. लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार दोन वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झालेल्या मंत्र्यांचे मंत्रिपद जाते. त्यामुळे आता कोकाटेंचे मंत्रिपद काढून घेणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना मुख्यमंत्री कोट्यातून मिळालेल्या सदनिकांबाबत बनावट कागदपत्रे सादर करून त्या लाटल्याप्रकरणी नाशिक जिल्हा न्यायालयाने प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास व ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. या निकालानंतर अवघ्या दोन तासांत त्यांना जामीन मंजूर झाल्याने कोकाटे यांचे मंत्रिपद तत्काळ धोक्यात आले नव्हते.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

सोन्यासारखा आधार
टीजेएसबी सुवर्ण कर्जाची साथ



आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करा
व्याजदर
8.60%*
द.सा. पासून

www.tjsb.bank.in | ✆ : 022 - 48897222

# वनताराच्या विशेष भेटीदरम्यान अनंत अंबानीसह लिओनेल मेस्सी यांनी भारतीय पवित्र परंपरा आणि वन्यजीवांसोबत अविस्मरणीय क्षणांचा अनुभव घेतला



**जामनगर, भारत** – जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांनी, अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वन्यजीव बचाव, पुनर्वसन आणि संवर्धन केंद्र, वनताराला विशेष भेट दिली. या केंद्रात, सर्व उपक्रमांची सुरुवात सनातन धर्मानुसार आशीर्वाद घेऊन केली जाते, जो निसर्गाप्रति आदर आणि सर्व सजीवांप्रति सन्मानावर भर देतो. मेस्सींच्या भेटीमध्ये या सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब दिसले, कारण त्यांनी पारंपरिक हिंदू विधींमध्ये भाग घेतला, वन्यजीवांचे निरीक्षण केले आणि काळजीवाहू व संवर्धन संघांशी संवाद साधला. या भेटीदरम्यानच्या त्यांच्या कृतींमधून त्यांची नम्रता आणि मानवतावादी मूल्ये दिसून आली, ज्यासाठी ते जगभरात ओळखले जातात. तसेच, वन्यजीव संवर्धनाप्रति अनंत अंबानी यांच्या वचनबद्धतेमुळे त्यांच्यात असलेले उबदार नाते आणि मैत्री अधोरेखित झाली.

मेस्सी, त्यांचे इंटर मियामी संघाचे सहकारी लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डी पॉल यांच्यासोबत, यांचे भव्य पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी उत्साही लोकसंगीत, आशीर्वाद आणि शुद्धतेचे प्रतीक असलेल्या फुलांची उधळण आणि पारंपरिक आरती करण्यात आली. या फुटबॉल दिग्गजाने मंदिरातील महाआरतीमध्येही भाग घेतला, ज्यात अम्बे माता पूजा, गणेश पूजा, हनुमान पूजा आणि शिव अभिषेक यांचा समावेश होता. भारताच्या सर्व सजीवांप्रति आदराच्या शाश्वत मूल्यांनुसार, त्यांनी जागतिक शांतता आणि एकतेसाठी प्रार्थना केली.

स्वागत समारंभानंतर, मेस्सी यांनी वनताराच्या विशाल संवर्धन परिसंस्थेची मार्गदर्शित सफर केली, जिथे जगभरातील बचावलेले मोठे प्राणी, हत्ती, शाकाहारी प्राणी, सरपटणारे प्राणी आणि पाळीव लहान प्राण्यांचा अधिवास आहे. त्यांनी हरित ऊर्जा संकुल आणि जगातील सर्वांत मोठ्या रिफायनरी संकुलालाही भेट दिली. तेथे त्यांनी या कार्यामागील व्याप्ती आणि दूरदृष्टी पाहून आश्चर्य व्यक्त केले.

सिंह, बिबट्या, वाघ आणि इतर धोक्यात असलेल्या प्रजातींसाठी असलेल्या काळजी केंद्रात, मेस्सीने समृद्ध, नैसर्गिक वातावरणात वाढणाऱ्या प्राण्यांशी संवाद साधला, ज्यापैकी अनेक प्राणी उत्सुकतेने त्याच्याजवळ आले. त्यानंतर त्याने शाकाहारी प्राणी काळजी केंद्र आणि सरपटणारे प्राणी काळजी केंद्राला भेट दिली, जिथे त्याने विशेष पशुवैद्यकीय काळजी, सानुकूलित पोषण, वर्तणूक प्रशिक्षण आणि पशुपालन प्रोटोकॉल अंतर्गत वाढणाऱ्या प्राण्यांचे निरीक्षण केले, जे वन्यजीव कल्याणामधील वनताराचे जागतिक नेतृत्व दर्शवते. या भेटीदरम्यान, त्याने मल्टी-स्पेशालिटी वन्यजीव रुग्णालयालाही भेट दिली. तेथे त्याने प्रत्यक्ष क्लिनिकल आणि शस्त्रक्रिया प्रक्रिया पाहिल्या आणि नंतर ओकापी, गेंडे, जिराफ आणि हत्तींना खाऊ घातले. जागतिक दृष्टिकोनातून, त्याने देशातील वन्यजीव काळजी आणि संवर्धनाला चालना देण्यासाठी भारताच्या पंतप्रधानांच्या वचनबद्धतेची प्रशंसा केली.

अनाथ आणि असुरक्षित तरुण प्राण्यांसाठी असलेल्या पालक काळजी केंद्रात, मेस्सीने त्यांच्या लवचीकतेच्या प्रवासांबद्दल जाणून घेतले. एका हृदयस्पर्शी कृतीत, अनंत अंबानी आणि राधिका अंबानी यांनी मिळून एका सिंहाच्या पिल्लाचे नाव 'लिओनेल' ठेवले, हे नाव आता आशा आणि सातत्य दर्शवते, जे फुटबॉलच्या या महान खेळाडूच्या सन्मानार्थ देण्यात आले आहे.

या दौऱ्याचा सर्वांत महत्त्वाचा क्षण हत्ती काळजी केंद्रात आला. तेथे मेस्सी माणिकलालला भेटले. माणिकलाल हे एक बचावलेले हत्तीचे पिल्लू आहे, ज्याला दोन वर्षांपूर्वी त्याची आजारी आई प्रतिमासोबत लाकूडतोड उद्योगातील कठोर श्रमातून वाचवण्यात आले होते. केंद्रातील सर्वांची मने जिंकणाऱ्या एका क्षणी, मेस्सीने माणिकलालसोबत उत्स्फूर्तपणे फुटबॉल खेळण्याचा उपक्रम केला, ज्यामुळे खेळाची सार्वत्रिक भाषा दिसून आली. त्या पिल्लाने या उपक्रमाला उत्साहाने प्रतिसाद दिला आणि आपल्या उदयोन्मुख कौशल्यांचे प्रदर्शन करणाऱ्या खेळकर हालचाली केल्या, जो मेस्सीच्या भारत भेटीतील सर्वांत अविस्मरणीय क्षणांपैकी एक ठरला.

अनंत अंबानी यांनी वनताराला भेट दिल्याबद्दल आणि प्राणी व मानवजातीसाठी नि:स्वार्थपणे प्रेरणा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानल्यावर, मेस्सीने स्पॅनिश भाषेत उत्तर दिले, 'वनतारा जे काही करते ते खरोखरच सुंदर आहे, प्राण्यांसाठीचे काम, त्यांना मिळणारी काळजी, ज्या प्रकारे त्यांची सुटका केली जाते आणि त्यांची काळजी घेतली जाते. हे खरोखरच प्रभावी आहे. आम्ही खूप चांगला वेळ घालवला, संपूर्ण वेळ आम्हाला खूप आरामदायी वाटले आणि हा एक असा अनुभव आहे जो तुमच्यासोबत कायम राहतो. या अर्थपूर्ण कार्याला प्रेरणा देण्यासाठी आणि पाठिंबा देण्यासाठी आम्ही नक्कीच पुन्हा भेट देऊ.'







भेटीच्या समारोपावेळी, मेस्सीने नारळ उत्सर्ग आणि मटका फोड या पारंपरिक विधींमध्ये भाग घेतला, जे सदिच्छा आणि शुभ सुरुवातीचे प्रतीक आहेत. शांतता आणि कल्याणासाठीच्या मंत्रोच्चाराने समारंभाची सांगता झाली, ज्यामुळे वंताराचे ध्येय आणि मेस्सीचा जागतिक वारसा यांना जोडणारी सामायिक मूल्ये अधोरेखित झाली. जगभरातील सामाजिक कार्य, शिक्षण, आरोग्यसेवा आणि मुलांच्या कल्याणासाठी समर्पित असलेल्या 'लिओ मेस्सी फाऊंडेशन'चे नेतृत्व करणाऱ्या मेस्सीने, 'वनतारा'च्या उद्देशाशी आपली सखोल सहमती व्यक्त केली आणि प्राण्यांसाठीच्या दयाळू, विज्ञान-आधारित सेवेच्या दृष्टिकोनाबद्दल कौतुक दर्शवले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारताने युनोत पाकिस्तानला फाडले

## मुनीरने सत्तांतर करून माजी पंतप्रधानांना तुरुंगात डांबले

◆ **न्यू यॉर्क, १६ डिसेंबर**

भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये (युनो) पाकिस्तानच्या देशांतर्गत राजकीय परिस्थितीवर तीव्र हल्ला चढवला. सुरक्षा परिषदेत 'शांततेसाठी नेतृत्व' या विषयावरील खुल्या चर्चेदरम्यान भारताने पाकिस्तानवर लोकशाही कमकुवत करण्याचा, माजी पंतप्रधान इम्रान खान यांना तुरुंगात टाकण्याचा आणि लष्कराला असंवैधानिक अधिकार देण्याचा आरोप केला. भारताचा संदर्भ पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या सत्तेवरील नियंत्रणाकडे होता.

मुनीर यांनी भारतावर विजय मिळवण्याचा खोटा दावा करून पाकिस्तानमध्ये स्वतःसाठी आजीवन सुरक्षा हमी मिळवली आहे. शिवाय इम्रान खानवर होणाऱ्या अत्याचारांमागे मुनीरचाही हात आहे.

भारताचे संयुक्त राष्ट्रांमध्ये स्थायी प्रतिनिधी, राजदूत हरीश पर्वतानेनी यांनी पाकिस्तानच्या राजकीय व्यवस्थेवर निशाणा साधताना म्हटले, इस्लामाबादकडे आपल्या लोकांच्या इच्छेचा आदर करण्याची एक अनोखी पद्धत आहे. यामध्ये पंतप्रधानांना तुरुंगात टाकणे, सत्ताधारी राजकीय पक्षावर बंदी घालणे, २७ व्या घटनादुरुस्तीद्वारे आपल्या लष्कराला घटनात्मक बंड करण्याची परवानगी देणे आणि आपल्या संरक्षण दलांच्या प्रमुखांना आजीवन सर्वाधिकार देण्याचा समावेश आहे.

पाकिस्तान दहशतवादाचे केंद्र आहे, तो संयुक्त राष्ट्रांसारख्या व्यासपीठाचा वापर करून भारत आणि त्याच्या लोकांना हानी पोहोचवतो. ◂(वृत्तसंस्था)



### काश्मीरचा उल्लेख अनावश्यक

» जम्मू-काश्मीरबाबत पाकिस्तानचे दावेही भारताने स्पष्टपणे फेटाळून लावले. भारतीय प्रतिनिधीने म्हटले की, काश्मीरवरील पाकिस्तानचे भाष्य अनावश्यक आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाख हे भारताचे अविभाज्य भाग होते, आहेत आणि नेहमीच राहतील. जम्मू-काश्मीरचा अनावश्यक उल्लेख करणे ही भारताला हानी पोहोचवण्याची पाकिस्तानची धोकादायक विचारसरणी दर्शवते. ■

### पाकिस्तान दहशतवादाचे केंद्र

» राजदूतांनी पाकिस्तानला 'दहशतवादाचे केंद्र' संबोधत म्हटले की, तो संयुक्त राष्ट्रांसारख्या व्यासपीठाचा वापर भारत आणि त्याच्या नागरिकांना हानी पोहोचवण्यासाठी करीत आहे. मुळात पाकिस्तान एक अस्थायी सुरक्षा परिषदेचा सदस्य असूनही तो लोकांना विभाजित करणारा अजेंडा राबवत आहे. यामुळे तो आपल्या आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या पूर्ण करू शकत नाही. ■

### इम्रान खानच्या अटकेचा संदर्भ

» भारतीय राजदूतांनी १९० दशलक्ष युरो भ्रष्टाचार प्रकरणात शिक्षा भोगत असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या तुरुंगवासाचाही उल्लेख केला. याशिवाय ९ मे २०२३ रोजी झालेल्या हिंसक निदर्शनांच्या संदर्भात त्यांच्यावर दहशतवाद विरोधी कायद्याअंतर्गत खटला चालवला जात आहे. ■



भारत-यूएई १६ व्या संयुक्त आयोग आणि पाचव्या धोरणात्मक संवादादरम्यान परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचे मंगळवारी स्वागत करताना संयुक्त अरब अमिरातीचे उपपंतप्रधान अब्दुल्लाह बिन झायेद अल् नाहयान

# ट्रम्प यांचा बीबीसीविरोधात मानहानीचा खटला

## १० अब्ज डॉलर्सची मागितली नुकसान भरपाई

◆ **वॉशिंग्टन, १६ डिसेंबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी ब्रिटिश वृत्तवाहिनी बीबीसीविरोधात न्यू यॉर्क येथील एका न्यायालयात मानहानीचा खटला दाखल करीत १० अब्ज अमेरिकन डॉलर्सची नुकसानभरपाई मागितली आहे. वृत्तवाहिनीवर मानहानी केल्याचा, दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवल्याचा आरोप त्यांनी बीबीसीवर केला.

ट्रम्प यांनी दाखल केलेल्या ३३ पानांच्या याचिकेत म्हटले की, बीबीसीने त्यांच्या ६ जानेवारी २०२१ च्या दोन भाषणाचे वेगळे भाग एकत्र करून प्रसारित केले. त्यातून खोटी, दिशाभूल करणारी, आक्षेपार्ह, प्रक्षोभक, चिथावणीखोर माहिती प्रसारित करण्यात आली. २०२४ ची अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक प्रभावित करण्यासाठी या प्रसारणाचा वापर करण्यात आला. निवडणुकीत पराभव करण्यासाठी बीबीसीने विरोधकांशी हातमिळवणी करून बदनामीचा कट रचला. भरपाई म्हणून १० अब्ज डॉलर्सची मागणी ट्रम्प यांनी केली आहे.

ट्रम्प यांनी यापूर्वी बीबीसीला कायदेशीर कारवाईची धमकी दिली होती. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात बीबीसीने ट्रम्प यांच्या ६ जानेवारीच्या भाषणाशी छेडछाड केल्याबद्दल जाहीर माफी मागितली. मात्र, त्यावेळी बीबीसीने ट्रम्प यांचे मानहानीचे आरोप फेटाळले होते. विशेष म्हणजे, याप्रकरणात बीबीसीचे सर्वोच्च कार्यकारी अधिकारी व वृत्त विभागाच्या प्रमुखांनी राजीनामा दिला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# नौदलाची ताकद कैकपटीने वाढणार

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

स्वदेशी बनावटीचे हेलिकॉप्टर स्क्वाड्रन आयएनएस ३३५ ची दुसरी तुकडी बुधवारी १७ डिसेंबरला नौदलाच्या ताफ्यात येणार आहे.

गोव्यातील हंसा येथे नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. नौदलाचे आधुनिकीकरण आणि क्षमता वाढीच्या दिशेने या हेलिकॉप्टर महत्त्वाचे पाऊल ठरेल. हेलिकॉप्टर स्क्वाड्रन आयएनएस ३३५ च्या नौदलातील समावेशाने स्वदेशी विमान वाहतूक क्षमतेला मोठी चालना मिळणार असल्याचे नौदलाने निवेदनात म्हटले आहे. ही ६० हेलिकॉप्टर्सची दुसरी तुकडी आहे. यामुळे समुद्रात पाळत ठेवणे, पाणबुडीविरोधी युद्ध आणि समुद्रातील मोहिमांसाठी बळकटी मिळेल. यामुळे नौदलाची लढाऊ क्षमता कैकपटीने वाढणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# बासमतीवरून भारत-अमेरिकेत जुंपली

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिकेतील व्यापार संबंध तणावात आहेत. त्यातच अमेरिकेने भारतावर बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा गंभीर आरोप केला असून, भारताने या आरोपांना फेटाळून लावले आहे.

भारतीय सरकारने स्पष्टपणे सांगितले की, भारतातून अमेरिकेत निर्यात होणारा तांदूळ प्रीमियम दर्जाचा बासमती आहे, जो सामान्य बासमतीपेक्षा महाग असून, डम्पिंगच्या अर्थाने विकला जात नसतो. अमेरिकेने अद्याप याबाबत कोणतीही औपचारिक चौकशी न करता आरोप केला. डम्पिंगची प्रथमदर्शनी कोणतीही शक्यता दिसत नाही, असेही स्पष्ट केले.

भारतीय व्यापार सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, भारताच्या तांदळाच्या निर्यातीचे स्वरूप वेगळे असून, त्याला बाजारभावापेक्षा कमी किमतीत विक्री म्हणून वर्गीकृत करता येणार नाही. डम्पिंग म्हणजे उत्पादन त्याच्या सामान्य किमतीपेक्षा कमी किमतीत निर्यात करणे होय, परंतु बासमती तांदूळ त्याचा सुगंध, गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय मागणीमुळे नेहमीच उच्च भावाने विकला जातो. डोनाल्ड ट्रम्प यांनी शेतकऱ्यांसोबतच्या बैठकीदरम्यान भारतावर तांदळाचे डम्पिंग करण्याचा आरोप केला आणि भारतातून निर्यात होणाऱ्या तांदळावर अधिक शुल्क लादण्याचे संकेत दिले.

भारत जगातील सर्वांत मोठा तांदूळ निर्यात करणारा देश असून, दरवर्षी अनेक देशांना, विशेषतः अमेरिकेला मोठ्या प्रमाणात तांदूळ पाठवतो. भारताने अमेरिकेच्या आरोपावर स्पष्ट भूमिका घेतली आहे. सरकारने सांगितले की, आमच्या तांदळाचा बाजारभावच जास्त आहे, त्यामुळे तो स्वस्त का विकावा, असा प्रश्न निर्माण होतो. ◂(वृत्तसंस्था)



### यंदा २०.२ दशलक्ष मेट्रिक टन तांदळाची निर्यात

२०२४-२५ मध्ये भारताने एकूण २०.२ दशलक्ष मेट्रिक टन तांदळाची निर्यात केली असून, त्यापैकी सुमारे ३.३५ लाख टन तांदूळ अमेरिकेत निर्यात केला गेला, ज्यात सुमारे २,७४,००० टन बासमती तांदूळ होता. ■

# पंजाबमध्ये तीन शहरांना 'पवित्र शहरा'चा दर्जा

◆ **चंदीगड, १६ डिसेंबर**

पंजाब सरकारने राज्यातील तीन प्रमुख धार्मिक शहरांना 'पवित्र शहर' म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. अमृतसरमधील वॉल्ड सिटी, रूपनगरमधील श्री आनंदपूर साहिब नगर आणि भटिंडामधील तलवंडी साबो नगर (श्री दमदमा साहिब) या तीन शहरांना या अधिसूचनेत पवित्र शहराचा दर्जा दिला गेला आहे.

या निर्णयानंतर या शहरांमध्ये दारू, तंबाखू आणि मांसाच्या विक्री आणि सेवनावर कडक निर्बंध लागू केले जात आहेत. पंजाबच्या गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आलोक शेखर यांनी सांगितले की, राज्यपालांनी या तीन शहरांना पवित्र शहर म्हणून घोषित केले आहे. उत्पादन शुल्क विभागाला आदेश देण्यात आला की, या शहरांच्या महापालिकेच्या हद्दीतील सर्व मद्य आणि संबंधित उत्पादनांच्या विक्री आणि सेवनावर बंदी घालावी. दारूची दुकाने बंद करण्याबाबत किंवा स्थलांतराबाबत लवकरच अधिसूचना जारी केली जाणार आहे.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागालाही या निर्णयात महत्त्वाची भूमिका देण्यात आली असून, पवित्र शहरांमध्ये सिगारेट, तंबाखू आणि इतर मादकपदार्थांच्या विक्री आणि सेवनावर बंदीसाठी आवश्यक आदेश जारी करण्याची विनंती करण्यात आली आहे. पशुसंवर्धन विभागाला अमृतसर, श्री आनंदपूर साहिब आणि तलवंडी साबो येथील शहरांमध्ये मांस आणि संबंधित उत्पादनांच्या विक्री आणि सेवनावर बंदी घालण्याचा आदेश देण्यात आला आहे. या निर्णयाद्वारे धार्मिक भावनांचा आदर राखण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सरकारच्या म्हणण्यानुसार, हा निर्णय या तीन शहरांच्या धार्मिक महत्त्वाशी संबंधित आहे. अमृतसर शीख धर्माचे सर्वांत मोठे धार्मिक केंद्र आहे, तर श्री आनंदपूर साहिब आणि तलवंडी साबो हे देखील शीख इतिहास आणि श्रद्धेशी घट्ट जोडलेले आहेत. या शहरांचे पवित्रता आणि धार्मिक प्रतिष्ठा राखण्यासाठी हा निर्णय आवश्यक ठरला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# विधेयकांमधील हिंदी शब्द; गैर-हिंदी भाषिकांचा अपमान

## चिदम्बरम् यांचा आक्षेप

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

काँग्रेस नेते पी. चिदम्बरम् यांनी सरकारकडून संसदेत सादर होणाऱ्या विधेयकांच्या शीर्षकांमध्ये हिंदी शब्दांच्या वाढत्या वापरावर टीका केली आहे. ते म्हणाले की, हा बदल गैर-हिंदी भाषिकांचा अपमान आहे.



माजी केंद्रीय मंत्र्यांनी मनरेगाच्या नावावर 'विकसित भारत-रोजगार आणि उपजीविका मिशनसाठी हमी विधेयक, २०२५' यावर आपले मत मांडले. ते म्हणाले, हा बदल गैर-हिंदी भाषिकांचा आणि ज्या राज्यांची अधिकृत भाषा हिंदी व्यतिरिक्त दुसरी आहे, अशा राज्यांचा अपमान आहे. गैर-हिंदी भाषिक लोक अशी विधेयके/कायदे ओळखू शकत नाहीत, ज्यांची शीर्षके इंग्रजी अक्षरांमध्ये लिहिलेल्या हिंदी शब्दांमध्ये आहेत. ते त्यांचे उच्चारणही करू शकत नाहीत.

राज्यसभा सदस्य चिदम्बरम यांनी सरकारला प्रश्न विचारला की, आतापर्यंत अशी प्रथा होती की, बिलाचे शीर्षक इंग्रजी आवृत्तीत इंग्रजी शब्दांमध्ये आणि हिंदी आवृत्तीत हिंदी शब्दांमध्ये लिहिले जात असे. ७५ वर्षांच्या या प्रथेमध्ये कोणालाही अडचण आली नाही, तर सरकारने बदल का करावा? मागील सरकारांनी या आश्वासनाची पुनरावृत्ती केली आहे की, इंग्रजी एक सहयोगी अधिकृत भाषा राहील. मला भीती वाटते की हे आश्वासन मोडले जाईल. ◂(वृत्तसंस्था)

# नरसंहारासाठी भारत जबाबदार

## बांगलादेशातील बीएनपीच्या नेत्याने ओकली गरळ

◆ **ढाका, १६ डिसेंबर**

बांगलादेश मुक्तीवेळी १९७१ मध्ये झालेल्या नरसंहारासाठी पाकिस्तान नव्हे, तर भारत जबाबदार आहे. शेजारी देशाने अनेक बंगाली बुद्धिजीवींची हत्या केली, अशी गरळ बांगलादेश राष्ट्रवादी पक्ष अर्थात बीएनपीचा नेता अबू अल युसुफ खान टिपूने ओकली आहे.

बांगलादेशच्या विजय दिनानिमित्त सोमवारी जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'बीएनपी'चा सचिव टिपू म्हणाला, १९७१ मध्ये तत्कालीन पूर्व पाकिस्तानमध्ये बंगाली नागरिक आणि बुद्धिजीवींची सामूहिक हत्या करण्यात आली. हा देशाच्या इतिहासातील सर्वांत दुर्दैवी प्रसंग आहे. भारताच्या लष्कराने बंगाली नागरिकांची कत्तल घडवून आणली आणि याचा निषेध करण्याचा आजचा दिवस आहे.

आम्ही स्वबळावर स्वातंत्र्य मिळवले. यासाठी कुणाचीही मदत मिळाली नाही. बंगाली लोकांचे अतोनात हाल झाले आणि यासाठी भारतच जबाबदार आहे. आमच्यापासून खरा इतिहास लपविण्यात आला आणि तो दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. यासाठी अंतरिम सरकारकडे मागणी केली जाईल, असे तो म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)



### 'जेआयबी'च्या नेत्याचे समर्थन

» कार्यक्रमाला उपस्थिता जमात-ए-इस्लामी बांगलादेश अर्थात् जेआयबीचे नेते गुलाम पोरवार म्हणाले, टिपू यांनी सांगितलेल्या घटनाक्रमाशी आम्ही सहमत आहोत. भारतीय लष्कर आणि त्यांच्या गुप्तचर संस्थेने बंगाली बुद्धिजीवींच्या हत्येसाठी सुनियोजित कट रचला होता. भारतीय लष्कराने ८ डिसेंबरपर्यंत ढाका ताब्यात घेतल्याचा दावा खोटा आहे. दरम्यान, टिपू यांची टिप्पणी वैयक्तिक असून, त्याचा पक्षाशी संबंध नसल्याचे बीएनपी पक्षाने निवेदनात म्हटले आहे. ■

# उधमपूरमध्ये दोन दहशतवादी ठार

◆ **श्रीनगर, १६ डिसेंबर**

जम्मू-काश्मीरमधील उधमपूर येथील मजालता परिसरातील सोहन गावाजवळ सुरक्षा दलासोबत झडलेल्या चकमकीत सीमेवरून घुसखोरी करणारे दोन दहशतवादी ठार झाले. घनदाट जंगलात आणखी तीन दहशतवादी लपून असल्याची माहिती असून, सुरक्षा दलाची शोधमोहीम सुरूच आहे. या चकमकीत दोन जवान किरकोळ जखमी झाले.

सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, उधमपूरमधील मजालता परिसरातील जंगलात दहशतवादी असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर सोमवारपासून शोधमोहीम सुरू होती. मंगळवारी सकाळी चकमक झडली, यावेळी घटनास्थळावरून दोन दहशतवाद्यांचे मृतदेह आढळले, त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. जंगलात आणखी काही दहशतवादी लपलेले असून, सुरक्षा दलाकडून शोधमोहीम सुरू आहे.

चकमकीत दोन जवान जखमी झाले. त्यांच्यावर उधमपूर येथील लष्कराच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. दहशतवाद्यांच्या पळून जाण्याच्या सर्व संभाव्य मार्गांवर सुरक्षा दल तैनात आहे तसेच चकमकीनंतर लष्कराची अतिरिक्त कुमक पाठविण्यात आली. ठार झालेले दहशतवादी जैश-ए-मोहम्मदचे असल्याची प्राथमिक माहिती आहे.

दरम्यान, यापूर्वी १३ ऑक्टोबर रोजी कुपवाडा येथे १२ तास चाललेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले होते. भारत-पाकिस्तान सीमेवर कुंबकडीच्या जंगलात सुरक्षा दलाने मोहीम राबवली होती. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### लग्नात नंदीवरून प्रवेशाने प्राजक्तावर टीका

**पुणे** : मराठी अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड 'स्वराज्य रक्षक संभाजी' मालिकेमुळे घराघरात पोहोचली. या मालिकेत तिने शंभूराजांच्या पत्नीची भूमिका उत्कृष्ट बजावली होती आणि योगायोग म्हणजे प्रत्यक्ष जीवनातही तिच्या पतीचे नाव शंभुराज असे आहे. तिच्या लग्नाचीही बरीच चर्चा झाली. मात्र, लग्नातील तिचा आणि शंभुराजचा प्रवेश नंदीवरून झाला. या प्रकारावर काहींनी टीका केली. त्याला उत्तर देताना प्राजक्ता म्हणाली की, लग्नाच्या दिवशी वधू-वर हे फक्त स्त्री-पुरुष नसून लक्ष्मी-नारायणाचे स्वरूप असतात. याचा उल्लेख पुराणातही आहे. नंदीवरून केलेला आमचा प्रवेश शिव-पार्वती विवाहाच्या संकल्पनेशी आणि शिवगगणांशी निगडीत होता. मोठा आवाज करून डीजेवर नाच-गाण्याऐवजी काहीतरी अर्थपूर्ण आणि पारंपरिक करावे, अशी आमची इच्छा होती. शिवाय माझ्या पतीचे नाव शंभुराज असल्यामुळे ही संकल्पना नावाशीही जोडलेली होती. ■




### सनी देओलच्या 'बॉर्डर-२'चा टीझर प्रदर्शित

**मुंबई** : **अभिनेता** सनी देओल आणि कलाकारांची मोठी जत्रा असणाऱ्या 'बॉर्डर' चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. अखेर याचा टीझर समोर आला आहे. भारत-पाकिस्तान युद्धाच्या विजय दिनाचे औचित्य साधून मंगळवारी १६ डिसेंबरला हा टीझर प्रदर्शित करण्यात आला. सत्य घटनेवर आधारित असलेल्या 'बॉर्डर-२'मधून कारगिल युद्धाचा इतिहास दाखवण्यात येणार आहे. टीझरमध्ये सुरुवातीलाच भारत-पाक युद्धभूमीवरील चित्र दिसत आहे. लढाऊ विमाने आणि बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज येतो. नंतर सनी देओलच्या आवाजातील संवाद ऐकून वीर रस आणि देशभक्तीची भावना जागृत होते. टीझरमध्ये आहान शेट्टी, वरुण धवन, दिलजीत दोसांझ आणि सनी देओल शत्रूशी भिडताना दिसत आहेत. येत्या २३ जानेवारीला 'बॉर्डर-२' सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. ■

### जयदीप अहलावत फिल्मफेअर ओटीटीचा सर्वोत्कृष्ट अभिनेता

**मुंबई** : ओटीटी प्लॅटफॉर्मवरील उत्कृष्ट कलाकृतींचा गौरव करणाऱ्या फिल्मफेअर ओटीटी पुरस्कारांची नुकतीच घोषणा करण्यात आली. या सोहळ्यात जयदीप अहलावत हा सर्वोत्कृष्ट अभिनेता ठरला. 'पाताल लोक सीझन-२'साठी त्याला हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार अनन्या पांडे हिला 'कॉल बी बे'साठी मिळाला. 'ब्लॅक वारंट' ही या वर्षातील सर्वोत्तम सीरिज ठरली तर, दिग्दर्शकाचा मान विक्रमादित्य मोटवाने आणि सत्यांशूसिंह यांनी पटकावला. समीक्षकांच्या मते, 'पाताल लोक-२' ही सर्वोत्कृष्ट मालिका ठरली. आजकाल अनेक चित्रपट थेट ओटीटीवर प्रदर्शित होतात. त्या श्रेणीत सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार अभिषेक बॅनर्जीला तर, अभिनेत्रीचा पुरस्कार सान्या मल्होत्राला मिळाला. ■



# शूर जवानांचे शौर्य देशवासीयांसाठी प्रेरणादायी

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

शूर जवानांच्या धाडसाने आणि बलिदानाने १९७१ मधील युद्धात भारताचा ऐतिहासिक विजय झाला. निःस्वार्थ सेवेने राष्ट्राचे रक्षण करणारे शूर सैनिक देशवासीयांसाठी प्रेरणादायी असून, प्रत्येक नागरिक त्यांचा आजीवन ऋणी असेल, अशा शब्दांत विजय दिनानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी हुतात्म्यांना श्रद्धांजली दिली.

नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये मोदी यांनी म्हटले की, १९७१ च्या युद्धात सहभागी झालेल्या सशस्त्र दलाच्या जवानांचे स्मरण करण्याचा आजचा दिवस आहे. या युद्धात देशासाठी हुतात्मा झालेल्या शूर सैनिकांचा देश नेहमीच ऋणी असेल. जवानांनी प्राणाची आहुती देऊन दृढनिश्चयाने आणि निःस्वार्थ सेवेने आपल्या देशाचे रक्षण केले तसेच इतिहासात अभिमानाचा क्षण घडवला. हा दिवस त्यांच्या शौर्याला सलाम करण्याचा आहे. त्यांचे शौर्य नवी पीढीला प्रेरणा देत राहील. ◂(वृत्तसंस्था)

## पंतप्रधान मोदींची १९७१ च्या युद्धातील वीरांना श्रद्धांजली



विजय दिनानिमित्त संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी मंगळवारी हुतात्मा जवानांना आदरांजली अर्पण केली. यावेळी सीडीएस जनरल अनिल चव्हाण, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, वायुदलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग आणि नौदल उपप्रमुख संजय वत्सयान उपस्थित होते

### राजनाथसिंह यांची राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट

» ५४ वा विजय दिन राजधानीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकावर साजरा करण्यात आला. यावेळी संरक्षणमंत्री राजनाथसिंह, सीडीएस प्रमुख जनरल अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, वायुदलप्रमुख अमरप्रीत सिंग यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांनी हुतात्म्यांना मौन बाळगून श्रद्धांजली दिली. ■

# सागरी उत्पादन निर्यातीत २० टक्के वाढ

◆ **नवी दिल्ली, १६ डिसेंबर**

विविध देशांनी भारतावर अँटी-डम्पिंग शुल्क लादले असतानाही मागील काही महिन्यांत सागरी उत्पादनांच्या निर्यातीत २० टक्के वाढ झाली आहे, अशी माहिती मंगळवारी लोकसभेत देण्यात आली. मत्स्य निर्यात वाढावी यासाठी सरकार केंद्रित प्रयत्न करीत आहे, असे एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल म्हणाले.

मागील १२ महिन्यांत २७ देशांच्या युरोपियन युनियनमध्ये १०२ मत्स्य निर्यात आस्थापनांची नोंदणी झाली आहे. त्याचप्रमाणे रशियामध्ये अशा २५ आस्थापनांची नोंदणी आणि मंजुरी मिळाली आहे. मत्स्य निर्यात आस्थापनांना मोठ्या प्रमाणात विदेशात नोंदणी आणि मंजुरी मिळेल, तशी सागरी निर्यातीत वाढ होईल, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# सुरत-चेन्नई ग्रीनफिल्डच्या २५ टक्के बाधितांचा ‘मावेजा’ थकला

**काही ठिकाणी महामार्गाचे काम ठप्प; बळीराजाचे नुकसान**

**आजतागायत ४31 कोटी वाटप; १४७ कोटी पेंडिंग**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

देशातील ६ राज्यांना जोडणारा सुरत-चेन्नई ग्रीनफील्ड एक्सप्रेसवे उभारला जाणार असून सोलापूरच्या आर्थिक, औद्योगिक आणि वाहतूक विकासाला नवे बळ देणारा ठरणारा आहे. या मार्गात ज्यांच्या जमिनी गेल्या अशा तब्बल २५.४४ टक्के बाधितांना अद्याप पैसेच मिळाले नसल्याने काही भागात या महामार्गाचे काम थांबले आहे. यामुळे बळीराजाही गेल्या वर्षांपासून विनाकारण अडकला असल्याची खंत काही बाधितांनी व्यक्त केली. दरम्यान, भूसंपादित ७५ टक्के बाधितांना ४३१ कोटी वाटप केले असून, उर्वरित बाधितांना लवकर मावेजा मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी सुरु झाल्या आहेत.



या महामार्गात सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर या तालुक्यातील जवळपास ७२८.२४०९ हेक्टर जमीन भूसंपादित झाली आहे. यासाठी ५७८.५० कोटी निधी मंजूर झाला आहे. यातील ११५० मंजूर प्रकरणांसाठी ४३१.३६ कोटी निधी प्राप्त झाला आणि संपूर्ण निधी वाटप करण्यात आली, अशी माहिती सोलापूर येथील भूसंपादन कार्यालयकडून मिळाली. १६७.६० हेक्टर क्षेत्रासाठी १४७.१४ कोटी रक्कम वाटपाची राहिली आहे. मात्र शासनाकडूनच निधी प्राप्त होत नसल्याने अधिकाऱ्यांचाही नाईलाज होत असल्याचे दिसून येत आहे.

### मावेजा तर नाही; कामही थांबले

गेल्या दीड वर्षांपासून शेतकऱ्यांची जमीन भूसंपादन झाली. या जमिनीचा मावेजाही मिळत नाही आणि कामही थांबले. शासनाच्या संबंधित विभागाने शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करुन थकीत मावेजाचा प्रश्न लवकर मार्गी लावावा, अशी मागणी काही शेतकऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना केली.

### मार्गाचा सर्वच क्षेत्रातील नागरिकांना मोठा फायदा

या महामार्गामुळे भविष्यात तिरुपती, रामेश्वरम् या तीर्थक्षेत्रासह माल वाहतुकीसाठी चेन्नई तामिळनाडूकडून गुजरातकडे (बडोदा, अहमदाबाद, सौराष्ट्र) जाणाऱ्या वाहतुकीला मोठा लाभ होणार आहे. या एक्सप्रेसवेच्या माध्यमातून सोलापूर ते नाशिक हे अंतर अवघ्या चार तासांत पूर्ण करता येणार आहे. या महामार्गामुळे भविष्यात जिल्ह्यातील शेतमाल, औद्योगिक उत्पादने आणि व्यापारी वस्तू देशातील दक्षिण व पश्चिम भागात जलद पोहोचवता येणार आहेत. एकंदरीत, सर्वच क्षेत्रातील नागरिकांना या रस्त्याचा मोठा फायदा होणार आहे.

### शासनाकडून हालचाल नाही; बाधितांची संभ्रमावस्था

गेल्या वर्षापासून भूसंपादित केलेल्या जमिनीचा बाधित शेतकऱ्यांना मावेजा मिळण्यासाठी सतत शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. उपोषण, आंदोलनाचा ते मार्ग स्विकारीत आहेत. या शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करून ठेवल्याने त्यांच्या स्वत:च्या जमिनीचा त्यांना कसलाच व्यवहारही करता येत नाही. काही भागात महामार्ग अधिकाऱ्यांनी कामही थांबविले आहे. त्यामुळे या बाधितांची संभ्रमावस्था होत आहे.

# पर्यावरणाचा प्रचार व प्रसारासाठी दै. ‘तरुण भारत’ येथे २८ झाडांचे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

सोलापूर शहर, जिल्ह्यातील प्रदूषण कमी होण्याच्या दृष्टीने व पर्यावरणाचा प्रचार व प्रसारासाठी मंगळवार १६ डिसेंबर रोजी दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालयाच्या आवारात सोळा फूट उंचीची झाडे, ट्री ग्रँडसहित कदंब, बकुळ, बूच, कन्हेरी आदी २८ वेगवेगळ्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण तज्ज्ञ दिलीप कुलकर्णी, पौर्णिमा कुलकर्णी-वैद्य आणि दैनिक सोलापूर तरुण भारतचे समूह संपादक दिलीप पेठे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



पर्यावरण तज्ज्ञ दिलीप कुलकर्णी म्हणाले, वृत्तपत्र कार्यालयामध्ये झाडे लावल्याने याचा सामाजिक संदेश व जनजागृती मोठ्या प्रमाणात होईल, हा प्रमुख उद्देश ठेवून आम्ही वृक्ष लागवड केली. दैनिक तरुण भारतने ही वृक्ष लागवड करण्याची आम्हाला संधी दिली त्याबद्दल आभार. येणाऱ्या काळात १४ कुंड्या रोपसहित देण्यात येणार आहे.

दैनिक सोलापूर तरुण भारतचे समूह संपादक दिलीप पेठे यांच्या हस्ते पर्यावरण तज्ज्ञ दिलीप कुलकर्णी यांना ‘राष्ट्रयज्ञ के सौ वर्ष’ हे पुस्तक भेट देवून सत्कार करण्यात आला. याकामी अविनाश बेंजरपे, यशवंत पाथरुड, माझी वसुंधरा अभियानाचे पर्यावरण अधिकारी स्वप्निल सोलनकर यांचे सहकार्य लाभले. रुद्रप्पा बिराजदार यांनी गांडूळ खत व शेणखत उपलब्ध करून दिले. याप्रसंगी दै.तरुण भारतचे व्यवस्थापक विनायक पुला, अजित कोठारी, उद्योजक महादेव मोघे, सुहास देशपांडे, प्रशांत स्वामी, परशुराम लामतुरे, काशीनाथ गायकवाड, प्रशांत काळे, परशुराम वाघमारे, प्रवीण तळे, दत्ता वाघमारे, वैभव म्हेत्रे, मदन गोयदने, बसवराज सराटे, शरणप्पा शाबादे आदी उपस्थित होते.

# सेफ्टी फॅन ड्रोनने वेधले लक्ष; अद्ययावत विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी रममाण

**विद्यार्थ्यांनी तयार केली अपघात टाळणारी नवी यंत्रणा**

**प्रात्यक्षिक बघण्यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांची गर्दी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

कै. वि.गु.शिवदारे जन्मशताब्दी समारोह समिती आणि मराठी विज्ञान परिषद सोलापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या विज्ञान प्रदर्शनात बदलती जीवनशैली, पालकांचा मुलांशी तुटलेला संवाद, तरुण पिढीला आलेले एकाकीपण, नैराश्य, मानसिक ताणतणाव, जीवघेण्या स्पर्धा, प्रेम प्रकरण, अनैतिक संबंध, कुटुंबातील वाद-विवाद यांसह विविध कारणांमुळे आत्महत्या करणाऱ्या तरुण-तरुणींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे सर्वाधिक लोक घरातील फॅनला ओढणीने, साडीने गळफास घेऊन आत्महत्या करतात. याच वाढलेल्या आत्महत्या रोखण्यासाठी ऑर्किड इंजिनिअरींगच्या मुलांनी सेफ्टी फॅन बनविला. या आगळ्या वेगळ्या यंत्रे व यंत्रणा असणाऱ्या उपकरणांनी सर्वांचे लक्ष वेधले.



### ४० शाळा.. १३७ उपकरणे अन् ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

विज्ञान प्रदर्शनामध्ये पाच गटांमध्ये ४० शाळांमधून १३७ उपकरणे व ३०० विद्यार्थी सहभागी आहेत. ज्येष्ठांना चालणे व बसण्यासाठी दुहेरी उपयोग असणारी स्टिक अँड शेअर मॉडेलचे प्रदर्शन यावेळी दाखवण्यात आले. छतावरील सोलर यंत्रणा पॅनेल, स्वच्छ करणारी ड्रोनयंत्रणा, रेसरकार, चार ते पाच तासांच्या चार्जिंगमध्ये ६० किलोमीटर जाणारी ई-बायसिकल, अपघात टाळणारी यंत्रणा अशा नावीन्यपूर्ण उपकरणांचाही सहभाग यात आहे.

**- व्यंकटेश गंभीर, ज्येष्ठ वैज्ञानिक**

यात शालेय व इंजीनियरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ड्रोनद्वारे पिकांवर औषध फवारणी, आधुनिक कांदा साठवण यंत्रणा, डोंगराळ भागातील शेती, पाणी व्यवस्थापन, शेतकऱ्यांच्या मोबाइलमध्ये इंटरनेटद्वारे आधी मिळणारे पूर सूचक मेसेज अशा दैनंदिन जीवनात सहजपणे वापरता येणारी यंत्रे व यंत्रणा असणाऱ्या उपकरणांचा समावेश प्रदर्शनामध्ये आहे.

# गड्डा यात्रेच्या अनुषंगाने सोलापूर महापालिकेची निवडणूक पुढे ढकलावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील महानगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मात्र, सोलापूर शहरात १३, १४, १५ तारखेला सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरची जत्रा मोठ्या प्रमाणात साजरी होत असते. नेमकं याचकाळात मतदान असल्याने मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सोलापूर महापालिकेची निवडणूक दोन दिवसांनी पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी छत्रपती ब्रिगेडने राज्य निवडणूक आयोग आणि सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली.



सोलापूरसह राज्यभरातील विविध महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी करण्यात येणार असल्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केले. परंतु दरवर्षी १३ ते १५ जानेवारी या कालावधीत सोलापूर येथे श्री सिध्देश्वर यात्रा भरविली जाते. सोलापूरकरच नव्हे तर महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा आदी राज्यातील भाविकांच्या दृष्टीने ही जत्रा श्रध्दा, परंपरा आणि आस्थेचे प्रतिक मानले जाते.

जत्रा चालू असल्यामुळे अनेक नागरिक जत्रा व्यवस्थेत व्यस्त असतात. यामुळे मतदानाचा टक्का खूप कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकशाही मजबूत होण्यासाठी जनतेच्या भावनांचा आदर आवश्यक आहे. सण, जत्रा आणि धार्मिक परंपरांचा आदर राखला गेला नाही तर हा सहभाग कमी होऊ शकतो. तरी प्रशासन व निवडणूक आयोगाने लोकभावनेचा फेरविचार करून सोलापूर महानगरपालिका मतदानाची तारीख पुढे ढकलावी, असेही या निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, मुख्य निवडणूक आयोगाने छत्रपती ब्रिगेडच्या ईमेलची दखल घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अहवाल मागितला आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी छत्रपती ब्रिगेडच्या शिष्टमंडळांना सांगितले.

यावेळी छत्रपती ब्रिगेडचे संस्थापक शाम कदम, जिल्हाध्यक्ष अरविंद शेळके, मुख्य समन्वयक अॅड.विकास तीरेकर, जिल्हा कार्याध्यक्ष मनीषा कोळी, शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर, संपर्कप्रमुख इस्माईल मकानदार, सतीश आलेगाव, गणेश माने आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### मनपा निवडणुकीसाठी उत्तरा बरडे यांच्या नावाची घोषणा

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ७ मधून शिवसेनेचे नेते पुरुषोत्तम बरडे यांची कन्या उत्तरा बरडे-बचुटे यांच्या नावाची घोषणा मंगळवारी झालेल्या बरडे समर्थकांच्या बैठकीत करण्यात आली. शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हांडे प्लॉट येथे झालेल्या या बैठकीप्रसंगी केलेल्या भाषणात पुरुषोत्तम बरडे यांनी कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार हे मात्र गुलदस्त्यात ठेवले. या बैठकीत प्रसंगी प्रारंभी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर शिवसेनेचे ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम बरडे, उत्तरा बरडे - बचुटे, स्वाती रुपनर, वैशाली सातपुते, अर्चना बरडे, लहू गायकवाड, बबलू चौगुले, रणजीत काशीद, दिनकर जगदाळे, सुरेश जगताप, महादेव सलगर, आशुतोष बरडे उपस्थित होते. सूत्रसंचालन नितीन रूपनर यांनी तर आभार समर्थ बरडे यांनी मानले.

**पुरुषोत्तम बरडे यांचा पक्षाचा निर्णय मात्र गुलदस्त्यात**

पुरुषोत्तम बरडे म्हणाले, गेल्या ३८ वर्षांपासून शिवसेनेच्या विस्तारासाठी विकासासाठी मी अहोरात्र काम केले आहे. अनेक निवडणुकांमध्ये आपला निसटता पराभव झाला आहे. प्रभाग क्रमांक ७ मधून यंदा मात्र विजय आपलाच आहे. प्रभाग क्रमांक सातमध्ये विकासाची कामे करण्यासाठी तरुणांना रोजगार देण्यासाठी तसेच व्यसनमुक्त तरुण घडविण्यासाठी उत्तरा बरडे-बचुटे यांच्या पाठीशी मी ठामपणे उभा आहे, असे आश्वासनही पुरुषोत्तम बरडे यांनी याप्रसंगी दिले. आजवर अनेक निवडणूकीत गड आला पण सिंह गेला अशी अवस्था झाली. परंतु यंदा गडही येणार आणि सिंहीण देखील येणार.

#### राजकारण हा बुद्धिबळाचा खेळ

राजकारण हा बुद्धिबळाचा खेळ आहे. या खेळात काही चाली राखीव ठेवाव्या लागतात. माझ्यावर विश्वास ठेवा. उमेदवार आणि नगरसेवक आपला असेल. १६ जानेवारी रोजी फटाके जुना पुणे नाका येथील पावन गणपतीसमोरच फुटतील असे सांगत बरडे यांनी विरोधकांना आव्हान दिले आहे.



### ‘नूमवि’च्या प्रांगणात स्नेहसंमेलन जल्लोषात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**

नू.म.वि.मराठी शाळेच्या प्रांगणात वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात पार पडले. प्रारंभी मयुरेश डंके यांच्या हस्ते शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर, कार्याध्यक्ष शिवा जाधव आदींच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी प्रास्ताविक केले. सुवर्णा आळसंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अभिलाषा म्हेत्रे यांनी बक्षिसांचे यादी वाचन केले. इयत्ता १ ली ते ४ थीच्या आदर्श विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थी प्रतिनिधी सुशील सातपुते, वैष्णवी मलपे यांचा सत्कार करण्यात आला.

संमेलनात सहभागी विद्यार्थ्यांनी निसर्ग गीते, भारतीय सण आणि उत्सव, विविध लोकनृत्य, सामाजिक संदेश देणारे गीते, विविध नात्यांचे महत्त्व सांगणाऱ्या गीतावर बहारदार नृत्य सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. नर्मदा कनकी यांनी सूत्रसंचालन केले. नागनाथ लंगोटे यांनी आभार मानले.



सोलापूर : महानगरपालिकेच्या निवडणुकांची घोषणा होताच आचारसंहिता लागल्यानंतर पालिकेतील कर्मचारी कार्यालयात स्वच्छता करत आहेत. मंगळवारी सकाळी टिपलेले छायाचित्र.

# ऊस दरवाढ आंदोलनाची धग कायम !

**पहिली उचल 3000 देण्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटना ठाम**

**तिसऱ्या दिवशीही बैठकीत तोडगा न निघाल्याने व्यवहार ठप्प**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर -**

बीबीदारफळ येथे लोकमंगल साखर कारखान्याने उसाला प्रतीटन ३००० ते ३,४०० रुपये दर द्यावा या मागणीसाठी रविवारी (दि.१४) शेतकरी संघटनेने सुरू केलेले आंदोलन तिसऱ्या दिवशी रात्री उशिरा पर्यंत सुरूच होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत, कारखान्याच्या गव्हाणीत ठिय्या मांडून गव्हाण बंद पाडण्यात आली.कारखाना प्रशासनाकडून दोन दिवस वेळ द्या, अशी विनंती करण्यात आली होती. दोन दिवस उलटून गेले तरीही कारखाना प्रशासन मात्र तोडजोडीच्या भूमिकेत येत नसल्याने शेतकऱ्यांनी आंदोलन तिसऱ्या दिवशीही कायम ठेवले. ‘‘ऊस आमाच्या हक्काचा.. नाही कुणाच्या बापाचा ’’ कोण म्हणत देत नाही घेतल्याशिवाय राहत नाही..अशा विविध घोषणा देत कारखाना परिसर दणाणून सोडला.



दरम्यान, मंगळवारी कारखान्याचे मालक सतीश देशमुख यांनी दुपारच्या बैठकीत शेतकऱ्यांसमोर शेवटी २८०० इतकी पहिली उचल देण्याचा प्रस्ताव ठेवला. मात्र शेतकरी संघटना ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. उसाला किमान ३४०० रुपये दर जाहीर केल्याशिवाय उठणार नाही, अशी ठाम भूमिका घेत आंदोलन सुरूच ठेवले. किमान ३००० ते ३४०० रुपये दर देण्याबाबत अगोदरच निवेदन दिले. त्या वेळेस का निर्णय घेतला नाही, असा सवाल शेतकऱ्यांनी केला. मंगळवारी रात्री उशिरापर्यंत दराबाबत तोडगा निघाला नव्हता.

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे म्हणाले की, उसाला तीन हजार चारशे रुपये दिल्याशिवाय कारखाना चालू देणार नाही. यामुळे आम्ही गव्हाणीत आंदोलन सुरू केले आहे. प्रशासनाने लवकरात लवकर यावर तोडगा काढणे गरजेचे आहे. अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करणार आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनचे पदाधिकारी कार्यकर्ते आदींसह ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आता 'नगर' अंदाजाची प्रतीक्षा

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीला जवळजवळ वर्ष लोटल्यावर अखेरीस राज्यातील २९ महानगर पालिकांच्या बहुप्रतीक्षित निवडणुका घोषित झाल्या आहेत. २०२० ते २०२३ या कालावधीत यापैकी बहुतांशी महापालिकांची मुदत संपली होती. याचा अर्थ असा की, तीन ते पाच वर्षांचा काळ लोकप्रतिनिधींविना या महापालिका चालल्या होत्या. आता २२ जिल्ह्यांतील २९ महापालिकांमधील ८९३ प्रभाग आणि २८६९ जागांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होईल आणि १६ जानेवारीला महाराष्ट्रातील नागरी भागांचा कौल काय आहे, हे निकालात दिसून येईल. नागरी भागाचा कौल अर्थात 'नगर' अंदाज काय आहे, हे त्यातून स्पष्ट होईल. राज्याच्या महापालिकांमध्ये २९ पैकी सर्वाधिक महापौरपदे भाजपाकडे होती. २०१५ ते २०१७ या काळात निवडणुका झाल्या तेव्हा देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाची पहिली कारकीर्द सुरू होती. त्यानंतरचा दीर्घ काळ लोटल्यावर, आता दुसरी कारकीर्द सुरू असताना या निवडणुका होत आहेत. या निवडणुका महापालिकांच्या अधिकार क्षेत्रापुरत्या मर्यादित असल्या, तरी त्यांच्या निकालांवर राज्याचे राजकारण ठरत असते. त्यामुळे भाजपासह साऱ्याच पक्षांना त्या गांभीर्याने घ्याव्या लागणार आहेत. नगरपालिका, नगर पंचायतींची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. आता महापालिका निवडणुकांची घोषणा झाली आहे. त्यानंतर जिल्हा परिषदांच्या निवडणुका होतील. आरक्षणाच्या मर्यादेचा प्रश्न आणि त्यातून उद्भवलेले तांत्रिक वाद अनेक ठिकाणी आहेत. त्यामुळे काही जिल्हा परिषदांमध्ये निवडणुका होऊ शकणार नाहीत, असे दिसते. तरीही ग्रामीण, निमशहरी आणि शहरी अशा तिन्ही प्रकारच्या मतदारांचा एकूण कौल नव्या वर्षाच्या पूर्वार्धात स्पष्ट झालेला असेल. गेल्या वेळी या साऱ्या निवडणुका ज्या वातावरणात झाल्या होत्या, ते वातावरण आता राहिलेले नाही. कित्येक दशके चाललेली भाजपा-शिवसेनेची युती तुटली आहे. शिवसेनेचा उद्धव ठाकरे गट हा काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटासोबत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपासोबत सत्तेत आहे. एकुणात गेल्या सात-आठ वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले असल्यामुळे यापूर्वीच्या निवडणुकीत जसे घडले होते, अगदी तसेच याही वेळी घडेल, असे ठामपणे म्हणता येत नाही. आव्हाने सर्व पक्षांसमोर आहेत. विशेषतः राज्याच्या सत्तेत म्होरक्या असलेल्या व सर्वांत मोठा पक्ष म्हणून मान्यता पावलेल्या भाजपाकडे तिकिटासाठी लागलेली रांग बघता अंतर्गत वादांवर नियंत्रण ठेवण्याचे फार मोठे आव्हान या पक्षाकडे आहे. शिवाय, राज्यात सध्या सत्ता असल्यामुळे अधिकाधिक महापालिका जिंकणे व त्यायोगे आपल्या सत्तेला लोकांचे सतत पाठबळ असल्याचे सिद्ध करणे भाजपासाठी आवश्यक आहे.

तीच परिस्थिती एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वातील त्यांच्या पक्षांची आहे. राज्याच्या सत्तेतील आमदारांची संख्या आणि आता नव्याने अस्तित्वात येणाऱ्या महापालिकांमधील नगरसेवकांची संख्या यात त्यांना काही ना काही बरोबरी साध्य करावी लागेल. आमदार निवडून आणण्यापेक्षा नगरसेवक निवडून आणणे कठीण असते. कारण आमदारकीच्या निवडणुकीत राज्यासोबतच काही ना काही प्रमाणात राष्ट्रीय विषय असतात. तसे महापालिकांच्या निवडणुकीत घडतेच असे नाही. स्थानिक समीकरणे महापालिका किंवा अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. परखडपणे सांगायचे तर महाराष्ट्रात भाजपा वगळता एकही मातब्बर पक्ष उरलेला नाही. काँग्रेसचे अवसान बऱ्यापैकी गळालेले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीची शकले झालेली आहेत. त्यामुळे एकसंध असलेला, उत्तम संघटन असलेला मातब्बर असा पक्ष म्हणजे भाजपा. डाव्या आणि तत्सम पक्षांचा राज्यात अजिबात आवाज नाही. त्यामुळे ही निवडणूक सत्ताधारी महायुती आणि विरोधातील महाविकास आघाडी अशीच होणार हे स्पष्ट आहे. मात्र, त्यातही सर्व ठिकाणी महायुती वा महाविकास आघाडी एकसंध स्वरूपात लढेल, याची खात्री देता येत नाही. स्थानिक गणितांवर युती-आघाडीची रचना ठरेल. महाराष्ट्रात सर्वत्र ठोस अस्तित्व असलेला पक्ष म्हणजे भाजपा. इतर पक्षांचे राज्यभर अस्तित्व आहे, असे म्हणता येत नाही. उदाहरणार्थ, कितीही आवाज केला तरी विदर्भात एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजितदादांची राष्ट्रवादी, उद्धव ठाकरे यांची शिवसेना, राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे फारसे अस्तित्व नाही. विदर्भात भाजपा आणि काँग्रेस अशा दोनच पक्षांमध्ये प्रामुख्याने लढत होईल. इतर भागांमध्येदेखील अशी वेगवेगळी समीकरणे आहेत. महाराष्ट्रात काही ठिकाणी त्या-त्या पक्षांच्या बड्या नेत्यांचे प्रभाव क्षेत्र आहे. या साऱ्यांचा विचार केला तर ही निवडणूक बरीच गुंतागुंतीची असेल, असे दिसते.

गेल्या काही वर्षांत महापालिकांच्या कारभाराचा थेट अनुभव नागरिकांनी घेतला. लोकप्रतिनिधी नसताना प्रशासकीय राजवटीत शहरांचा कारभार कसा चालतो, याचे चांगले-वाईट दोन्ही पैलू लोकांच्या लक्षात आले. एका बाजूला निर्णयक्षमता आणि गती दिसली, तर दुसऱ्या बाजूला लोकप्रतिनिधी नसल्याने जबाबदारीची साखळी तुटलेली असल्याची जाणीवही झाली. रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक, परवाने, कर आकारणी अशा दैनंदिन प्रश्नांमध्ये लोकप्रतिनिधी नसल्याची उणीव अनेकांना जाणवली. त्यामुळे या निवडणुका केवळ पक्षीय राजकारणापुरत्या मर्यादित न राहता थेट नागरी जीवनाशी जोडल्या गेल्या आहेत, हे समजून घ्यायला हवे. महाराष्ट्रासारख्या अधिक शहरी असलेल्या राज्यातील राजकीय पक्षांसाठी तर ते आवश्यकच आहे. महापालिका निवडणुकीत मतदार अधिक व्यवहार्य असतो, असा अनुभव आहे. गटारे स्वच्छ झाली का, रस्ता झाला का, पाणी वेळेवर येते का, पार्किंगचा प्रश्न सुटला का अशा साध्या पण ज्वलंत प्रश्नांवर नगरसेवकांचे भवितव्य ठरते. उमेदवाराची ओळख, त्याची स्थानिक पकड, त्याची उपलब्धता आणि त्याचा स्वभाव हे घटक निर्णायक ठरतात. या कारणामुळे राजकीय पक्षांसाठी या निवडणुका आव्हानात्मक असतात. भाजपाकडे आज राज्यातील सत्ता आहे, केंद्रातील सत्ता आहे. अनेक महापालिकांमध्ये पूर्वीपासून प्रभाव आहे. त्यामुळे 'डबल इंजिन'चा फायदा दाखवण्याची जबाबदारी भाजपावर आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट या निवडणुकीत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याच्या लढाईत गुंतलेले दिसतील. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाचे रूपांतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करता येते का, हे त्यांच्यासाठी निर्णायक ठरेल. महाविकास आघाडीसमोर वेगळे आव्हान आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवाचा धक्का पचवून पुन्हा संघटन उभे करणे, कार्यकर्त्यांना सक्रिय करणे आणि स्थानिक पातळीवर युती टिकविणे सोपे नाही. तशीही शहरी भागात काँग्रेसची घसरण दीर्घकाळापासून सुरू आहे. काही मोजक्या शहरांखेरीज काँग्रेसकडे ठोस नेतृत्व आणि संघटन दिसत नाही. ते दाखवून देण्याची संधी काँग्रेसला आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक ही या साऱ्या प्रक्रियेचा केंद्रबिंदू ठरणार आहे. आशियातील सर्वांत श्रीमंत महापालिका, हजारो कोटींचा अर्थसंकल्प, प्रचंड प्रशासकीय यंत्रणा आणि राजकीय प्रतिष्ठा या साऱ्यांमुळे मुंबईची लढत केवळ महानगर पालिकेपुरती मर्यादित अर्थाने घेतली जात नाही. उद्धव ठाकरे यांच्यासाठी मुंबई ही भावनिक आणि राजकीय दोन्ही अर्थाने कसोटी आहे. शिवसेनेचा जन्म, वाढ आणि वर्चस्व याच शहराशी जोडलेले आहे. भाजपासाठीही मुंबईत आपले वर्चस्व अबाधित ठेवणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुंबईतली लढत अत्यंत लक्षवेधी ठरणार आहे. एकूणच, १५ जानेवारीला होणारे मतदान आणि १६ जानेवारीला जाहीर होणारे निकाल हे केवळ २९ महापालिकांचे भवितव्य ठरवणार नाहीत. ते महाराष्ट्राच्या राजकारणाची पुढील दिशा सूचित करतील. विधानसभा निवडणुकीनंतरचा 'नगर' अंदाज काय सांगतो, याकडे राज्यभरातील राजकीय नेते, कार्यकर्ते आणि अभ्यासकांचे लक्ष त्यामुळेच लागलेले आहे.

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# मुंबईकरांचा श्वास होणार मोकळा

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहेच; त्याचबरोबर ते जागतिक पातळीवरील एक महत्त्वाचे शहर आहे. मुंबई महानगरपालिका ही भारतातील सर्वात जुनी महानगरपालिका आहे. मुंबईच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू यांसारख्या मोठमोठ्या प्रकल्पांना गती दिली. या प्रकल्पांमुळे मुंबईचे कनेक्टिव्हिटी नेटवर्क मजबूत झाले आहे. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर यांच्यातील अंतर कमी झाले आहे. मुंबई आणि नवी मुंबई ही दोन महत्त्वाची ठिकाणे अटल सेतूमुळे जवळ आली. या दोन महत्त्वाच्या शहरांबरोबरच आता नवीन तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीचीही तयारी सुरू झाली आहे. ही तिसरी मुंबई फ्युच्युरिस्टिक स्वरूपाची असणार आहे. अशा या दोन्ही मुंबईतील विविध प्रकारच्या विकास प्रकल्पांमुळे मुंबईच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला गती मिळत आहे. मुंबईच्या विकास आराखड्याला सरकारने २०१८ मध्ये मान्यता दिली. मुंबईच्या विस्ताराचा सखोल विचार करून मंजुरी देण्यात आली होती. यामध्ये मुंबईतील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन इथल्या नागरिकांना मिळणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये वाढ करणे, वाहतूक व्यवस्था सुधारणे, शहरातील नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करणे, जमिनीचा वापर नियोजित पद्धतीने करणे आदी गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मुंबई इन ५९ मिनिट्स' या संकल्पनेनुसार मुंबईतील कोणत्याही भागातून ५९ मिनिटांमध्ये दुसऱ्या भागात पोहोचता यावे, यासाठी मेट्रो, रस्ते आणि सार्वजनिक वाहतूक प्रकल्प राबविले जात आहेत. लवकरच मेट्रोच्या तीन नवीन लाईन्स सुरू होण्याची अपेक्षा आहे तसेच दरवर्षी किमान ५० किलोमीटर मेट्रो मार्गिका कार्यान्वित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

मुंबईतील मंडाले येथील मेट्रो प्रशिक्षण संस्था मुंबई आणि महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता देशातील मेट्रो प्रकल्पांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. मुंबईच्या सर्वांगीण आणि आधुनिक विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईला नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला आहे. मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. यासाठी मुंबई आणि मुंबईच्या आसपासच्या परिसरातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी ५० हजार कोटी रुपयांहून अधिक निधीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने मुंबई मेट्रो प्रकल्प, मुंबई रेल्वे मार्ग विस्तार, लोकल रेल्वे नेटवर्क, नवीन रेल्वे कॉरिडॉर आणि मुंबई उच्च न्यायालय नवीन संकुलाचा समावेश आहे. याचबरोबर मुंबईला लागून असलेली ठाणे रिंग मेट्रो, नवी मुंबई मेट्रो आणि कोस्टल रोड तसेच ठाणे ते नवी मुंबई विमानतळ यादरम्यान उभारण्यात



येणारा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उन्नत मार्ग या योजनांमुळे मुंबईत येणारी आणि मुंबईतील अंतर्गत वाहतूक व्यवस्था अधिक जलद होणार आहे. फडणवीस यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास योजनेच्या (एमयूटीपी) टप्पा ३ आणि ३ए अंतर्गत मुंबईसाठी २६८ नवीन एसी रेल्वे गाड्या खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. या ट्रेन मेट्रोप्रमाणेच बंद दरवाज्याच्या असणार आहेत तसेच या नवीन एसी गाड्यांसाठी प्रवाशांना जादा दरदेखील द्यावा लागणार नाही. टप्प्याटप्प्याने जुन्या रेल्वे गाड्या हटवून त्या जागी नवीन एसी रेल्वे गाड्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

२००८ मध्ये मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पृष्ठभूमीवर सरकारने मुंबईत सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही लावण्याची घोषणा केली होती. टप्प्याटप्प्याने व्यापक स्वरूपात मुंबईतील सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करण्याचा निर्णय घेतला होता. २०१८ मध्ये सीसीटीव्हींची संख्या वाढवून ९८० कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली होती. त्याचबरोबर डायल १०० या प्रकल्पाला प्राधान्य देत मुंबईकरांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाची पावले उचलली. २०१८ नंतर २०१९ मध्ये सीसीटीव्हीच्या यंत्रणेचा आणखी विस्तार करत मुंबईत साधारण एकूण १० हजारांहून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय घेतला गेला. पूर्वीच्या ५ हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या संख्येत आणखी ५६२५ सीसीटीव्हींची वाढ करून त्यासाठी ३२३.२३ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली गेली. वाढत्या इंटरनेट आणि 'सोशल मीडिया'च्या वापरामुळे ऑनलाईन आर्थिक फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागल्याच्या पृष्ठभूमीवर शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्यात स्वतंत्र सायबर गुन्हे तपास आणि प्रतिबंध कक्ष स्थापन करण्याचा निर्णय २०१७ मध्ये घेण्यात आला होता. मुंबई पोलिस दलांतर्गत मुंबईतील पाच प्रादेशिक विभागांमध्ये तब्बल ९३ पोलिस ठाणी असून बीकेसी भागामध्ये स्वतंत्र सायबर पोलिस ठाणे आहे. या स्पेशल सायबर कक्षातून सायबर गुन्हेगारीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जात आहे. सरकारने या यंत्रणेत आता मोठ्या प्रमाणात सुधारणा करून पोलिसांना अत्याधुनिका यंत्रणा, लॅब उपलब्ध करून दिली आहे. त्यातून मुंबई पोलिस आर्थिक सायबर क्राईमवर बारीक लक्ष ठेवून आहे.

मुंबई आणि मुंबईकरांचे आरोग्य स्वास्थ्य अबाधित राहावे, यासाठी फडणवीस सरकारने २०१८ मध्ये मुंबईसाठी मोबाईल मेडिकल युनिट सेवा सुरू केली होती. या माध्यमातून प्रशिक्षित डॉक्टर्स, नर्स, लॅब टेक्निशियन आणि फार्मासिस्टची सुविधा पुरविण्यात आली होती. प्राथमिक आरोग्य सेवांपासून वंचित लोकांना प्रत्येक वॉर्ड आणि वस्तीसाठी प्रतिबंधात्मक उपचारात्मक आरोग्य सेवा सुरू करण्यात आली होती. या मोबाईल मेडिकल युनिटच्या माध्यमातून कुटुंब नियोजन, प्रसूतिपूर्व आणि प्रसूतिपश्चात माता आणि बालसंगोपन, लसीकरण, साथरोग नियंत्रण, समुपदेशन आदी राष्ट्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जात होती. मेट्रो लाईन २ए, २बी, ३, ४, ५, ६, ७ अशा विविध मार्गावरील लाईन्स पूर्ण क्षमतेने सुरू होत आहेत. यामुळे मुंबई कनेक्टिव्हिटी लेव्हल वाढली आहे. त्याचबरोबर या मेट्रो मार्गांमुळे रस्त्यावरील ट्रॅफिक कमी होऊन प्रदूषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे.

मुंबईतील बीडीडी चाळ, पत्राचाळ, धारावी झोपडपट्टी आणि इतर वसाहतींच्या पुनर्विकासाला गती देण्याचे काम सरकारने केले. वरळी बीडीडी चाळीतील हजारो घरांच्या पुनर्वसनाचे काम प्रगतिपथावर आहे. याशिवाय नायगाव, जोशी मार्ग, गोरेगाव आणि इतर भागांमध्येही पुनर्वसन प्रकल्प वेगाने सुरू आहेत. धारावी पुनर्वसन हा मुंबईच्या विकासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीमध्ये हजारो उद्योग सुरू असून या भागाचा पुनर्विकास करून आधुनिक रूप देण्याचा उपक्रम फडणवीस यांच्या काळात सुरू झाला आहे. येणाऱ्या काही वर्षांमध्ये धारावी स्लम फ्री मुंबईकडे वाटचाल करेल आणि येथे सुमारे १० लाख लोकांना चांगली घरे तसेच विविध सुविधांचा लाभ मिळेल. धारावीचे झोपडपट्टीच्या रूपातून अधिकृत, नियोजित भागात पुनर्वसन होणार आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि मुंबईकरांचा प्रवास अधिक सुलभ करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले गेले. बीकेसीतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या सहापैकी पाच एक्झिट पूर्ण झाले आहेत. राहिलेला एक मार्गही या महिन्यात पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. एकंदरीत विकसित, सुरक्षित, देखणी मुंबई उभी राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# अमरावतीत 'एकमेकांची' प्रतीक्षा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार आणि या तिघांच्याही पक्षातील प्रमुख नेते महानगरपालिका निवडणूक महायुती म्हणूनच लढणार हे वारंवार सांगत असले तरी प्रत्यक्षात स्थिती महापालिकानिहाय खूपच वेगवेगळी आहे. महाविकास आघाडीच्या उद्धव ठाकरे, हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे यांची स्थिती महायुतीपेक्षा वेगळी नाही. अमरावती महानगरपालिका निवडणुकीचा विचार केला तर महायुती व महाविकास आघाडी ही निवडणूक एकत्र लढेल असे अजिबात वाटत नाही. मागच्याही निवडणुका ते एकत्र लढले नव्हते. मुंबई फक्त अपवाद होती. दोन्ही बाजूने अद्याप पत्ते उघड झालेले नाही. ते एकमेकांच्या प्रतीक्षेत आहेत. सर्वच पक्ष स्वतंत्र लढतील आणि काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत करतील, अशी शक्यता जास्त आहे. कार्यकर्त्यांच्या समाधानासाठी ते जास्त सोयीचे ठरेल, असा विचारप्रवाह जवळपास सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. कोणत्याच पक्षाच्या कार्यकर्त्याला स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका महायुती व आघाडीत लढवाव्या असे वाटत नाही. युती व आघाडीचे समीकरण निकालानंतर जुळवावे, अशी कार्यकर्त्यांची भावना आहे.

महायुतीतल्या घटक पक्षांची अमरावतीतली स्थिती तर एकमेकात संवाद होईल, इतकी पण सुस्थितीत नाही. भाजपाने मागच्या निवडणुकीत ८७ पैकी ७६ ठिकाणी उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ४५ जागा जिंकल्या होत्या आणि त्यांचे १० उमेदवार दुसऱ्यास्थानी होते. आता तर भाजपाची स्थिती त्यापेक्षाही चांगली आहे. अशा चलतीच्या काळात भाजपा आपल्या हक्काच्या जागा मित्रपक्षाला देऊन निवडणूक लढेल असे वाटत नाही. भाजपा नेते व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कालच अमरावतीत महायुती म्हणून निवडणूक लढणार पण महापौर भाजपाचाच होईल, अशी घोषणा केली. याचाच अर्थ त्यांना महायुतीचा फक्त जप करायचा आहे आणि युती करायचीच वेळ आली तर ती भाजपाच्याच फार्मुल्याने होईल. त्यात किमान ६५ जागा भाजपा लढेल, असे दिसते. विशेष म्हणजे भाजपा युतीसाठी पुढाकार घेईल, असे वाटत नाही. भाजपाच्या या भूमिकेची जाणीव राष्ट्रवादी अजित पवार आणि शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांना पण झाली आहे. भाजपासोबत जाण्यात काही फायदा नाही. यश मिळाले नाही तरी चालेल पण स्वतंत्रपणे निवडणूक लढवून पक्षाचा विस्तार करत संघटन वाढवायचे, अशी भावना स्थानिक नेत्यांची व कार्यकर्त्यांची आहे. त्याच धोरणानुसार ते कामाला लागले आहे. त्यामुळेच महायुती घटक पक्षांमध्ये संवाद होण्याचे कोणतेही संकेत अद्याप मिळालेले नसले तरी ते एकमेकांच्या प्रतीक्षेत आहेत.

दुसरीकडे महाविकास आघाडीतले वातावरण फार काही वेगळे नाही. काँग्रेस मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे. शिवसेना व राष्ट्रवादी दुभंगल्यामुळे उबाठा आाणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार कमजोर आहे. काँग्रेसला संघटन मजबूत करायचे असल्याने मित्रपक्षांना फार जागा देण्याची त्यांची मानसिकता नाही. वरिष्ठांनी काही निर्णय घेतला तरच विचारविनिमय होईल. पण, असा काही निर्णय होण्याची शक्यता हळूहळू मावळत आहे. मनसेचा आघाडीत समावेश होतो की नाही, हे सुद्धा स्पष्ट नाही. आघाडीतला कोणताच पक्ष एकमेकांवर अवलंबून नसला तरी प्रतीक्षेत आहे. आपली तयारी त्यांनी जोरात सुरू केली आहे. जशी वेळ येईल, तशी निवडणूक लढण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे. आघाडीपेक्षा काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती करण्यावर काँग्रेसचा जोर राहील असे दिसते.

नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीचे निकाल २१ डिसेंबरला आहे. या निवडणुका जवळपास सर्वच पक्ष स्वतंत्रपणे लढले. त्याचे निकाल कसे येतात यावरही युती व आघाडीचे महापालिकेचे गणित आहे. कारण, या निकालांचा प्रभाव या निवडणुकांवर निश्चितपणे पडणार आहे. भाजपा, शिवसेना शिंदे, राष्ट्रवादी अजित पवार यांना या निकालात चांगले यश मिळाले तर युती होणार नाही. समजा या पक्षांना फटका बसला तर प्रमुख ठिकाणी ते युती करतील. रविवारच्या मतमोजणीनंतर आघाडीतल्या घटक पक्षांत अधिक स्पष्टता येईल. काँग्रेसला चांगल्या जागा मिळाल्या तर त्यांचे मनोबल वाढेल. आघाडी करण्याच्या फंदात ते पडणार नाहीत. मैत्रीपूर्ण लढतीचे गाजर ते घटक पक्षांना देऊन गुंतवून ठेवेल. निवडणूक न लढवता पस्तावण्यापेक्षा, निवडणूक लढवून पस्तावणे केव्हाही चांगले, अशी मानसिकता स्थानिकस्तरावर पदाधिकाऱ्यांची आहे. त्याचा सन्मान होईल, अशी चिन्हे दिसत आहेत. निर्णयाची प्रतीक्षा करू या!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# कूर्म पुराण

पुराणातील तत्त्वज्ञान मोठ्या प्रमाणात जगासमोर आले ते नैमिषारण्यातील शौनकादी अठ्ठ्यांशी हजार ऋषींसमोर महामुनी सुतांनी सांगितल्यामुळे. व्यासांनी रचिलेल्या अठरा पुराणांमुळे भारतीय संस्कृतीचा विश्वसंचारही आणि विश्वव्यापकत्वही कळते. कूर्म पुराण अठरा पुराणातील नितांत सुंदर पुराण असून यात भगवान विष्णूंच्या दुसऱ्या अवताराचे प्रयोजन मांडले आहे. पहिल्या मत्स्य अवतारात भगवंत फक्त पाण्याशी मर्यादित होते. दुसरा कूर्म अवतार हा पाण्यात आणि भूतलावरही संचार करू शकणारा उभयचर अवतार आहे. कूर्म पुराणात याच कच्छ म्हणजे कासव अवताराचे प्रयोजन आहे. विशेष म्हणजे कूर्म पुराण स्वयं कूर्मनारायण भगवंतांनी दोनदा सांगितले आहे.

'माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव, आपणची देव होय गुरु ।'
स्वयं कूर्मभगवंतांनी सांगितले त्यामुळे हे कूर्म पुराण आहे.
'नमस्ते कूर्मरूपाय विष्णवे परमात्मने ।
नारायणाय विश्वाय वासुदेवाय ते नमः ॥'

अवताराचीही गोड कथा या पुराणात आहे. ऋषी दुर्वासांच्या शापाने देवांची शक्ती क्षीण होऊ लागली. दिव्य ऊर्जा मिळावी म्हणून भगवान विष्णूंनी समुद्रमंथनातून अमृत काढण्याचा सल्ला दिला. समुद्रमंथन एकट्या देवांकडून शक्य नसल्याने दानवांची मदत घेण्याचे ठरले. देव आणि दानवात अमृतासाठी आपसात सहमती झाली. त्यानुसार क्षीरसागर घुसळून त्यातून अमृत बाहेर काढायचे आणि ते आपसात वाटून घ्यायचे. समुद्र घुसळण्यासाठी मंद्राचल पर्वताची रई आणि नागराज वासुकीचा दोर करण्याचे ठरले. समुद्रमंथन करताना मंद्राचल पर्वत खाली खाली जाऊ लागला. त्याला आधार देण्यासाठी भगवान विष्णू नारायणांनी कासव रूप धारण करून मंदाचल पर्वताला आपल्या पाठीचा आधार देऊन समुद्रमंथन निर्विघ्न पार पाडले. समुद्र मंथनातून अमृतासोबत हलाहलदेखील निघाले. त्यासोबतच पारिजात वृक्ष, कौस्तुभ मणी, ऐरावत हत्ती, उच्चैश्रवा अश्व, कामधेनू, चंद्रमा, पांचजन्य यासोबतच भगवान धन्वंतरीही निघाले. सर्वात मुख्य म्हणजे समुद्रमंथनातून भगवंतांची आद्याशक्ती आदिमाया श्रीलक्ष्मी प्रकट झाल्या. समुद्रमंथनाच्या वेळी नारायण भगवंतांनी जे कच्छ रूप धारण केले त्याला कूर्मावतार म्हणतात. या अवताराच्या अनुषंगाने विविध विषय ज्या पुराणात आलेत, त्या पुराणाला कूर्मपुराण म्हणतात.

या पुराणाचे एकूण १८,००० श्लोक असून ते दोन खंडात विभाजित आहेत. पूर्वखंडाचे ५१ अध्याय तर उत्तर खंडाचे ४४ अध्याय असे एकूण ९५ अध्याय आहेत. कूर्म पुराण स्वयं भगवान कूर्मनारायणांनी राजा इंद्रद्युम्न यांना आणि त्यानंतर स्वत: कूर्म भगवंतांनीच नारदादी ऋषींना सांगितले. हेच पुराण त्यानंतर नैमिषारण्यात महर्षी व्यासांच्या आज्ञेनुसार सुत महाशयांनी शौनकादी ऋषींना सांगितले.

या पुराणात हलाहल प्राशन करणारे शिव, स्वयं विष्णू आणि आदिशक्ती श्रीलक्ष्मी यांचा प्रभाव असल्यामुळे हे पुराण शैव, वैष्णव आणि शाक्त यांचा समन्वय साधणारे एकात्मता स्तोत्र आहे. याच पुराणात भारतीय संस्कृतीचा पाया असलेल्या ईश्वर गीता आणि व्यास गीता विशद केल्या आहेत. इतर पुराणांप्रमाणे याही पुराणात ब्रह्मा-विष्णू-महेश यांचे अवतीर्ण आणि सोबतच सृष्टीची आणि ब्रह्मांडाची निर्मिती सांगितली आहे. तीर्थ आणि व्रतांचे महत्त्व आहे. विविध राजे आणि त्यांचे वंश यावर माहिती आहे. दक्षयज्ञ विध्वंस, भगवान वामन आणि दानवेंद्र बळीराजा प्रकरण या पुराणात आहे. नद्या, पर्वत, द्वीप, सागर, पुरी याचे वर्णन आहे. धर्माचरण, भक्षाभक्ष, सदाचार, प्रायश्चित्त या बाबी कूर्म पुराणात आहेत. योग आणि भक्ती मार्ग आहे. नैतिक आणि आध्यात्मिक शिक्षण आहे. गंगेचे आगमन, चार युगे, चार आश्रम यांचे वर्णन आहे. निष्काम कर्मयोग, ज्ञान आणि सांख्ययोग विचार आहे. वेद उत्पत्ती, ब्रह्माचे पुत्र सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार यांची माहिती. वराह अवतार, नृसिंह अवतार, भक्त प्रल्हाद, मधू आणि कैटभ या राक्षसांचा वध अशा अनेक बाबी आहेत. नवीन पिढीने अभ्यासावी अशी कालगणना या पुराणात आहे. कूर्म पुराणाच्या पूर्वभागात पाचव्या अध्यायात एकूण २६ श्लोक आहेत. त्यात ब्रह्मदेवाचे वय, दिवस, मन्वंतर, युग, कल्प यांचे दिनमान सांगितले आहे. ब्रह्मदेवाचे आयुष्य १ पर आहे. या पराचा अर्धा भाग म्हणजे परार्ध आहे. सध्या द्वितीय परार्ध सुरू आहे.

कालगणना निमिषपासून सुरू होते. १५ निमिष म्हणजे १ काष्ठा. ३० काष्ठा म्हणजे १ कला. ३० कला म्हणजे १ मुहूर्त. ३० मुहूर्त म्हणजे १ अहोरात्र. ३० अहोरात्र म्हणजे १ मास. ६ मास म्हणजे एक अयन. दक्षिण अयन आणि उत्तर अयन मिळून २ अयनांचे एक वर्ष होते. याला दिव्य वर्ष म्हणतात. हे दिव्य वर्ष आपल्या ३६० वर्षाइतके असते. असे १२,००० दिव्यवर्ष म्हणजे एक चतुर्युग होईल.(सत्य, द्वापार, त्रेता आणि कलियुग) असे ७१ चतुर्युग म्हणजे १ मन्वंतर होय. ब्रह्मदेवाचा १ दिवस म्हणजे १४ मन्वंतरे ज्याला १ कल्प म्हणतात. साधारणत: ४.३२ अब्ज मानव वर्ष होते. असे ३६० कल्प म्हणजे ब्रह्मदेवाचे एक वर्ष होईल. असे १०० ब्रह्मदेवाचे वर्ष म्हणजे एक पर होईल. सध्या कली युगाचा प्रथम चरण, श्रीश्वेतवाराह कल्प वैवस्वत मन्वंतर, द्वितीय परार्ध सुरू आहे. कालगणनेसोबतच भगवान धन्वंतरी अर्थात औषधिशास्त्र, आयुर्वेद, शरीरशास्त्र, वैद्यकशास्त्र ही सर्व देण कूर्म पुराणाची आहे. कूर्म पुराणात सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर, वंशानुचरित ही पाच पुराण लक्षणे आहेत. याच पुराणात ज्ञान, भक्ती आणि मोक्षमार्गाचा त्रिवेणी संगम आहे. भारताचा भूगोल या पुराणात असून त्यानुसार अखंड भारताचा सिद्धांत भौगोलिक, नैसर्गिक, सांस्कृतिक, हवामान, नद्या आणि पर्वते याचा विचार केला तर कसा सोयीचा आहे, हे लक्षात येते.

कूर्म पुराणातून कासव जसा शांत, धैर्यपूर्वक आणि आत्मविश्वासाने चालतो. तो जसा स्थिर भाव ठेवतो; प्रसंगी स्वत:ला आकुंचित करतो. आपल्या पाठीवरची जबाबदारी कठोरपणे सांभाळतो. आपणही जीवनात तसेच वागण्याची आवश्यकता आहे. पाठीची ढाल करता यावी हा धडा इथेच मिळतो. कूर्म पुराण अजून एक महत्त्वाचा संदेश देते. आपल्या जीवनात नित्य मंथन असते. त्या मंथनातून अमृत येतेच; त्यासाठी प्रथम हलाहल पचविण्याची क्षमता आणि तयारी ठेवावी लागेल. संसार हाच हलाहल असून तो पचवत पचवत आपण पुढे जातो. पण आपल्या जवळ असलेले ईश्वररूपी अमृत आपण ओळखत नाही.

'बहू मृगजळ देखोनी डोळा, थुंकीजे जे अमृताचा गिळिता गराला!'

संसाराच्या मृगजळामागे धावताना तोंडात असलेला अमृताचा गुराळा आपण थुंकून देतो. कूर्म पुराण शाश्वत सत्यकथन करते.

'एतत् पुराणं परमं भषितं कूर्मरूपिणा ।
साक्षात् देवादि देवेण विष्णुना विश्व योनिना ।
यः पठेत सततं मर्त्यो नियमेन समाहितः ।
सर्व पाप विनिर्मुक्तो ब्रह्म लोके महीयते ॥'

कूर्म पुराण स्वयं कूर्म नारायण भगवंतांनी कथन केल्यामुळे त्याचा अभ्यास, वाचन मोक्षप्राप्तीचा मार्ग प्रदान करते.

९८२२२६२७३५

### सत्याचा शोध आणि सत्ता

मतचोरी प्रकरण सुप्रीम कोर्ट आणि निवडणूक आयोग येथे तग न धरण्याने गांधी आडनावधारक विरोधी पक्षनेता (?) राहुल यांनी १४ डिसेंबरला पक्षाची रॅली काढून सत्याच्या जोरावर म्हणे भाजपा सरकार उलथवणार! सत्याचा शोध जगातील संत महात्म्यांनी जीवन मरणा संदर्भात लावलेला असला तरी त्यात विसंगती आहे. सत्तेतील संग्राम संघर्षावर अजूनपर्यंत एकच सत्य बाहेर आलेले आहे ''बळी तो कान पिळी.'' समाजवाद, दारिद्र्य, श्रीमंती, आरोग्य, एकात्मता यावर सत्याचे कोणतेच प्रयोग झालेले नाहीत.

भारत तेरे टुकडे करेंगे, वंदे मातरम् नहीं कहेंगे यावर राहुल गांधी काहीच का बोलत नाही? शिवाय या देशात जे करोडो रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोर येऊन दहशतवादास कारणीभूत आहेत याकरिता त्यांनी काय केले याबाबत तथाकथित आंदोलनजीवींना सत्याची पडताळणी करून सांगितले असते. समान नागरी कायदा आवश्यकता मत मांडले असते तर सत्ता स्थापन करण्याचा मार्ग दिसला तरी असता. मुळात देशात अस्थिरता निर्माण करण्याच्या क्लृप्त्या शोधण्यात आणि संविधान डायरी हाताने दाखवून सत्याचा शोध आणि सत्तेचा बोध घेता येत नाही हेच सत्य आहे, सत्ता नाही.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

## वाचक पत्रे

### मासांनां मार्गशीर्षोऽहम

भगवान श्रीकृष्णाने गीतेच्या दहाव्या अध्यायात विभूती योग सांगताना स्वत:च्या विश्वरूप आणि सर्वव्यापी स्वरूपाचे रहस्य उलगडून दाखविले आहे. त्यात त्यांच्या विविध विभूतींचे वर्णन केले आहे. जसे वेदांमध्ये सामवेद असे वेगवेगळे उदाहरणे देऊन सांगितले आहे तसेच मासांनां मार्गशीर्षोऽहम म्हणजेच सर्व महिन्यांमध्ये मार्गशीर्ष महिना हा माझा आहे. म्हणूनच हा महिना भगवान श्रीकृष्णाला समर्पित केला आहे. याच महिन्यात धन आणि समृद्धीची देवी महालक्ष्मी हिचे गुरुवारी व्रत करून विशेष पूजा केली जाते. या महिन्याचे विशेष धार्मिक महत्त्व आहे. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा या दिवशी मल्हारी मार्तंड म्हणजेच खंडोबाचे नवरात्र (षडरात्रोत्सव) बसते. ते चंपाषष्ठीपर्यंत असते. पंचमीला नागदिवाळी साजरी करतात. सप्तमी किंवा अष्टमीला दत्त सप्ताह सुरू होतो. त्याची सांगता दत्त जयंतीला होते. लग्नसराई याच दिवसात जोरदार सुरू होते आणि बाजार फळे, फुले यांनी फुलतो. त्यातच थंडीचे आगमन होते. त्यामुळे समारंभ, सहल, शेतावर जाण्याचे बेत ठरतात आणि चटकदार खाद्यपदार्थ खाण्यावर भर दिला जातो. या दिवसात बाजारात विविध हिरव्यागार भाज्या, फळे लक्ष वेधून घेतात. शेतातील दृश्य मनमोहक असते. असा हा मार्गशीर्ष महिना सगळ्या दृष्टीने आल्हाददायक असतो.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### सरकारी लेट लतिफांना धडा

नव्या आयुक्तांनी सकाळी दहा वाजता नागपूर महापालिकेचे प्रवेशद्वार बंद करून, उशिरा कार्यालयात येणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना ताटकळत ठेवले व त्यांच्या वाईट सवयीबद्दल त्यांना समज देऊन आत प्रवेश दिला, ही १६ डिसेंबरच्या तरुण भारतातील बातमी वाचून जनतेला समाधान लाभले असेल. नवे आयुक्त अकनुरी नरेश यांचे याबद्दल आभार मानले पाहिजे. पण या तात्पुरत्या धड्याने कर्मचारी ताळ्यावर येतील, असे समजणे चूक आहे. याबाबतीत बायोमॅट्रिक उपस्थिती अवलंबणे, आजच्या आधुनिक जगात केव्हाही चांगले व बिनचूक आहे. प्रवेशद्वाराजवळ याबाबतचे नोंदणीयंत्र ठेवून, कर्मचाऱ्यांनी आपला अंगठा ठेवून एका सेकंदात त्या संबंधित कर्मचाऱ्याची उपस्थिती नोंदविता येते व सर्व कर्मचाऱ्यांचा मासिक, वार्षिक रेकॉर्ड सहज ठेवता येतो.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## आजचे संघगीत-७९

बुधवार, १७ डिसेंबर २०२५

### हे महान भरतदेश तुजसि कोटि वन्दना

हे महान भरतदेश तुजसि कोटि वन्दना ॥धृ.॥

तूच देव मंदिरात भाव तूच या मनी
शक्ति या करांत तूच स्वप्न तूच लोचनी
अन्तरात तूच प्राण हृदयि तूच प्रेरणा ॥१॥

ही कृतार्थ वैखरी तुझेच गीत गाउनी
लोचनास धन्यता तुझेच रूप पाहुनी
भक्तिचा असे तुझ्याच गंध देहचंदना ॥२॥

स्तोत्र भारता तुझे अम्हांस वेदमंत्र तो
श्वासधूप प्राणदीप आरतीस तेवतो
आयु सर्व वाहिले पदी तुझ्याच पावना ॥३॥

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सोलापुरात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा होणार

**सोलापूर दि.१६ डिसेंबर-**
शासन निर्णयान्वये महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग व अल्पसंख्याक आयोग यांचेकडील संदर्भिय पत्रानुसार अल्पसंख्याक समाजातील नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादीचे संवर्धन करता यावे यासाठी १८ डिसेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने या दिवशी जिल्हा नियोजन समिती, सोलापूर मार्फत अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करुन देणे कामी जिल्हा नियोजन समिती कार्यालयात १८ डिसेंबर २०२५ वार गुरूवार रोजी सकाळी १०.०० वा. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सद्यस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२५ ची आदर्श आचार संहिता लागू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या (महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपंचायत) आदर्श आचारसंहिते बाबत राज्य निवडणूक आयोगाने ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी एकत्रिक आदेश निर्गमित केले आहे. त्यानुसार या कार्यक्रमास राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी,प्रतिनिधी उपस्थित राहणार नाहीत असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी दिलीप पवार यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### सुक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करा

**सोलापूर, दि.१६ डिसेंबर-**
राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पिक (सुक्ष्म सिंचन) योजनेचा सन २०२५-२६ मध्ये अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील पात्र शेतकऱ्यांनी लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. या योजनेत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के तर बहुभूधारक शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान देण्यात येते. याशिवाय मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेतून २५ ते ३० टक्के पूरक अनुदान, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतून १० ते १५ टक्के पूरक अनुदान मिळून एकूण ९० टक्क्यांपर्यंत अनुदान शेतकऱ्यांना मिळू शकते. हा अर्ज भरताना माहिती अचूक भरावी, अन्यथा अर्ज रद्द होऊ शकतो. यासाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक पासबुक, जातीचा दाखला, योजनेचा लाभ ५ हेक्टरपर्यंत देण्यात येणार आहे, अर्ज प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर स्वीकारले जातील. पूर्वसंमती मिळाल्यानंतर शेतकऱ्यांना नोंदणीकृत कंपनीच्या अधिकृत वितरकाकडून संच खरेदी करता येईल. संच बसविल्यानंतर उप कृषि अधिकारी यांच्यामार्फत मोका तपासणी होईल आणि त्यानंतर शेतकऱ्यांच्या आधारलिंक बँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यात येईल. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी सहाय्यक कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी किंवा सामुहिक सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. भोसले यांनी केले आहे.




### जिल्हा समूह लोकगीत स्पर्धेत नेताजी प्रशाला उपविजेती

**सोलापूर दि. १६ डिसेंबर-**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे तसेच युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित जिल्हा युवा महोत्सवातील समुह लोक गीताच्या स्पर्धेत निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने उपविजेतेपद संपादिले. विद्यार्थ्यांनी मोत्याची चुंबळवर पाण्याचा घडा ग हे गवळण लोकगीत सादर केले. संगीत विभागातील ललिता रॅंका, अंकिता कस्तुरी, लहरीका गोने, रक्षिता सुकंनपल्ली, हेमा जुंजा, पूर्वा रेके, गणेश चपळगाव, प्रतीक्षा हंचाटे, सृष्टी बोरामणी, महालक्ष्मी मिसालोलु या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यशस्वी विद्यार्थ्यांना जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे, तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार, सेवानिवृत्त तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागाचे प्रमुख शिवानंद पुजारी, विश्वाराध्य मठपती, जयश्री बिराजदार, विनायक कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, वैशाली कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, क्रीडा प्रमुख विठ्ठल कुंभार यांनी अभिनंदन केले.



### खासदार प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**
राष्ट्रीय काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्यासह खासदार प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गरीब व गरजू मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा पुण्यकर्माचा संकल्प पूर्णत्वास नेला. विमानतळ-होटगी रोड परिसर येथील श्री मंगलदास मूक-बधिर मराठी शाळा तसेच टिकेकरवाडी जिल्हा परिषद शाळेत रेखाताई कुराडे-बिनेकर अध्यक्ष महिला सेवा दल यांच्या संकल्पनेतून व संजय कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय साहित्य व खाऊ वाटप कार्यक्रम पार पडला. दप्तर, वह्या, पेन, पेन्सिल, खाऊचे पाकिटे आणि प्रेमाचे ढिगारय़ाने लहान लहान हात भरून गेले. या उपक्रमाचे आयोजन रेखाताई कुराडे-बिनेकर व संजय कुराडे यांनी केले. प्रसंगी माजी महिला शहर अध्यक्ष हेमा चिंचोळकर, सुमन जाधव, ब्रिगेडियर संजय कुराडे, विजय रुपनूर, महिला शहर उपाध्यक्ष नशीमाताई शेख, समाजसेवक महेश आठवले, शहर दक्षिण सेवादल उपाध्यक्ष अमोल सुर्वे तसेच यंग ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मानव-श्वान संघर्ष टाळण्यासाठी संबंधित विभागांनी कार्यवाही करावी

- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश
- जिल्हा प्राणी क्लेश समितीची घेतली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १६ डिसेंबर-**
सर्वोच्च न्यायालयात सु-मोटो रिट याचिका क्रमांक ५/ २०२५ याचिका प्रमाणे मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. तरी महापालिका, नगरपालिका व ग्रामपंचायत स्तरावरील सर्व संबंधित विभागांनी या अनुषंगाने उपायोजना करून त्याबाबतचा अहवाल त्वरित सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा प्राणी क्लेश समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. विशाल येवले, जिल्हा शल्य चिकत्सक डॉ. वर्षा डोईफोडे, सहाय्यक आयुक्त नगरपालिका योगेश डोके, सोलापूर महापालिकेचे डॉक्टर सतीश चौगुले, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक रूपाली भावसार, मोटर वाहन निरीक्षक राजन देसाई, पशुसंवर्धन विभागाचे डॉ. डी. ए. गिड्डे व अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील भटके श्वान तसेच जनावरे यांच्यासाठी महापालिका, नगरपालिका तसेच ग्रामपंचायत स्तरावर शेल्टर उभा करावेत. यासाठी आवश्यक निधी संबंधित विभागाच्या मुख्यालयाकडून प्राप्त करून घ्यावा. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे उपायोजना करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रशासनाला सादर करावा, असे त्यांनी सूचित केले.

सोलापूर महापालिका हद्दीत सुमारे ४०,००० भटकी कुत्रे असून, सन २०२३ रोजी पासून १५,८८४ भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण केल्याची माहिती डॉ.सतीश चौगुले यांनी दिली. सद्यस्थितीत भटक्या कुत्र्यांसाठी दोनशे कुत्र्यांची क्षमता असलेल्या शेल्टरची व्यवस्था केलेली असून किमान २००० कुत्र्यांच्या निवाऱ्याची सोय होईल असे एक शेल्टर प्रस्तावित असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तर सहाय्यक आयुक्त नगरपालिका प्रशासन श्री. डोके यांनी बार्शी पंढरपूर या नगरपालिकेंनी भटक्या कुत्र्यांसाठी शेल्टर केलेले असून इतर नगरपालिकानी जागा निश्चित केलेली आहे, परंतु शेल्टर साठी निधीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी नगर विकास विभागाकडे निधी मागणी केल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉक्टर येवले यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या सु मोटो रीट याचिकेप्रमाणे जिल्हास्तरावरील सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी करावयाच्या उपायोजनाची माहिती दिली. जिल्ह्यातील सर्व सरकारी आणि खाजगी रुग्णालय यांनी नेहमीच अँटी रेबीज लस आणि इमिनोग्लोबिलीनचा अनिवार्य साठा ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. भटक्या श्वानांना पकडून निर्बीजीकरण, लसीकरण करणे त्यांच्यासाठी आश्रय/ निवाऱ्याची सोय, भटक्या श्वानांना खाऊ घालण्याच्या जागा निश्चित करणे, भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासाठी मानक कार्यप्रणाली तयार करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचेही त्यांनी सांगितले.



## बालाजी अमाईन्सने बांधलेल्या स्वच्छतागृहाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**
तुळजापूर तालुक्यातील बारूळ गावातील श्री बाळेश्वर विद्यालय बारूळ येथे बालाजी अमाईन्स लि., कंपनी च्या वतीने सीएसआर अंतर्गत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचे आज (दि. १६) बालाजी अमाईन्सचे सीएसआर विभागप्रमुख अनिल विपत यांच्या हस्ते व केंन्द्र प्रमुख ए.एस. पाटील तसेच मुख्याध्यापक एन. एम. अणदुरकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

बारूळ येथील श्री बाळेश्वर विद्यालयात नविन इमारतीचे बांधकाम करण्यात आले होते. नविन शाळेत स्वच्छतागृहाचे बांधकाम बालाजी अमाईन्सच्या वतीने करण्यात यावे अशी मागणी शाळेतील शिक्षक व गावातील नागरीक तसेच संस्थेच्या सभासदांनी बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांचे कडे केली. या करीता बालाजी अमाईन्सच्यावतीने सीएसआर अंतर्गत मुलांकरीता व मुलींकरीता एक स्वच्छतागृहाचे युनिट बांधकाम बांधले आणि या स्वच्छतागृहाचे आज लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी केन्द्रप्रमुख ए.एस. पाटील यांनी बालाजी अमाईन्सच्या वतीने बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाच्या कामाचे कौतुक केले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक हजारे, बल सुरकरसर, लाखाडे, नाईक, वठारेसर, रणदिवे, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, बसवराज आंटद, गणेश नकाते उपस्थित होते.



सोलापूर : जिल्हा न्यायालयासमोरील फुटपाथवर बेकायदेशीर पार्किंग सर्रास दिसून येते. मंगळवारी सकाळी टिपलेले छायाचित्र.

### त्रिभाषा सूत्रासाठी महिन्याची मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई,दि. १६ डिसेंबर-**
राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत नेमण्यात आलेल्या अभ्यास समितीला विद्यार्थाना पहिलीपासून हिंदी सुरू ठेवायची की नाही?, याबतच अद्याप निर्णय घेता आलेला नाही. त्यासाठी नेमलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीला आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. आता त्यांना त्याबाबतचा अहवाल नव्या वर्षात जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात सादर करता येणार आहे. राज्यातील शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०20 (एनईपी २०20) अंतर्गत यावर्षीच्या शैक्षणिक वर्षांपासून राज्य सरकारने तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा एच्छिक म्हणून लागू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्याला मराठी भाषा समिती मंडळ, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शिवसेना व मनसेने तीव्र विरोध दर्शविला, त्यानंतर महाविकास आघाडी त्यात सहभागी झाल्यानंतर मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. याबाबत जनमताचा रेटा वाढल्याने सरकारने जीआर मागे घेतला होता.






## महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी भवनात इच्छुकांची उसळली गर्दी

### माजी महापौर, उपमहापौर, ५ माजी नगरसेवकांसह १२२ इच्छुकांनी घेतले अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ डिसेंबर -**
सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने जुनी मिल कपाउंड येथील राष्ट्रवादी भवन येथे मंगळवारपासून उमेदवारी अर्ज देण्यास सुरुवात करण्यात आली. पहिल्या दिवशी माजी महापौर, माजी उपमहापौर, ५ माजी नगरसेवक यांच्यासह १२२ इच्छुकांनी अर्ज घेतले.

काँग्रेस पक्षातून राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केलेले माजी महापौर मकबूल मोहोळकर यांनी प्रभाग क्रमांक १४ साठी उमेदवारी अर्ज घेतला. माजी उपमहापौर आप्पाशा म्हेत्रे यांनी प्रभाग क्रमांक १२ साठी उमेदवारी अर्ज घेतला. माजी नगरसेवकद्वय किसन जाधव यांनी प्रभाग क्रमांक २२, माजी ज्येष्ठ नगरसेवक तौफिक शेख यांनी प्रभाग २०, सिध्देश्वर आनंदकर यांनी प्रभाग १, नूतन गायकवाड यांनी प्रभाग १७, तस्लीम शेख यांनी प्रभाग क्रमांक २०, राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्षा संगीता जोगदनकर यांनी प्रभाग २६, माजी नगरसेवक तौफिक शेख यांचे चिरंजीव अदनान शेख यांनी प्रभाग क्रमांक १६ साठी उमेदवारी अर्ज घेतला. पक्षसंघटनेचे जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले यांच्याकडे अर्ज सुपूर्द करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, ज्येष्ठ नेतेद्वय सुधीर खरटमल, प्रा.श्रीनिवास कोंडी, परिवहन समितीचे माजी सभापती आनंद मुस्तारे, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा संगीता जोगदनकर, कार्याध्यक्षा चित्रा कदम, बसवराज बगले, तौफिक शेख आदी उपस्थित होते.

#### जंगी स्वागत आणि रेड कार्पेट

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी उमेदवारीसाठी येणाऱ्या इच्छुकांसाठी राष्ट्रवादी भवनाच्या पायऱ्यांवर रेड कार्पेट टाकले होते. स्वागतासाठी ढोल आणि ताशा सज्ज ठेवण्यात आला होता. वाजतगाजत सर्व इच्छुकांचे राष्ट्रवादी भवनात आगमन करण्यात आले.

#### सक्षम उमेदवार मैदानात

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना सोलापूरचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे, सहसंपर्क प्रमुख व विधानसभा उपाध्यक्ष आणणा बनसोडे यांचे मार्गदर्शन व ताकद मिळणार आहे. सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सक्षम, स्वच्छ प्रतिमेचे व जनतेशी जोडलेले उमेदवार मैदानात उतरवत आहे.
**- संतोष पवार शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर शहर**

#### राष्ट्रवादी भवनात इच्छुकांची लगबग

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अबकी बार ७५ पारचा नारा देण्यात आला आहे. एकूण १०२ जागांवर उमेदवार उभे करण्याची तयारी करण्यात आली आहे. मंगळवारी जुनी मिल कपाउंड येथील राष्ट्रवादी भवनात सकाळी ११ वाजल्यापासून इच्छुक उमेदवारांची अर्ज घेण्यासाठी मोठी गर्दी उसळली होती.

## सोरेगाव येथील महादेव मंदिराचा कळसारोहण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**
सोरेगावातील प्राचीन महादेव मंदिराचा कळसारोहण सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास काशीपीठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाराध्य शिवाचार्य महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. या मंदिराचा जीर्णोद्धार सामाजिक कार्यकर्ते अक्षय वाकसे यांनी केला आहे. प्रारंभी काशीपीठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या व डॉ. पंचाक्षरी शिवाचार्य स्वामी, वेदमूर्ती कल्याण शास्त्री गणेचारी, वेदमूर्ती विरभद्रय्या स्वामी यांच्या हस्ते कळसारोहण, महाशांती आणि अभिषेक विधी झाले.

यावेळी आयोजक अक्षय वाकसे, माजी आमदार दिलीप माने, डॉ. शिवरत्न शेटे, नम्रता कोठे, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, गुरुशांत धुत्तरगावकर, सुयश खानापुरे, संतोष वाकसे, श्रीकांत निशानदार, राजशेखर पाटील, संजय वाकसे, शिवानंद कोरे, सिद्धराम भीमदे, विजू स्वामी, अनिल खडखडे, संदीप म्हेत्रे, चंदू खडखडे, वामन कांबळे, नागनाथ भरले, धनू कांबळे, बबलू कांबळे, राहुल कुटेकर, अमर डूरके आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

जा.क्र.न.पं./१६७४/२०२५
वैराग नगरपंचायत, वैराग
दि.१६/१२/२०२५

**वैराग नगरपंचायत वैराग**
निविदा प्रसिद्धीकरण सुचना क्र. २

मुख्याधिकारी, वैराग नगरपंचायत, वैराग सर्वसाधारण रस्ते अनुदान अंतर्गत बांधकाम विभागाकडील हाती घेतलेल्या विकास कामाचे ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्ताप्राप्त तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-टेंडरद्वारे मागवीत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण १ काम आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि.१७/१२/२०२५ ते दि.२४/१२/२०२५ पर्यंत सायं. ५.00 वाजेपर्यंत असून कामाच्या किंमती बाबत तसेच निविदा किंमत, निविदा स्वीकृती इत्यादीची माहिती : http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे.

**सही/-**
**(विद्या पाटील)**
**मुख्याधिकारी**
**वैराग नगरपंचायत वैराग**

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात ४१३२२६
**संकलन अभिलेख वाल**
दुरध्वनी नं.-९४२१९६९५१६ Email -tahakkalkot@gmail.com
जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/८२/२०२५ दि. ०९/१२/२०२५

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**
प्रति,
**श्री. शरणप्पा सिध्दाराम गुरव**
रा. कडबगांव ता. अक्कलकोट -- **अर्जदार**
**विरुध्द**
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, कडबगांव ता अक्कलकोट -- **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील श्री. शरणप्पा सिध्दाराम गुरव यांनी त्यांचे वडील कै. सिद्राम भिमण्णा गुरव यांचा मृत्यू दि. ०९/०१/१९७९ रोजी मौजे कडबगांव ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतू त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे शरणप्पा सिध्दाराम गुरव यांनी त्याच्या वडीलांच्या मृत्यूची नोंद करुन घेवून मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ३१/०७/२०२५ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकानी अर्जदार यांनी त्यांच्या वडीलांच्या यांचे नावे सिद्राम भिमण्णा गुरव यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०९/१२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**विनायक सुधीर मगर**
**तहसिलदार अक्कलकोट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ...तर भारत हॉकी विश्वचषक जिंकू शकतो

**चेन्नई :** उत्साह कायम ठेवून आणि वैयक्तिक खेळांपेक्षा एक संघ म्हणून खेळून, सध्याचा भारतीय हॉकी संघ विश्वचषक विजेतेपदासाठी ५० वर्षांची प्रतीक्षा संपवू शकतो, असा विश्वास विश्वचषक विजेता दिग्गज हॉकी खेळाडू व्हिक्टर फिलिप्सने व्यक्त केला आहे. आठ वेळा ऑलिम्पिक विजेता भारतीय पुरुष हॉकी संघाने १९७५ मध्ये क्वालालंपूर येथे आपला एकमेव विश्वचषक जिंकला. अजितपाल सिंग यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा प्रमुख सदस्य असलेल्या फिलिप्सला अजूनही आठवते की प्रत्येक खेळाडू विजयाच्या एका अद्वितीय उत्कटतेने कसा खेळायचा. ७५ वर्षीय फिलिप्स त्यांच्या वेग आणि ड्रिब्लिंगने विरोधी बचावफळीसाठी प्रसिद्ध होते.



### श्रीनाथ हायस्कूल येथे क्रीडा सप्ताह सुरू

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

देसाईनगर येथील हद्दवाढ भागातील रविकिरण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीनाथ हायस्कूल येथे वार्षिक क्रीडा सप्ताह सुरू झाला. याचे उद्घाटन सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ. श्रीपाद सुरवसे उपस्थित होते. उद्घाटनांतर श्री. शटगार यांच्यातर्फे अल्पोपहार देण्यात आला.स्वागत व प्रास्ताविक संतोष पवार यांनी केले. सप्ताहात कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल, टेनिस क्रिकेट, फुटबॉल व लंगडी हे खेळ क्रीडा शिक्षक संतोष बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहेत. शनिवारी याचा समारोप होणार असून प्रथम तीन विद्यार्थ्यांना सातलिंग शटगार यांच्यामार्फत शील्ड देण्याचे त्यांनी जाहीर केले. यावेळी स्मिता छोटे, गिरीश शिंदे, श्री विजापुरे, श्री कोळी आदी उपस्थित होते. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना श्री. शटगार यांच्यातर्फे अल्पोपहार देण्यात आले.



### सेंट जोसेफच्या जुनेरा खानला तिहेरी मुकुट

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

शालेय क्रीडा स्पर्धेतील सेंट जोसेफ स्कूलच्या जुनी खान हिने तीन खेळांमध्ये कामगिरी केली. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात तिने बॉक्सिंगमध्ये सुवर्ण पदक पटकाविले. किक बॉक्सिंग मध्ये रौप्य तसेच कराटे स्पर्धेत कांस्य संपादिले. क्रीडाशिक्षक सनी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले तिचे मुख्याध्यापक फादर आनंद गायकवाड यांनी अभिनंदन केले.

### सोलापूर जिल्हा योगासन स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा योग परिषदेची खुली जिल्हा योगासन स्पर्धा २१ डिसेंबर रोजी नूमवी प्राथमिक शाळा डफरीन चौक येथे आयोजिली आहे. या स्पर्धांसाठी सहप्रायोजक म्हणून रोटरी क्लब ऑफ सोलापूर आणि राणी कित्तूर चन्नम्मा स्मारक भवन समिती हे आहेत. लहान गटापासून ते साठ वर्षांपर्यंत विविध मुले, मुली, स्त्री व पुरुष अशा १४ वयोगटांमध्ये या स्पर्धा होणार असून पदक व रोख पारितोषिके विजेत्यांना दिली जाणार आहेत. यंदाचे या स्पर्धांचे २५ वे वर्ष असून मागील वर्षी ४५ शाळांमध्ये ९५०० स्पर्धकांनी विक्रमी सहभाग नोंदविला होता. शाळा शाळांमध्ये पाच दिवसांची निशुल्क प्रशिक्षण शिबिरे घेतल्यानंतर विद्यार्थ्यांची अंतिम स्पर्धेसाठी निवड केली जाते. तसेच ज्या शाळांमध्ये शिबिरे होत नाहीत अथवा मोठा वयोगट यासाठी वैयक्तिक नाव नोंदणी उपलब्ध आहे. खालीलपैकी कोणत्याही क्रमांकावर ८३९०९६५५४५, ९४०३०४९१९०, ९३९३४९४९७९ नोंदणी १८ डिसेंबर पर्यंत करून नाव निश्चित करू शकता असे आवाहन सोलापूर जिल्हा योग परिषदेच्या अध्यक्षा सौ स्नेहल पेंडसे यांनी केले आहे.

# कॅमेरॉन ग्रीन, पाथिराना यांच्यावर धनवर्षा

- आयपीएल लिलावात केकेआरचा धमाका
- प्रशांत वीर, कार्तिक शर्मावरही लक्ष्मी प्रसन्न
- आयपीएल खेळाडूंचा लिलाव धडाक्यात


कॅमेरॉन ग्रीन


मथिशा पाथिराना


प्रशांत वीर


कार्तिक शर्मा

**अबू धाबी, १६ डिसेंबर**

मंगळवारी येथे झालेल्या इंडियन प्रीमियर लीगच्या खेळाडूंच्या लिलावात कोलकाता नाईट रायडर्सने ऑस्ट्रेलियन अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीनसाठी २५.२० कोटी आणि श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज मथिशा पाथिरानासाठी १८ कोटी रुपये खर्च केले. या लिलावात अनकॅप्ड भारतीय खेळाडूंनाही लक्षणीय यश मिळाले.

उत्तर प्रदेश आणि राजस्थानचा २० वर्षीय डावखुरा फिरकीपटू प्रशांत वीर आणि आक्रमक फलंदाज कार्तिक शर्मा यांना चेन्नई सुपर किंग्जने १४.२० कोटी रुपयांना खरेदी केले. ३० लाख रुपयांची मूळ किंमत असलेले दोन्ही खेळाडू आयपीएल लिलावाच्या इतिहासात सर्वाधिक मानधन घेणारे अनकॅप्ड खेळाडू बनले.

जम्मू आणि काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबी दार यालाही दिल्ली कॅपिटल्सने ८.४० कोटी रुपयांना खरेदी केले. दारची सुरुवातीची किंमतही ३० लाख रुपये होती. ग्रीन त्याचा सहकारी मिशेल स्टार्क (२४.७५ कोटी रुपये) याला मागे टाकत आयपीएल लिलावात सर्वांत महागडा परदेशी खेळाडू ठरला. केकेआर आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात जोरदार बोली लागली, त्यामध्ये चेन्नई फ्रँचायझी अखेर पराभूत झाली.

त्यानंतर केकेआरने वेंकटेश अय्यरला खरेदी करण्याचा प्रयत्न केला, परंतु रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ७ कोटी रुपयांच्या बोलीसह अष्टपैलू खेळाडूला त्यांच्या संघात समाविष्ट केले. दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्सने सुरुवातीच्या बोली लावल्यानंतर माघार घेतल्यानंतर तीन वेळा विजेत्या संघाने श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज पाथिरानाला खरेदी करण्याच्या शर्यतीत प्रवेश केला. २ कोटी रुपयांच्या मूळ किमतीसह लिलावात सहभागी झालेला पाथिराना आयपीएलमध्ये विकला जाणारा सर्वांत महागडा श्रीलंकेचा खेळाडू ठरला.

परदेशी खेळाडूंसाठीच्या लिलावाच्या नियमांनुसार, उर्वरित रक्कम बीसीसीआयच्या खेळाडू विकास कार्यक्रमात जाईल. त्यामुळे, या हंगामासाठी त्याचा पगार १८ कोटी (यूएस१.९ दशलक्ष) राहील. यापूर्वी चेन्नई सुपर किंग्जचे प्रतिनिधित्व करणारा पाथिरानाला संपूर्ण रक्कम मिळेल कारण तो पगार मर्यादित आहे. ग्रीन यापूर्वी मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळला आहे. त्याने २९ आयपीएल सामन्यांमध्ये ७०७ धावा केल्या आहेत आणि १६ गडी बाद केले आहेत.

तथापि, स्थानिक क्रिकेटमध्ये उत्कृष्ट फॉर्ममध्ये असूनही, शॉ कोणत्याही फ्रँचायझीला प्रभावित करण्यात अपयशी ठरला. मंगळवारी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सामन्यात मुंबईसाठी २२ चेंडूत ७३ धावा करणाऱ्या सरफराजच्या बाबतीतही असेच घडले. (वृत्तसंस्था)

**सर्वांत महागडे खेळाडू**

| | |
|---|---|
| कॅमेरॉन ग्रीन - | २५.२० कोटी (केकेआर) |
| मथिशा पाथिराना - | १८ कोटी (केकेआर) |
| प्रशांत वीर - | १४.२० कोटी (सीएसके) |
| कार्तिक शर्मा - | १४.२० कोटी (सीएसके) |
| आकिब नबी दार - | ८.४० कोटी (डीसी) |

**भारतीय खेळाडू मालामाल**

| | |
|---|---|
| प्रशांत वीर : | १४.२० कोटी (सीएसके) |
| कार्तिक शर्मा : | १४.२० कोटी (सीएसके) |
| आकिब नबी दार : | ८.४० कोटी (डीसी) |
| तेजस्वी सिंग : | ३ कोटी (केकेआर) |
| मुकुल चौधरी : | २.६० कोटी (एलएसजी) |

## भारताचा मलेशियावर विक्रमी विजय



**दुबई, १६ डिसेंबर -**

अभिज्ञान कुंडूच्या विक्रमी नाबाद २०९ धावा, वेदांत त्रिवेदीच्या ९० धावा, वैभव सूर्यवंशीचे अर्धशतक आणि दीपेश देवेंद्रनच्या पाच बळींच्या मदतीने मंगळवारी झालेल्या १९ वर्षांखालील आशिया कप सामन्यात भारताने मलेशियाचा ३१५ धावांनी पराभव केला.

युवा एकदिवसीय सामन्यात हा भारताचा धावांनी दुसरा सर्वांत मोठा विजय आहे. याआधी २०२२ मध्ये भारताने युगांडाला ३२२ धावांनी हरवले होते. युवा एकदिवसीय सामन्यात नाबाद द्विशतक करणारा अभिज्ञान कुंडू पहिला भारतीय क्रिकेटपटू ठरला. त्याने १२५ चेंडूंचा सामना केला, १७ चौकार आणि नऊ षटकार मारले. त्याच्या दमदार फलंदाजीमुळे भारताला ७ बाद ४०८ धावांचा डोंगर रचता आला. गोलंदाजीत उजव्या हाताच्या मध्यमगती गोलंदाज देवेंद्रनने २२ धावांत पाच बळी घेत मलेशियाच्या फलंदाजीचा कणा मोडला. मलेशिया ३२.१ षटकांत ९३ धावांतच बाद झाला. भारताकडून वैभव सूर्यवंशीने २६ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ५० धावा केल्या. याच स्पर्धेत त्याने यूएईविरुद्ध १७१ धावा केल्या होत्या. चौथ्या क्रमांकावर खेळताना वेदांत त्रिवेदी आणि कुंडू यांनी चौथ्या गड्यासाठी २०९ धावांची भागीदारी केली. कुंडूने त्याच्या डावात ५५ एकेरी धावा केल्या. १७ वर्षीय अभिज्ञान कुंडू दक्षिण आफ्रिकेच्या जोरिच व्हॅन शॉकविकनंतर युवा एकदिवसीय सामन्यात द्विशतक करणारा दुसरा फलंदाज ठरला. या वर्षाच्या सुरुवातीला हरारे येथे झिम्बाब्वेविरुद्ध शॉकविकने १५३ चेंडूत २१५ धावा केल्या. त्रिवेदीने १०६ चेंडूत सात चौकारांसह ९० धावा केल्या. कुंडूने कनिष्क चौहानसोबत पाचव्या गड्यासाठी ८७ धावांची भागीदारी केली.

## मास्टर्स अकादमीची भंडारी स्पोर्टस्‌वर मात

**१२ वर्षांखालील क्रिकेट : लातूरचा गुलबर्गावर दणदणीत विजय**

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

बारा वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत निर्विक बनसोडेच्या पाच बळींच्या जोरावर मास्टर्स क्रिकेट अकादमीने भंडारी स्पोर्टस् अकादमीवर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळविला.


निर्विक


शौर्य


वेदांत


आरोही

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या वतीने ही स्पर्धा डोणगाव येथील पुष्प अकादमीच्या मैदानावर सुरू आहे. डोणगाव येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत भंडारी स्पोर्टस अकादमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १५ षटकांत सर्वबाद ५३ धावांत गुंडाळला. मास्टर्सकडून निर्विक बनसोडे ६ धावांत ५ गडी बाद केले, शौर्य झेंडेकरने १० धावांत ३ बळी टिपले. मास्टर्स क्रिकेट ॲकेडमीने विजयी लक्ष्य ७.१ षटकांत १ गडी गमावित ५५ धावा करीत गाठले. मास्टर्सकडून अरविंद तगेळ्ळी १४ धावा केल्या. निर्वीक बनसोडे सामनावीर ठरला.

दुसऱ्या सामन्यात वेदांत हक्के व आरोही सुरवसेच्या शानदार शतकाच्या जोरावर लातूरच्या रोहन क्रिकेट अकादमीने गुलबर्गाच्या किंगडमवर ३६४ धावांनी दणदणीत विजय मिळविला. रोहन अकादमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत सर्वबाद ४३० धावा केल्या. त्यांच्या वेदांत हक्केने १२९ तर आरोही सुरवसे १५९ धावांची शानदार शतकी खेळी केली. विजयी लक्ष्य किंग्डम गुलबर्गा क्रिकेट ॲकॅडमीस पेलवले नाही. त्यांचा डाव २०.४ षटकांत ६६ धावांत आटोपला. रोहन ॲकॅडमीकडून सिराज फुलारीने १४ धावांत २ तर आश्विन गावणेने ४ धावांत २ गडी बाद केले. आरोही सामनावीर ठरला.

## मॉडेल पब्लिक स्कूलच्या मानस गायकवाडला रौप्य व कांस्य

**शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेतील कामगिरी**




**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

नुकत्याच आगरतला (त्रिपुरा) येथे स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत संपन्न झालेल्या ६ व्या शालेय राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत सोलापुर येथील मॉडेल पब्लिक स्कूलमध्ये शिकत असलेल्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस सुमुख गायकवाड याने १७ वर्षाखालील मुलात वैयक्तिक गटात रौप्य तर सांघिक गटात कांस्यपदक व आकर्षक चषक पटकाविला.

महाराष्ट्र संघाकडून खेळताना मानसने उत्कृष्ट कामगिरी करत सहापैकी साडेचार गुण मिळवीत वैयक्तिक प्रकारात रौप्य पदक प्राप्त केले. महाराष्ट्र संघानेही उल्लेखनीय कामगिरी करत मुलांच्या गटात नऊ गुणांसह तिसरा क्रमांक प्राप्त करत कांस्यपदकाची कमाई केली. महाराष्ट्राने पुन्हा एकदा राष्ट्रीय स्पर्धेत वर्चस्व राखत मुलांच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत कांस्यपदक तर मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक प्राप्त करत दैदीप्यमान यश मिळवले.

महाराष्ट्र संघाने मुलांच्या गटात पहिल्या फेरीत कर्नाटकाचा ४-० ने धुव्वा उडविला तर तेलंगणा, सी.आय.एस.सी.ई., हरियाणा या संघाना ३-१ ने पराभूत करत स्पर्धेत आघाडी घेतली. पाचव्या फेरीत मात्र सीबीएससी संघाकडून निसटता पराभव झाला. परंतु शेवटच्या फेरीत महाराष्ट्राने पंजाब सोबत बरोबरी साधत तिसरे स्थान पटकाविले.

या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने उल्लेखनीय खेळ करून सर्वांचे लक्ष वेधले. मुलांच्या संघात हर्ष घाडगे (छत्रपती संभाजीनगर), मानस गायकवाड (सोलापूर) आरुष चित्रे (नागपूर), अथर्व सोनी (ठाणे) व निहान पोहाणे (नागपूर) यांनी तर मुलींच्या संघात सानी देशपांडे, श्रेया हिप्परगी, सई पाटील, श्रद्धा बजाज व वैष्णवी मानकर यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले.

मानस हा जुळे सोलापुर येथील मॉडेल पब्लिक स्कूल येथे दहावीत शिकत आहे. मानसला क्रीडा शिक्षक रविकिरण आवटे, प्रशिक्षक उदय वगरे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले. मानसने मिळविलेल्या उज्वल यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, संस्था सचिव अमोल जोशी, श्री. साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका आदिती कुलकर्णी, सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, सचिव सुमुख गायकवाड आदींनी कौतुक केले.

# जीएच रायसोनी चषक आंतरराष्ट्रीय गुणांकन जलद बुद्धिबळ स्पर्धा रविवारी सोलापुरात

**दोन लाखांची रोख पारितोषिके**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

जागतिक बुद्धिबळ संघटना, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटना, महाराष्ट्र चेस असोसिएशन व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने जी एच रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन अँड कल्पना प्रकाश वेल्फअर फाउंडेशन यांनी चॅम्प चेस स्कूलच्या सहकार्याने पहिल्या जीएच रायसोनी जलद आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धा राजस्व नगर येथील चैत्राली लॉन्स अँड बँक्वेट हॉल येथे रविवार २१ डिसेंबर रोजी आयोजित केली आहे.

सदर रॅपिड आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत रोख दोन लाख रकमेची भरघोस पारितोषिक तसेच एकूण १२५ बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत. रॅपिड आंतरराष्ट्रीय बुद्धिबळाच्या नियमानुसार सदर स्पर्धा स्वीस लीग पध्दतीने एकूण नऊ फेऱ्यांमध्ये संपन्न होणार असून खेळाडूंना प्रत्येकी १० मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे.

स्पर्धेत प्रथम येणाऱ्या खेळाडूंना प्रथम पाच खेळाडूंना ३१, २५, २०, १५ व १० हजार असे एकूण पंधरा रोख आकर्षक पारितोषिक खुल्या गटात देण्यात येणार आहेत. तसेच विविध रेटिंग कॅटेगिरीमध्ये प्रत्येकी पाच, तसेच ७, ९, ११, १३, १५, १७, १९ वर्षाखालील मुले व मुलीना प्रत्येकी पाच तर ज्येष्ठ खेळाडू व २० ते ५४ वयोगटातील खेळाडूंना देखील प्रत्येकी दहा पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशनचे सचिव भूषण श्रीवास व चैत्राली लॉन्स अँड बँक्वेट हॉलचे मालक सतीश बुरुडकर यांनी दिली.

खेळाडूंच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीसाठी आंतरराष्ट्रीय गुणांकन स्पर्धा एक महत्त्वाचा टप्पा असतो, ज्यामुळे त्यांना जागतिक बुद्धिबळ पटलावर आपले स्थान निर्माण करता येते. या स्पर्धेच्या माध्यमातून सोलापुर जिल्ह्यातील बुद्धिबळपटूंना रॅपिड आंतरराष्ट्रीय गुणांकन मिळवण्यासाठी व वाढवण्यासाठी फायदा होणार असल्याचे सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव व चॅम्प चेस स्कूलचे प्रमुख आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड व आयोजन समितीचे सच्चिदानंद सोमण यांनी यावेळी सांगितले.

इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी (९९६०३७९९१२), उदय वगरे - (८८८८०४५३४४), फिडे पंच अमित टेंभुर्णे (९५१८५६५८४९), प्रेयस अंबाडे (८१८०८७४०५८ यांच्याकडे संपर्क साधावा, असे सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर व आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू व आयोजन समितीचे अतुल कुलकर्णी यांनी कळविले आहे. या बुद्धिबळ खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.



## लोकमंगल समूह क्रीडा महोत्सवात लोकमंगल पतसंस्थेची कामगिरी

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

लोकमंगल समूहाच्या वतीने आयोजित लोकमंगल समूह क्रीडा महोत्सव २०२५ मध्ये लोकमंगल पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले.

**कामगिरी :** सांघिक विजयी : क्रिकेट, कबड्डी, खोखो (पुरुष), खोखो (महिला), रस्सीखेच (महिला). वैयक्तिक : गोळाफेक (पुरुष व महिला, प्रथम व द्वितीय), लांब उडी (महिला, प्रथम व तृतीय), लांब उडी (पुरुष, प्रथम व द्वितीय), १०० मीटर धावणे (पुरुष, द्वितीय), महिला, तृतीय)

# उद्यापासून सुरु होणाऱ्या राज्य खो-खोच्या महासंग्रामासाठी बीड सज्ज

**क्रीडांगणे, भव्य प्रेक्षक गॅलरी, राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी युद्धपातळीवर तयारी**

**बीड, दि. १६ डिसेंबर -**


१८ ते २१ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बीड शहर पूर्णपणे सज्ज झाले असून, आयोजकांकडून युद्धपातळीवर तयारी सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली.

स्पर्धा स्थळ असलेल्या श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात एकाच वेळी सुरळीत सामने पार पडावेत यासाठी ४ स्वतंत्र क्रीडांगणे सज्ज करण्यात येत आहेत. मापदंडानुसार आखणी, दर्जेदार मैदाने व योग्य प्रकाशयोजना यामुळे खेळाडूंना सर्वोत्तम खेळाचे वातावरण उपलब्ध होणार आहे.

राज्यभरातून येणाऱ्या क्रीडाप्रेमींसाठी सुरक्षित व प्रशस्त प्रेक्षक गॅलरी उभारण्यात येत असून, स्पर्धेच्या चारही दिवसांत मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. थरारक व दर्जेदार सामने पाहण्याची पर्वणी प्रेक्षकांना मिळणार आहे.

खेळाडू, प्रशिक्षक व अधिकाऱ्यांसाठी स्वच्छ, पौष्टिक आणि वेळेवर भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच शहरातील ये-जा सुलभ व्हावी यासाठी वाहतूक नियोजन, पार्किंग व्यवस्था व समन्वय पथके तैनात करण्यात आली आहेत.

या स्पर्धेमुळे केवळ उत्कृष्ट खेळाडूंची निवडच होणार नाही, तर बीडच्या क्रीडा व्यवस्थापन क्षमतेचे प्रभावी दर्शन घडेल, असा विश्वास शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त मार्गदर्शक प्रा. जनार्दन शेळके यांनी व्यक्त केला. प्रा. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेशभाऊ शिंदे, सचिव विजय जाहेर, राज्य प्रसिद्धी समिती सदस्य प्रा. राजेंद्र बरकसे, अविशांत कुमकर, तसेच महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सह सचिव वर्षा कच्छवा, योगेश सोळसे, मनोज



जोगदंड, कैलास गवते, अनिल शेळके, माधव जायगुडे, बंडू घोरड, अमोल सांगुळे, प्रफुल्ल हाटवटे, नितीन फुटवाड, रमेश पिसाळ, सुधीर हजारे, नितीन येळवे, अंकुश गायकवाड, संदीप हांगे, बापू तारुकर, ठोकरे, राऊत, घरत यादव, मुंजाराम निरडे, सोमनाथ मंडलिक, छत्रभूज ढेंबरे आदी कार्यकर्ते ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

**सोलापूर जिल्हा पुरुष व महिला खो-खो संघ जाहीर**

सोलापूर : नुकत्याच झालेल्या जिल्हा अजिंक्यपद खो खो स्पर्धेतून बीड येथे १८ ते २१ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या ६१वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेसाठी जिल्ह्याचे संघ सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड यांनी जाहीर केले. हे संघ निवड समिती सदस्य गोकुळ कांबळे, अजित शिंदे व सोनाली केत या निवड समिती सदस्यांनी निवडले. महिला संघाचे सराव शिबिर जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर गणेश पवार तर पुरुष संघाचे सराव शिबिर ह. दे. प्रशालेच्या मैदानावर सुरू आशिष अवधूर्ती हे घेत आहेत. दोन्ही संघास असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

**पुरुष संघ :** जुबेर शेख, प्रतिक शिंदे, अविनाश हरबरे, फराज शेख (उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर), सौरभ चव्हाण, समर्थ कोळी, रोहन रजपूत, निरज कोळी ( किरण स्पोर्ट्स सोलापूर),अजय कश्यप,अजित रणदिवे (अर्धनारी नटेश्वर, वेळापूर ),सुजित मेटकरी, विनायक मुरडे (शिवप्रतिष्ठान, मंगळवेढा) गणेश खानकाळ (न्यू सोलापूर क्लब), रणजित तोडले (आदर्श शेवते, पंढरपूर),अनिकेत पवार (दिनबंधू, मंद्रुप). प्रशिक्षक आशिष अवधूर्ती, संघ व्यवस्थापक : वैभव लिगाडे.

**महिला :** सादिया मुल्ला, अर्चना व्हनमाने, गौरी कासविद, साक्षी हनमाने, सृष्टी रुपनवर, सृष्टी नारायणे( किरण स्पोर्ट्स सोलापूर), समृद्धी सुरवसे, साक्षी देठे, कल्याणी लामकाने, ऋतुजा पासले( कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लब वाडीकुरोली पंढरपूर), प्राजक्ता बनसोडे, वैष्णवी कुडले, अन्वई मंडले, (अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूर),आलिया मुलाणी ( दहिगाव), सृष्टी हडपद ( समृद्धी स्पोर्ट्स सोलापूर). प्रशिक्षक : गणेश पवार, व्यवस्थापक : सोनाली केत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## सोलापूर महानगरपालिका निवडणूक

# दोन ठिकाणी मतदान केल्याचे आढळून आल्यास गुन्हा दाखल करणार

**महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा इशारा**

**मतदान केंद्रांबाबत राजकीय पक्ष पदाधिकाऱ्यांची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ डिसेंबर -**

सोलापूर : निवडणुकीदरम्यान एखाद्या व्यक्तीने दोन ठिकाणी मतदान केल्याचे आढळून आल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल.जे उमेदवार निवडणूक लढवत आहेत, त्यांच्या नातेवाईकांपैकी कोणी महापालिकेमध्ये कार्यरत असल्यास त्यांनी प्रचार सभांमध्ये किंवा प्रचार प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा सहभाग घेऊ नये. तसे आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.



सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानासाठी निश्चित करावयाच्या मतदान केंद्रांच्या अनुषंगाने आज राजकीय पक्षांची बैठक सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्तांच्या दालनात पार पडली. त्यात आयुक्तांनी हे स्पष्ट केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त संदीप कारंजे,उपायुक्त आशिष लोकरे, सहायक आयुक्त गिरीष पंडित आदी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मतदान केंद्रांबाबत राजकीय पक्षांनी उपस्थित केलेल्या विविध सूचना व अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदान केंद्रांची उपलब्धता, नागरिकांची सोय, प्रवेशयोग्यता तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित बाबींवर राजकीय पक्षांनी मते मांडली. या सूचनांचा विचार करून पुढील टप्प्यात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासोबत पुन्हा एक बैठक घेण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### पूर्वपरवानगी न घेता जाहिराती लावू नयेत

शहरातील कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने महापालिकेची पूर्वपरवानगी न घेता जाहिराती लावू नयेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. निवडणूक प्रक्रियेबाबत किंवा अन्य कोणतीही तक्रार असल्यास नागरिकांनी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर तसेच 'माय सोलापूर' ॲपवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

### पदाधिकाऱ्यांनी या केल्या सूचना

ही बैठक शांततेत व सकारात्मक वातावरणात पार पडली असून सर्व राजकीय पक्षांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व कायद्याच्या चौकटीत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. दुबार मतदार होणार नाही याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. संवेदनशील बुथवर करडी नजर ठेवावी. सर्व मतदान केंद्रांवर सोयी सुविधा उपलब्ध कराव्यात. पारदर्शक आणि निर्भय वातावरणात निवडणुका व्हाव्यात यासह विविध सूचना राजकीय पदाधिकाऱ्यांनी केल्या.

पक्ष प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या इतर मुद्द्यांच्या अनुषंगाने जे उमेदवार निवडणूक लढवत आहेत, त्यांच्या नातेवाईकांपैकी कोणी महापालिकेमध्ये कार्यरत असल्यास त्यांनी प्रचार सभांमध्ये किंवा प्रचार प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा सहभाग घेऊ नये. तसे आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्तांनी दिला. यासोबतच मतदान केंद्रांची माहिती, निवडणूक खर्च, जाहिरातींचे नियम व त्यांचे

### राजकीय नेते, प्रतिनिधींची उपस्थिती

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) ॲड. यु.एन बेरिया, काँग्रेस पार्टीचे संजय हेमगड्डी, केशव इंगळे, शिवसेना शिंदे गटाचे अमोल शिंदे, आरपीयाचे राजाभाऊ सरवदे, भाजपचे प्रवीण कांबळे, नागेश गंजी, काँग्रेस पार्टीचे देवा गायकवाड, एमआयएमचे शौकत पठाण, माकपाचे अनिल वासम, नरेश दुगणे, दाऊद शेख, आप चे जुबेर हिरापुरे, निलेश सांगेपाग, अमोल पूदे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे महेश धाराशिवकर, प्रताप चव्हाण, बसपाचे शीलवंत काळे,गणेश डोंगरे, राष्ट्रवादी अजितदादा गटाचे वैभव गंगणे, शिवसेना शिंदे गटाचे अर्जुन सलगर, मुस्ताक शेख, अब्दुल शेख, जनविकास क्रांती सेनाचे गुरनाथ कोळी, श्रीनिवास बोगा यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

---

## आज सांगोल्यात साजरा होणार पेन्शनर डे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ डिसेंबर -**

सांगोला तालुक्यातील सेवानिवृत्त कर्मचारी यांच्यासाठी आज बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी दु.१२.३० वा. सांगोला तालुका पेन्शनर संघटनेचे ऑफिसमध्ये पेन्शनर डे साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शिवानंद भरले, पुणे विभागीय अध्यक्ष सिद्धेश्वर धसाडे, सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष फुलारी, जिल्हा उपाध्यक्ष अरुण पाटील, सरचिटणीस मल्लिकार्जुन बडदाळ उपस्थित राहणार असल्याचे संघटनेचे अध्यक्ष वसंतराव दिघे, सल्लागार शंकर सावंत यांनी सांगितले. तरी सर्व सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संचालक दिनकर घोडके, एकनाथ जावीर यांनी केले आहे. सर्व सेवानिवृत्तांनी आपले हयातीचे फार्म भरून दि.२१ डिसेंबर अखेर पंचायत समिती, सांगोला येथे भरून द्यावेत असे आवाहन संघटनेचे सल्लागार सिद्धेश्वर झाडबुके यांनी केले आहे.

## पालकमंत्री गोरेंच्या नेतृत्वाखाली 'शेकाप'सोबत आगामी निवडणुका लढवणार

**माजी आमदार दिपकआबा साळुंखे-पाटील**

**कार्यकर्ता मेळाव्यात भाजपा प्रवेशाचे संकेत**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ डिसेंबर-**

सत्ता किंवा पदाच्या मागे मी लागणार नाही. शेवटच्या श्वासापर्यंत पद असो किंवा नसो सांगोला तालुक्यातील जनतेची सेवा करत राहणार असून आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली शेकाप सोबत आघाडी करून लढवणार असल्याचे प्रतिपादन माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केले.

ते मंगळवार दि.१६ डिसेंबर रोजी सांगोला येथे आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी जि.प.अध्यक्षा जयमाला गायकवाड, तानाजी पाटील, मधुकर बनसोडे, विजय येलपले, शिवाजी बनकर, डॉ.पियुष साळुंखे, ॲड.यशराजे साळुंखे, अनिल खटकाळे, अनिल खडतरे, सोमनाथ लोखंडे, चंदन होनराव, शिवाजी कोळेकर, राज मिसाळ, विश्वनाथ चव्हाण, विजय पवार, चंद्रकांत चौगुले, योगेश खटकळे, सखुबाई वाघमारे, ॲड.चैत्रजा बनकर, पूजा पाटील, सुनीता खडतरे उपस्थित होते.



पुढे बोलताना दिपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, सांगोला तालुक्यातील साळुंखे पाटील परिवारावर प्रेम आणि विश्वास असणारे तमाम नागरिक म्हणजे आमचे कुटुंब आहे. ३५ वर्षे मी जनतेच्या प्रेम आणि विश्वासावर राजकीय जीवनात काम करत आहे.

युती किंवा आघाडीसाठी मी कधीच कुणाच्या दारात गेलो नाही, त्यामुळे कुणी मला वगळून युती आणि आघाडी करण्याची भाषा करत असेल तर त्यांचा राजकीय पुनर्जन्म माझ्यामुळे झाला आहे हे त्यांनी विसरू नये असा इशारा त्यांनी माजी आ.शहाजीबापू पाटील यांना दिला. याप्रसंगी सांगोला शहरासह तालुक्यातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

**दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या भाजप प्रवेशाची सर्वत्र चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर या मेळाव्यातून ते याबाबत काय बोलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. यावर बोलताना लवकरच कार्यकर्त्यांच्या मनात जे आहे त्याबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी चर्चा करून तसाच निर्णय घेऊ असे सूचक विधान करून भाजप प्रवेशाचे संकेत दिले आहेत.**



## विबोधी फाउंडेशनच्यावतीने दुधनी शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१६ डिसेंबर**

विबोधी महिला फाउंडेशन व शितल परब यांच्या संयुक्त विद्यमाने जि.प.प्रा.मराठी शाळा शिवाजीनगर तांडा दुधनी येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप विबोधी महिला फाउंडेशनच्या वर्षा यादव यांच्या हस्ते केले. प्रारंभी बालकलाकार विबोधी यादव व वर्षा यादव यांचा सत्कार करण्यात आला.

पोमू राठोड म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून विबोधी महिला फाउंडेशनच्या माध्यमातून या शाळेस विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य तसेच गणवेशांचे वाटप केले जात आहे. गोरगरीब कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, शाळेची गोडी लागावी आणि शिक्षण घेत असताना कमतरता भासू नये, या भावनेतून फाउंडेशन सातत्याने कार्यरत आहे. हे कार्य विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत प्रेरणादायी असून पुढील काळातही विविध स्वरूपात शाळेला मदत करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. या कार्यक्रमासवर्षा यादव, बालकलाकार विबोधी यादव, पोमू राठोड, श्रीशैल मलगण, सुरूपसिंग राऊत वपार्वती ढाकरे यांची उपस्थिती लाभली.

## सोलापुरात रस्ते सुरक्षा जागरूकतेस प्रोत्साहन

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

होंडा मोटरसायकल एंड स्कूटर इंडियाने रस्ते सुरक्षा वर्तन वाढवण्यासाठी आपला राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम विस्तारित केला आणि सोलापूर, महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी प्राशाला, नागेश करजगी ऑर्चिड स्कूल आणि दमानी विद्या मंदिर येथे एक प्रभावी रस्ते सुरक्षा जागरूकता मोहिम आयोजित केली. या उपक्रमात २४०० पेक्षा जास्त सहभागी सहभागी झाले आणि सुरक्षित सवारीच्या मूलभूत तत्त्वांविषयी शिकले, ज्यामुळे शिकण्याचे आणि रस्त्यावर सामायिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारे वातावरण तयार झाले. या मोहिमेत सहभागींस उदाहरणाद्वारे नेतृत्व करण्यासाठी आणि इतरांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित केले गेले की, रोजच्या निर्णयांद्वारे ट्रॅफिक नियमांचे पालन केल्यास अपघात टाळता येऊ शकतात आणि जीवन वाचवता येते. छत्रपती शिवाजी प्राशाला, नागेश करजगी ऑर्चिड स्कूल आणि दमानी विद्या मंदिर येथे आयोजित ही मोहिम एचएमएसआयच्या रस्ते सुरक्षा शिक्षण मजबूत करण्याच्या व्यापक मिशनचा भाग आहे. आपल्या जागतिक सुरक्षा घोषवाक्य 'सुरक्षा सर्वांसाठी' या मार्गदर्शनाखाली, होंडा सुरक्षितता आणि गतिशीलता एकत्र चालणाऱ्या या भविष्यात काम करत आहे, शिक्षण आणि सुरुवातीपासूनच संवेदनशीलता निर्माण करून बदल घडवत आहे.



## मनोरमा बँकेचा कारभार आदर्शवत

### वैराग येथे दहाव्या शाखेचा थाटात शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १६ डिसेंबर-**

मनोरमा बँक ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून, सहकार क्षेत्रातील विश्वास, शिस्त आणि आधुनिकतेचे उत्तम उदाहरण आहे. बँकिंग सहकार क्षेत्रातील आधुनिक, पारदर्शक व लोकाभिमुख मॉडेल म्हणून मनोरमा राज्यात गौरव प्राप्त ठरत आहे, असे गौरवोद्गार माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी काढले.

बँकेच्या वैराग येथील दहाव्या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष श्रीकांत मोरे हे होते. माजी सहकार आयुक्त सुनील पवार, माजी आ. राजन पाटील, दिलीप माने यांच्या हस्ते याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मनोरमा मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभाताई मोरे, कार्याध्यक्ष अस्मिता गायकवाड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चेअरमन ॲड. सुरेश गायकवाड, मनोरमाचे ब्रँड अँबेसिडर डॉ. सुमित मोरे, डॉ. मिताली मोरे, निरंजन भूमकर, लेखापरीक्षक व्ही. व्ही. डोके, सतीश पोकळे, कृष्णराज बारबोले, संतोष मोटे, सत्यजित वाघचौरे, मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी, कविता कुलकर्णी, डॉ. विश्वास मोरे, कल्याण शिंदे, रत्नप्रभा गायकवाड, ॲड. विश्वास देवकर उपस्थित होते. यावेळी माजी सहकार आयुक्त पवार, माजी आमदार पाटील, माजी आमदार माने, लेखापरीक्षक व्ही. व्ही. डोके व सतीश पोकळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. पी. बी. रोंगे यांनी आभार मानले. पल्लवी पवार यांनी सूत्रसंचालन केले.

## अक्कलकोट शहरात वाहतुकीचा खोळंबा





**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ डिसेंबर-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत वाहतुकीचा खोळंबा होत आहे. वाहने पार्किंगसाठी अपुरी जागा हा प्रश्न जटील बनला आहे. याचा फटका हा स्थानिक नागरिकांना परगावच्या भाविकांना बसत आहे. परगावच्या भाविकांचीं वाहने ही रस्त्याच्या बाजूला उभी करून दर्शनाला जात आहेत. यावर अंकुश लावण्यात वाहतुक नियंत्रक पोलीसाचे प्रयत्न अपुरे पडत आहेत.

यामुळ पार्किंग व्यवस्थेचा फज्जा उडाला आहे. भाविकांसह या भागातून मार्गक्रमण करणाऱ्याना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नगर पालिका व पोलीस प्रशासनाकडून पार्किंग व्यवस्थेसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांतून परगावच्या भाविकातून केली जात आहे. अक्कलकोट शहरात अक्कलकोट निवासी दत्त अवतार श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी पोर्णिमा सलग सुट्टी दिवशी शनिवारी, रविवारी गुरुवारी परगावच्या भाविकांची प्रचंड गर्दी होते. शनिवार, रविवार परगावच्या भाविकांच्या वाहनांच्या रांगा या शहरात सर्वत्र पहावयास मिळत होत्या. शहरातील हत्ती तलाव परिसरात बायपास रस्त्याच्या दोन्ही बाजूने वाहने लावण्यात आल्याने या परिसरात वाहतुकीची मोठी कोंडी झाली होती. शनिवारी रात्री या परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. परगावचे भाविक भक्त हे सर्रासपणे चार चाकी वाहनातून येत आहेत. परगावच्या वाहनांना वाहन तळाची व्यवस्था नसल्याने ही वाहने रस्त्याच्या बाजूलाच उभी करून दर्शनाला जात आहेत. यामुळे भाविक दर्शन घेऊन परत येईपर्यंत वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. पोलीस प्रशासन हे गर्दीच्या वेळी तात्पुरत्या स्वरूपात श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ परिसरात उपाययोजना करत असते. पण हल्ली सलग गर्दी पडत असल्याने परगावच्या भाविकांच्या वाहनांसाठी वेगळ्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था पोलीस प्रशासनाला करावी लागणार आहे. यासाठी पोलीस प्रशासन आणि नगरपरिषदेने उपाययोजना करून अक्कलकोट आतील स्थानिक नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली जात आहे. अक्कलकोट शहरात परगावच्या वाहनांची गर्दी रोखण्यासाठी मैंदर्गी रोड बायपासद्वारे श्री स्वामी समर्थ मंदिराकडे वाहनांना प्रवेश द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांतून केली जात आहे.

## निधन वार्ता...

### सुधाकर पोफळे



**श्रीपूर, दि. १६ डिसेंबर-**

श्रीपूर (ता.माळिशरस) येथील सुधाकर महादेव पोफळे यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले. श्रीपूर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

### अरुण तिकुटे



**माळिशरस, दि. १६ डिसेंबर-**

भांबुर्डी येथील अरुण रामचंद्र तिकुटे यांचे (वय ७० वर्षे) निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते विमा प्रतिनिधी नवनाथ तिकुटे यांचे वडील होते.

### नागनाथ माने



**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

नागनाथ विठ्ठल माने ( वय ७८ रा. तेलगाव सीना, ता. उत्तर सोलापूर) यांचे मंगळवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### भागीरथी पवार



**बार्शी, दि. १६ डिसेंबर-**

शहरातील अण्णाभाऊ साठेनगर येथील जुन्या पिढीतील श्रीमती भागीरथी (भागूनानी) अंबऋषी पवार (वय ११०) यांचे मंगळवार दि. १६ रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. भवानी पेठमधील तुळजाभवानी (तळावरची देवी) मंदिरातील पुजारी भारत पवार यांच्या त्या आजी होत.

## गावगाड्याचा कणा असलेला प्रशासनाचा दूत

**पोलीस पाटील दिन विशेष**
**नंदकुमार जगदाळे**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१६ डिसेंबर-**

राज्यातील महसुली गावांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाकडून पोलीस पाटील हे पद निर्माण करण्यात आले आहे. गावातील नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून पोलीस पाटील कार्यरत असतात. स्थानिक पातळीवर प्रशासनाची जबाबदारी पार पाडताना त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

दि. १७ डिसेंबर १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील अधिनियमास तत्कालीन राज्यपालांनी मंजुरी दिली. त्या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून १७ डिसेंबर हा पोलीस पाटील दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी राज्यात ५० वा पोलीस पाटील दिन साजरा होत आहे. पोलीस पाटील दिन केवळ कौतुका पुरता मर्यादित न ठेवता, या पदाचे महत्त्व अधोरेखित करून त्यावर सकारात्मक चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे. तालुका स्तरावर संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये पोलीस पाटलांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेणे, वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेणे गरजेचे आहे. तसेच हक्क, अधिकार व जबाबदाऱ्यांची जाणीव करून देत, कर्तव्य बजावताना झालेल्या त्रुटींवर आत्मपरीक्षण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस पाटील याचा सन्मान केल्यास नवचैतन्य व प्रेरणा मिळते. एकूणच हा दिवस इतिहास व कार्याला उजाळा देणारा आहे.

### पोलीस पाटलांच्या कार्याची दखल

सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी गत वर्षी जिल्ह्यातील ९५० पोलीस पाटलांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान केला. यंदा सुद्धा करण्यास संगितले आहे. कोरोना महामारी, महापूर व अतिवृष्टीसारख्या आपत्तीच्या काळात पोलीस पाटलांनी बजावलेली भूमिका उल्लेखनीय आहे. अनेक वेळा रात्रंदिवस सेवा देत त्यांनी पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला. त्यांच्या प्रलंबित मागण्या शासन स्तरावर मार्गी लावण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

**- सैपन बेगडे,**
कार्याध्यक्ष, गाव कामगार पोलीस पाटील संघ, सोलापूर जिल्हा

### पोलीस पाटील म्हणजे आमचा शासकीय सहकारीच

पोलीस पाटील हे गावातील शासनाचा महत्त्वाचा घटक आहेत. मंद्रूप पोलीस ठाण्याने पोलीस पाटलांना सन्मानाने जगण्याची संधी दिली असून, त्यामुळे पोलीस ठाणे व शासनावरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होते. ग्रामस्थ आणि पोलीस ठाणे यांच्यात दुवा म्हणून पोलीस पाटील महत्त्वाची भूमिका बजावतात.

**- विलास यामावर,**
उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकोट विभाग.



नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री



# डॉ. मोहन यादव का अभ्युदय मध्यप्रदेश

## अभूतपूर्व अधोसंरचना विकास

### सड़क नेटवर्क- बेहतर होती कनेक्टिविटी

- वर्ष 2025-26 में 4078 कि.मी. लंबी सड़कों के निर्माण और अगले 5 वर्ष में 1 लाख कि.मी. सड़कों के निर्माण का लक्ष्य
- उज्जैन-जावरा के मध्य 4-लेन ग्रीनफील्ड एक्सेस कंट्रोल्ड हाई-वे निर्माण के लिए ₹5 हजार करोड़ से अधिक की स्वीकृति
- ₹1692 करोड़ की लागत से बनने वाले उज्जैन-इन्दौर 6-लेन मार्ग का भूमिपूजन
- ₹3589 करोड़ की लागत से भोपाल-कानपुर इकोनॉमिक कॉरिडोर को 4-लेन में अपग्रेड करने की स्वीकृति
- 6-लेन आगरा-ग्वालियर राष्ट्रीय हाई-स्पीड कॉरिडोर परियोजना स्वीकृत
- वर्तमान में ₹ 48,178 करोड़ की 73 राष्ट्रीय राजमार्ग परियोजनाएं निर्माणाधीन
- मुख्यमंत्री ग्राम सड़क योजना अंतर्गत 8565 गांव सड़कों से जुड़े
- मुख्यमंत्री मजरा-टोला सड़क योजना के तहत 20,650 छोटे गांवों में 30,900 कि.मी. पक्की सड़कें बनेंगी, जिसके लिए ₹21,630 करोड़ की स्वीकृति

### वायुसेवा और क्षेत्रीय संपर्क



- रीवा, दतिया और सतना हवाई अड्डे का लोकार्पण
- विंध्यवासियों को सौगात, रीवा-दिल्ली और रीवा-इंदौर हवाई सेवा प्रारंभ
- उज्जैन हवाई अड्डे के विकास अनुबंध पर हस्ताक्षर
- ग्वालियर से बेंगलुरु,अहमदाबाद, दिल्ली और अयोध्या के लिए वायु सेवा प्रारंभ

आकल्पन : म.प्र. माध्यम/2025



### रेल और मेट्रो सेवा का विस्तार

- प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी द्वारा प्रदेश के 6 अमृत स्टेशन- शाजापुर, नर्मदापुरम, कटनी साउथ, श्रीधाम, सिवनी और ओरछा का लोकार्पण
- इंदौर में मेट्रो सेवा शुरू, भोपाल में शीघ्र शुरू होगा संचालन
- इंदौर-उज्जैन के मध्य शुरू होगा मेट्रो ट्रेन संचालन
- प्रदेश में बनेगा रेल मैन्युफैक्चरिंग सेंटर, भारत अर्थ मूवर्स लिमिटेड (BEML) को सौंपा गया भूमि आबंटन पत्र। रायसेन के उमरिया में होगी स्थापना

### नवीकरणीय ऊर्जा और क्षमता वृद्धि

- मुरैना में पहली सोलर प्लस स्टोरेज परियोजना ₹ 2.70 पैसे प्रति यूनिट की दर से बिजली प्राप्त
- प्रदेश में 2000 मेगावॉट सौर पार्क व 1000 मेगावॉट कंपोजिट ऊर्जा भंडारण परियोजना स्थापित किए जाने की स्वीकृति
- ओंकारेश्वर 278 मेगावॉट फ्लोटिंग सोलर पावर प्रोजेक्ट से विद्युत उत्पादन प्रारंभ
- 880 मेगावॉट क्षमता की आगर और नीमच सौर परियोजना प्रारंभ
- बिजली उपभोक्ताओं की सुगमता के लिए समाधान योजना प्रारंभ
- उद्योगों सहित सभी गैर-कृषि उपभोक्ताओं को 24 घंटे तथा कृषि उपभोक्ताओं को प्रतिदिन औसतन 10 घंटे बिजली प्रदाय

### सिंचाई परियोजनाएं और जल संसाधन

- प्रदेश में लगभग 55 लाख हेक्टेयर क्षेत्र सिंचित। वर्ष 2025-26 तक 65 लाख हेक्टेयर और वर्ष 2028-29 तक 1 करोड़ हेक्टेयर तक सिंचाई क्षमता बढ़ाने का लक्ष्य
- प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी द्वारा देश की पहली नदी-जोड़ो केन-बेतवा लिंक परियोजना का भूमिपूजन। पार्वती-कालीसिंध-चंबल लिंक परियोजना को लेकर त्रि-पक्षीय समझौता और ताप्ती बेसिन मेगा रीचार्ज परियोजना के लिए महाराष्ट्र के साथ एमओयू
- "पर ड्रॉप मोर क्रॉप" के उद्देश्य की पूर्ति के लिए 133 वृहद एवं मध्यम प्रेशराइज्ड सूक्ष्म सिंचाई प्रणाली आधारित परियोजनाएं निर्माणाधीन
- ₹2489 करोड़ से अधिक की लागत से तराना में नर्मदा-क्षिप्रा बहुउद्देशीय माइक्रो उद्वहन सिंचाई परियोजना का लोकार्पण। इससे 100 ग्रामों की 30218 हेक्टेयर भूमि में सिंचाई सुविधा उपलब्ध होगी
- माइक्रो सिंचाई में मध्यप्रदेश देश में अग्रणी राज्य





## विकास और सेवा के 2 वर्ष

मध्यप्रदेश जनसम्पर्क द्वारा जारी

मध्यप्रदेश अपने बेहतर कल की बुनियाद बना रहा है, जहां सड़क, रेल, हवाई सेवा और ऊर्जा के क्षेत्र में अभूतपूर्व तरक्की हो रही है। विकसित भारत का संकल्प तीव्र विकास, उत्कृष्ट कनेक्टिविटी और पर्याप्त संसाधन से ही संभव होगा। मध्यप्रदेश प्रगति की नई तस्वीर बना रहा है।

**- डॉ. मोहन यादव**
मुख्यमंत्री, मध्यप्रदेश

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर मनपासाठी ३ लाख २१ हजार ३५४ मतदार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** होऊ घातलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण ३ लाख २१ हजार ३५४ मतदार आपला मतदानाचा अधिकार बजावणार आहेत.

महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सोमवार, दि. १५ डिसेंबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली. या यादीनुसार शहरात ३ लाख २१ हजार ३५४ मतदार आहेत. लातूर शहर महानगरपालिकेत १८ प्रभागातून एकूण ७० नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. शहरात सर्वात जास्त २० हजार ५९४ मतदार प्रभाग क्रमांक ८ मध्ये आहेत. तर सर्वात कमी १२ हजार ४७५ मतदार प्रभाग क्रमांक १८ मध्ये आहेत. मनपा निवडणुकीचीराजकीय पक्षांच्या उमेदवार-नेत्यांप्रमाणे सामान्य मतदारांनाही चांगलीच उत्सुकता लागून राहिली आहे.

नागरिकांना आपल्या अनेक नागरी समस्यांची सोडवणूक करण्याकरिता जायला मागच्या तीन वर्षांहून अधिक काळापासून लोकप्रतिनिधीच नाहीत. प्रशासन सामान्य नागरिकांच्या समस्यांकडे तेवढ्या पोटतिडकीने पाहत नसल्याचाकटू अनुभव नागरिकांनी या काळात भरपूर घेतला आहे. त्यामुळे एकदा मनपाची निवडणूक झाली की, आपल्या अडचणींची सोडवणूक करायला नगरसेवक उपलब्ध असतात, असा लोकांचा आजही विश्र्वास आहे.



# मनपा निवडणुकीची लगीनघाई सुरू

## – आरक्षित जागांवर इच्छुक उमेदवारांनी पुढे केल्या आपल्या 'गृहलक्ष्मी'
## – चुरशीच्या होणाऱ्या या निवडणुकीवर अनेकांचा 'डोळा'

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, १६ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीची लगीन-घाई अखेर सुरु झाली. होऊ घातलेल्या या निवडणुकीसाठी अनेक महिन्यांपासून नव्हे तर अनेक वर्षांपासून तयारीला लागलेल्या अनेक इच्छुक उमेदवारांचे प्रभाग आरक्षित झाल्याने त्यांनी हार न मानता आपल्याऐवजी आपल्या 'गृहलक्ष्मी'ला पुढे करण्याचा निर्णय घेतल्याचे एकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे. राज्यातील चुरशीच्या होणाऱ्या काही मोजक्या महापालिकांमध्ये लातू-रचाही समावेश असल्याने या निवडणुकीवर अनेकांचा 'डोळा' असल्याचे निदर्शनास येत आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम सोमवारी निवडणूक विभागाने घोषित केला. दि. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने या निवडणुका आता कोणत्याही परिस्थितीत पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगासह सर्वच प्रमुख राजकीय पक्षही कामाला लागले आहेत.

लातूर मनपाची मुदत संपून जवळपास तीन साडेतीन वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. त्यामुळे या निवडणुकांची तयारी अनेक इच्छुक-संभाव्य नगरसेवकांनी फार पूर्वीपासून सुरु केली होती. नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी पुढाकार घेण्याबरोबरच प्रभागात-वॉर्डात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणे, महिला मतदारांची मते मिळवण्यासाठी महिलांसाठीचे विविध उपक्रम प्राध्यानाने आयोजित करणे यासारख्या गोष्टी शहरा-तील अनेक प्रभागात आतापर्यंत केल्या गेल्याचे पाहण्यात आले आहेच. मात्र, अचानकपणे आरक्षणात प्रभाग महिला गटांना सुटल्याने इच्छुकांचा काहीक्षण भ्रमनिरास झाला. परंतु दुसऱ्याच क्षणाला त्यांनी आरक्षित जागेवर आपण नाही तर नाही, आपल्या अर्धांगिनीला 'गृहलक्ष्मी' ला पुढे करण्याच्या तयारीला लागले आहेत. यामध्ये तूर्तास आपण कोणाही अशा इच्छुकांच्या नावाचा उल्लेख करणे हेतुतः टाळत आहोत. यामध्ये माजी उपमहापौरांसह अनेक जण सामील आ-हेत, एवढे आम्ही सांगू इच्छितो.

लातूर शहर महानगरपालिका निवडणूक दोन्ही माजी मंत्री काँग्रेसचे अमित देशमुख आणि भाजपचे माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची आहे. मागच्या मनपात संभाजी पाटलांच्या नेतृत्वात भाजप-ने पहिल्यांदा मनपावर ताबा मिळवला होता. या निवडणुकीतही त्याची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न संभाजी पाटील यांचा असणार आहे. तर मागच्या वेळेला झाले ते आता होऊ द्यायचे नाही असा चंग आ. अमित देशमुख यांनी बांधला आहे. त्यामुळे ही निवडणूक अपेक्षेपेक्षाही अतिशय चुरशीची होण्याचे संकेत मिळत आहेत. त्यातच मावळत्या पालिकेतील महापौर - उपमहापौर या दोघांनीही आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

त्यामुळे मनपा निवडणुकीत खिजगिणतीतही नसलेली अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आता आव्हानात्मकरित्या पुढे येण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रित लढणार असल्याचे सांगण्यात आल्याने भाजपकडून आपल्याला हवे असलेले प्रभाग पदरात पाडून घेण्याचे काम राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केलेल्या या नूतन पदाधिकाऱ्यांना करावे लागणार आहे.

महायुतीकडून स्थानिक स्वराज्यच्या निवडणुका एकत्रित लढविण्याचे संकेत देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्या - त्या ठिकाणच्या संबंधितांच्या ताकदीवर महायुती की एकट्याने लढायचे याचा निर्णय घेतला जाईल, असेही दिसून येत आहे.

महाविकास आघाडीही एकत्रित लढणार की प्रत्येक घटक पक्ष स्वतंत्रपणे याकडेही सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. या निवडणुकीत लातूर मनपात नेहमीच्या चर्चित चेहऱ्यांऐवजी त्यांच्या ' गृहलक्ष्मी' सभागृहात अवतीर्ण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

अर्थात आता हे सगळे मतदार राजाच्या हातात आहे. मतदारही आपल्या प्रभागाच्या - परिसराच्या समस्या सक्षमपणे सोडविण्यास कोण खंबीर आहे, हे पाहूनच आपल्या 'मता'चे 'दान' कोणाच्या पारड्यात टाकायचे याचा निर्णय घेणार आहेत, हे काही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.



## कै.शिवराज पाटील चाकुरकरांना काशी विश्वेश्वर मंदिरात श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** विशाल नगर लातूर येथील काशी विश्वेश्वर मंदीर सभागृहात वीरशैव लिंगायत समाज बांधवाच्या व शिवभक्तांच्या वतीने देशाचे माजी गृहमंत्री कै.शिवराज पाटील चाकुरकर यांना भाव-पूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शिवराज पाटील यांचे विशाल नगर लातूर येथील काशी विश्र्वेश्र्वर मंदीर उभारणी व विद्यार्थी वसतिगृह उभारणीमध्ये मोलाचे योगदान लाभले आहे. देवस्थानच्या वतीने त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी काशी विश्र्वेश्र्वर मंदीर व्यवस्था प्रमुख वीरशैव लिंगायत समाजाचे मन्मथअप्पा काशीनाथअप्पा पंचाक्षरी,

ॲड गंगाधर हामणे, बसवंतअप्पा भरडे, बाबुराव वडगावे, जगन्नाथ कोळंबे, प्रा. करबसप्पा पोपडे, ओमकार पंचाक्षरी, बालाजी पिंपळे, ओमप्रकाश झुरळे, मल्लिकार्जुन मेंगशेट्टे, किशोर शेटे, खराडे गुरुजी, भुसने गुरुजी, शरणप्पा अंबुलगे गुरुजी, त्र्यंबक गुरुनाथ स्वामी, ब्रम्हानंद स्वामी साकोळकर, अनिल स्वामी हरंगुळकर, बसवेश्वर स्वामी कोकलगे, शरणप्पा दावणगिरे, शिवकुमार संग्राम स्वामी. महिला भगिनी वांगसकर, उपासे, स्वामी, बाळापुरे, चव्हाण, माने, ऊळागड्डे, कोरे यांच्यासह अनेक महिला पुरुष उपस्थित होते.



## तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनच्या वतीने महिलांना शिलाई मशीनचे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** महिलांच्या सबलीकरणासाठी तसेच त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशन, धाराशिवच्या वतीने नुकतेच लातूर तालुक्यातील चिंचोलीराव वाडी येथील महिलांना अल्पदरात शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी चिंचोलीराव वाडीचे सरपंच दत्ता फुलचंद सप्ताळ, उपसरपंच अनुसया व्यंकट पिंपरे, ग्रामविकास अधिकारी आर.के. मठपती, अरविंद दिवशे, तांबोळी मॅडम, प्रतिभा मॅडम फाऊंडेशनचे अध्यक्ष मदन कावळे, राघव गडकर, जिल्हा समन्वयक कल्याणी हाके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनच्या वतीने लातूर जिल्ह्यातील महिलांना सक्षम करण्याच्या उद्देशाने अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांनाही लॅपटॉपसह अन्य आवश्यक साहित्य अल्पदरात वितरित केले जाणार आहे. त्यासाठीही संस्थेच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न आणि सहकार्य केले जात आहे. ही संस्था महिला सबलीकरण, आरोग्य, कृषी, पर्यावरण या विषयावही अग्रक्रमाने काम करते. संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती मदन कावळे यांनी दिली. या उपक्रमाबद्दल बोलताना सरपंच दत्ता सप्ताळ यांनी समाधान व्यक्त करून अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम करणे शक्य होणार असल्याचे सांगितले.

# लघुपटासारख्या कलाकृतींमधून प्रबोधन महत्वाचे : तांबे

## दयानंद सभागृहात तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** लघुपटासारख्या कलाकृतींमधून होणारे समाज प्रबोधन अतिशय महत्वाचे असल्याचे प्रतिपादन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्था व अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिवलच्या उद्धाटनप्रसंगी लातू-रचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमास दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमन लाहोटी, सचिव रमेश बियाणी, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड तसेच दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मानिकर, कार्यक्रमाचे प्रायोजक श्री. आदित्य सोनवणे (हॉटेल कन्हैया), दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्रा-चार्य डॉ. अंजली जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अमोल तांबे म्हणाले की, पूर्वी फिल्मनिर्मिती ही काही मोजक्या कुटुंबांपुरती मर्यादित होती; मात्र आज प्रत्येकाला संधी उपलब्ध आहे. समाजातील छोट्या-छोट्या विषयांवर आधारित फिल्म्समधून जनजागृती व समाजप्रबोधन करता येते. विविध गुन्हे-गारी घटनांवर आधारित चित्रपट तयार केल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांचे स्वागत कार्यक्रमाचे प्रायोजक आदित्य सोनवणे यांनी केले. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमनजी लाहोटी यांचे स्वागत अभिजात फिल्म सोसायटीचे उपाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी, तर सचिव रमेश बियाणी यांचे स्वागत दयानंद कला महाविद्यालयाच्या निमेशन विभाग प्रमुख व अभिजात फिल्म सोसायटी समिती सदस्य डॉ. दुर्गा शर्मा यांनी केले.

या फिल्म फेस्टिवलमध्ये १२ वेगवेगळ्या देशांतून २५० शॉर्ट फिल्म्स दाखल झाल्या असून त्यामध्ये शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, व्हिडिओ साँग व निमेशन अशा प्रकारांचा समावेश आहे. त्यापैकी निवडक १०० फिल्म्स तीन दिवसांत प्रदर्शित करण्यात येणार आहेत. या फिल्म्सचे परीक्षण जागतिक दर्जाच्या परीक्षकांमार्फत करण्यात आले असून यामध्ये सुप्रसिद्ध फिल्म दिग्दर्शक संतोष पठारे व फिल्म निर्देशक नीलेश कुंजीर



यांचा समावेश आहे. निवड झालेल्या उत्कृष्ट फिल्म्सना फेस्टिवलच्या शेवटच्या दिवशी पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.


स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या फेस्टिवलमध्ये स्थानिक आठ फिल्ममेकरांनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. विश्र्वास शेंबेकर यांनी अभिजात फिल्म सोसायटीची माहिती देत फिल्म फेस्टिवल आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. पुणे व मुंबईप्रमाणे लातूरमध्येही फिल्म फेस्टिवलचे वातावरण निर्माण करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमन लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी फेस्टिवलसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार अभिजात फिल्म सोसायटीचे सचिव डॉ. स्वप्निल देशमुख यांनी मानले.


हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. स्वप्निल देशमुख, धनंजय कुलकर्णी, डॉ. दुर्गा शर्मा, आदित्य कुलकर्णी, प्रथमेश जाधव, अभिषेक बुचके व डॉ. श्रीनिवास कुलकर्णी यांनी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. दयानंद कला महाविद्यालयातील निमेशन विभागातील विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून मोलाची भूमिका बजावली.

# जागतिक ध्यान दिनी शंभरी गाठलेल्या लातूरच्या ऐतिहासिक गंजगोलाईत सामुदायिक ध्यान उपक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १६ डिसेंबर :** संयुक्त राष्ट्राने २१ डिसेंबर हा 'जागतिक ध्यान दिवस'





म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर लातूरच्या गंजगोलाई परिसरात भव्य सामुदायिक ध्यान उपक्रम राबविला जात आहे. रविवार, २१ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता गंजगोलाई परिसरात भव्य सामुदायिक ध्यान उपक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. यामुळे गंजगोलाईचा इतिहास, संस्कृती आणि शांततेचा संदेश जगभर पोहोचणार असून या उपक्रमात लातूरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा आवाहन करण्यात आलं आहे. या उपक्रमामुळे लातूरची ऐतिहासिक ओळख जागतिक स्तरावर अधोरेखित होणार आहे.

गंजगोलाईच्या मध्यभागी एकत्र येणाऱ्या १६ रस्त्यांवरून विविध सामाजिक संस्था, संघटना तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आ-हेत. विशेष बाब म्हणजे या १६ विविध रस्त्यावर ध्यानासाठी बसणाऱ्यांची जबाबदारी १६ विविध संघटनांनी घेतलेली आहे. इतिहास, संस्कृती आणि शांततेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे संपूर्ण परिसर ध्यानमय होणार आहे. यामुळे मानवी मनाला शांतीचा मार्ग दाखविणाऱ्या ध्यानसाधनेच्या माध्यमातून लातूरची नवी ओळख जगासमोर मांडली जात आहे. या ध्यान साधनेतून शारीरिक व मानसिक स्वास्थ्य, सामाजिक ऐक्य, तणावमुक्त जीवन, अहिंसामुक्त परिसर याच्यासाठी ह्या ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आ-लेले आहे.

गंजगोलाई ही केवळ बाजारपेठ नसून, शहर रचनेचा एक अद्वितीय नमुना आहे. शंभर वर्षांपूर्वी स्थानिक व्यापाऱ्यांच्या दूरदृष्टीतून साकारलेली ही गोलाकार बाजारपेठ आज जागतिक ध्यान दिनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या उपक्रमामुळे ध्यान साधनेचा अनोखा 'लातूर पॅटर्न' निर्माण होत असून, लातूरकरांची एकजूट आणि सांस्कृतिक वारसाही अधोरेखित होणार आहे.

जागतिक ध्यान दिनानिमित्त आयोजित या सामुदायिक ध्यान उपक्रमात समाजातील सर्व घटकांचा सहभाग नोंदविला जात असून, गंजगोलाईचा ऐतिहासिक वारसा आणि लातूरची शांतताप्रिय संस्कृती जागतिक पातळी-वर पोहोचत आहे. त्यामुळे २१ डिसेंबर रोजी मोठ्या संख्येने प्रत्येक लातूरकराने सामुदायिक ध्यान उपक्रमात हजेरी ला-वून ऐतिहासिक गंजगोलाईचा जागतिक नावलौकिक वाढवू या, आणि लातूरच्या संस्कृतीचा अभिमान अधिक तेजाने जगभर पसरवू या असे आवाहन केलं आहे.

## 'आपले न्यायालय-आपली जबाबदारी' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :**लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या विशेष प्रयत्नांतून राबविण्यात आलेल्या 'आपले न्यायालय-आपली जबाबदारी' उपक्रमास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाच्या माध्यमांतून अनेक प्रलंबित कामांचा निपटारा करण्यात आला.

अपुऱ्या मनुष्यबळामुळे न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे. परिणामतः लोकांना न्याय वेळेत मिळणे अवघड होते. त्यामुळे आपोआपच कामकाजाचा ताणही वाढतो. ही बाब लक्षात घेऊन न्या. संजय भारूका यांनी हा अनोखा उपक्रम राबविला. दि. १३ डिसेंबर रोजी लोक अदालतीच्या दिवशी सदर उपक्रम राबविला गेला. या उपक्रमाला न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी अत्यंत चांगला प्रतिसाद दिला. न्या. संजय भारूका यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सामान्य लोकांना न्यायालयीन कामकाज, कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणींची फारशी कल्पना नसते. न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही त्यांना येणाऱ्या अडचणी समस्या आपल्या वरिष्ठांशी शेअर कराव्यात, त्यांनी आपल्या अडचणी सांगितल्या तर त्यावर योग्य तो पर्याय निवडणे सोपे होऊन न्यायप्रक्रियाही गतिमान करणे सुलभ होऊ शकते, असे सांगितले. या उपक्रमाबद्दल न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही हा अभिनव उपक्रम यशस्वी झाल्याच्या भावना बोलून दाखविल्या. या उपक्रमात न्या. एस.टी. त्रिपाठी, एस.व्ही. जाधव, व्ही.एस. मोरे, पी.पी. केस्तीकर, व्यंकटेश गिरवलकर यांसह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

https://epaper.dainiktarunbharat.com/





# बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत किलबिलचे २७ विद्यार्थी यशस्वी

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १६ डिसेंबर :** डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला असून त्यामध्ये किलबिल नॅशनल स्कूल शाळेचे इयत्ता ६ वी वर्गाचे १३ तर ९ वी वर्गाचे १४ असे एकूण २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर इयत्ता ६ वी वर्गाचा चितेजस मंगेश रणखांब व नरेंद्र रवी तोरणे यांची पुढे होणाऱ्या विभागीय प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता सहावी मधून श्रीनाथ ज्ञानेश्वर पोतदार, स्वराज माधव केंद्रे, आराध्या अनिल भिंगोले, संस्कृती नागनाथ केंद्रे, स्वराज शामसुंदर आगलावे, श्रेयश धनंजय माने, करणराज किशोर कानवटे, श्र्लोक सिताराम जाधव, सोहम मयूर शेटकर, मनस्वी चंद्रकांत लोंढे, अरुंधती सचिन गरजे, आर्या गजानन गंगणे, अश्मिरा असद शेख व इयत्ता नववी मधून हर्षद कैलास क्षीरसागर, राधेश्याम कैलासराव मुळगीर, दिनेश विलासराव देशमुख, माही जयप्रकाश कांबळे, आलियान मतीन सय्यद, मैथिली दयानंद राठोड, राधिका संभाजी आरदवाड, प्रेरणा माधव लोंढ, प्रांजल भगवान मुसळे, अंजली सिद्धेश्वर गुट्टे, आर्या सूर्यकांत साकोळे, सानिका गजानन कल्याणे, गौरवी शंकरराव अबरबंडे, नम्रता नागनाथ नागरगोजे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सदरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेतील सर्व विज्ञान शिक्षकाचे मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करून पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांच्या पिढीजात प्रश्नाला कायमचा मार्ग

## आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला मिळाले अखेर यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १६ डिसेंबर :** शेतकऱ्यांच्या पिढ्यान्पिढ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर निर्णायक तोडगा काढत मुख्यमंत्री बळीराजा शेत,पाणंद रस्ते योजना अखेर अस्तित्वात आली असून गेल्या ४-५ वर्षांपासून आ. अभिमन्यू पवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. या योजनेची कार्यपद्धती स्पष्ट करणारा शासकीय आदेश निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या योजनेसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना या नावाने स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करण्यात आले आहे. आगामी अर्थसंकल्पामध्ये या लेखाशिर्षासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी १५ वा वित्त आयोग, ग्रामपंचायतींना मिळणारे अनुदान व स्वउत्पन्न, आमदार व खासदार निधी, मूलभूत सुविधा २५१५ निधी, इतर जिल्हा योजना अशा एकूण १४ योजनांच्या अभिसरणातून निधी उपलब्ध करून घेता येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तसेच वनविभाग यांपैकी कोणत्याही विभागामार्फत करता येणार आहे.



### विकासाभिमुख दृष्टीकोनाचे ठळक उदाहरण : आ. पवार

शेतकरी आणि ग्रामीण विकास हा माझ्या राजकारणाचे केंद्रबिंदू आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शेतरस्ते व पाणंद रस्त्यांच्या प्रश्नासाठी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला आहे. या अट्टाहासातूनच मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आली. शेतकऱ्यांच्या पिढीजात प्रश्नाला कायमस्वरूपी तोडगा देणारा हा निर्णय त्यांच्या संवेदनशील नेतृत्वाचे आणि विकासाभिमुख दृष्टिकोनाचे ठळक उदाहरण ठरतो, असे मत आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

शेतरस्त्यांची मोजणी तातडीने व निशुल्क करून देण्यात येणार असून, तहसीलदारांनी आदेशित केलेल्या शेत, पाणंद रस्त्याच्या कामासाठी किंवा अतिक्रमण काढण्यासाठी आवश्यक असलेला पोलीस बंदोबस्तही विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शेतरस्त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर मनरेगा किंवा बिहार पॅटर्न अंतर्गत रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. तसेच या योजनेअंतर्गत तयार झालेल्या रस्त्याचे नुकसान करणाऱ्यांवर शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी कठोर कारवाई करण्यात येणार आहे.योजनेत सुसूत्रता आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी विधानसभा सदस्यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभा क्षेत्रस्तरीय, पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आणि महसूलमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. याशिवाय, या योजनेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री बळीराजा शेत,पाणंद रस्ते योजना शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरणार असून, पिढ्यान्पिढ्यांपासून प्रलंबित असलेला शेतरस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच या सर्व सुधारणा प्रभावीपणे राबविणारे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# स्वामी समर्थांचे वास्तव्य असलेल्या सभागृह स्लॅबचे पूजन



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १६ डिसेंबर :** अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचे वास्तव्य राहिलेल्या अहमदपूर शहरातील ब्राम्हण गल्ली मधील नागेंद्र भारती मठाच्या सभागृहाच्या स्लॅप चे मान्यवरांच्या हस्ते विधीवत पुजन करून सभागृहावर स्लॅप टाकण्यात आला.

अहमदपूर शहरातील जाज्वल्य असलेल्या पुरातन काळातील नागेंद्र भारती मठ संस्थान मध्ये संजिवन समाधी असून अक्कलकोट चे स्वामी समर्थ हे पाच वर्षे नागेंद्र भारती यांचे शिष्य म्हणून वास्तव्यास होते. भारती महाराजांनी जिवंत समाधी घेण्यापूर्वी स्वामी समर्थांना मठाधिपती म्हणून गादीवर बसवले होते.

जाज्वल्य व पावण स्थान असलेल्या नागेंद्र भारती मठाच्या सभागृहासाठी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांच्या पुढाकाराने प्रादेशिक पर्यटन विभागाकडून विस लक्ष विकास निधी आणून सभागृहाचे दर्जेदार बांधकाम पूर्ण झाले असून आज स्लॅप टाकण्यात आला.

विधीवत पुजन कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख, जेष्ठ नेते राजकुमार मजगे, नंदकुमार कोनाले, ॲड.स्वप्नील व्हते, भारतीय जनता पक्षाचे मा. जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, हणमंत देवकते, रमेश गिरी, बालाजी गिरी, जाफर चाऊस, इंजिनिअर प्रशांत शिंदे, बालाजी गुट्टे यांच्या सह भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळेगाव तलावात मृतदेह आढळले

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १६ डिसेंबर :** चाकूर तालुक्यातील नळेगाव येथे गावाजवळील घरणी नदीच्या जवळ एका तलावात संगाप्पा महाराज पुलाजवळ दोन मृतदेह सापडले आहेत. मृतदेह एक पुरुष व एका महिलेचे असल्याने गावात एकच खळबळ उडाली आहे.

नळेगाव ते सावंतवाडीकडे जाणाऱ्या रोडवर घरणी नदीच्या पात्रालगत तलावात दोन मृतदेह सोमवारी (ता.१५) मृतावस्थेत आढळून आल्याची घटना घडली असून अनिता लक्ष्मण तेलंगे (वय- ३५) (रा.नळेगाव) ही महिला बेपत्ता असल्याची तक्रार ता. ११ रोजी चाकूर पोलिसात नोंद करण्यात आली होती. मात्र शोध घेऊनही ती कुठेही आढळून आली नाही.

### चाकूर पोलिसात गुन्हा दाखल, नागरीकांत भितीचे वातावरण

तसेच राजकुमार हणमंत शृंगारे (वय- ४०) रा.नळेगाव हा.मु. विटभट्टी आष्टामोड हेही मागच्या तीन दिवसापासून बेपत्ता होता. पण त्याची तक्रार पोलिसांत दिली नव्हती. या दोघांचेही मृतदेह सोमवारी (ता.१५ ) नळेगाव येथील एका तलावात तरांगताना दुपारी एक वाजण्याच्या सुमारास आढळून आले.

पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन दोन्ही मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदन करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र नळेगाव येथे पाठवले असता शवविच्छेदन करण्यात आले.

याबाबत लक्ष्मण गोविंद तेलंगे आणि साजन राजकूमार श्रृंगारे यांच्या चाकूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पी. एल. नीलकंठे, पोलीस हेड कॉन्स्टेबल सिद्धेश्र्वर जाधव, शत्रुघ्न शिंदे, शिरीष नागरगोजे, योगेश मरपल्ले हे करीत आहेत.

# मैलार मल्लण्णा यात्रेसाठी भक्तांचा महासागर

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १६ डिसेंबर :** भालकी तालुक्यातील खानापूर येथे श्री क्षेत्र मैलार मल्लण्णा खंडोबा यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाच्या वातावरणात सुरू असून, तब्बल एक महिना चालणाऱ्या या यात्रेच्या रविवारी (दि. १४ डिसेंबर) प्रमुख दिवशी भाविकांचा अक्षरशः महासागर लोटला. शनिवारी रात्रीपासूनच मंदिर परिसर भक्तांनी गजबजून गेला होता.

रविवारी पहाटे ३ वाजल्यापासून अंगावर शहारे आणणाऱ्या थंडीतही भाविकांनी कुंडात स्नान करून देवदर्शनासाठी रांगा लावल्या. दिवसभर येळू कोटी येळू कोटी उघे असा जयघोष, भंडाऱ्याची उधळण, टाळ-मृदंगाचा निनाद यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

या विशेष दिवशी देवास फुलांचा हंडा घालून मनोहर अलंकार करण्यात आला होता. रात्री देवाची पालखी मिरवणूक मोठ्या आनंदोत्सवात पार पडली. कर्नाटकसह महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश येथून आलेल्या लाखो भाविकांनी देवदर्शन घेतले व पुण्य लाभले.



ही यात्रा कल्याण कर्नाटकातील सर्वात मोठी मानली जाते. तसेच बीडर जिल्ह्यात सर्वाधिक भाविक भेट देणारे हे प्रमुख देवस्थान आहे. मैलार मल्लण्णा भक्तांच्या मनोकामना पूर्ण करतात, या दृढ श्रद्धेमुळे दरवर्षी भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते.

# शास्त्री विद्यालयात वैदिक मानवता संस्कार व्याख्यानमाला

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १६ डिसेंबर :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात वैदिक मानवता संस्कार व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुणे, प्रमुख पाहुणे पंडित प्रतापसिंह चव्हाण, व्याख्याते पंडित मनुदेवजी शास्त्री, प्रा. नरेंद्र शिंदे, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट माधव मठवाले उपस्थित होते.

याप्रसंगी पंडित प्रतापसिंह चव्हाण यांनी मुलांनी सरळ मार्गाचा अवलंब करावा गुरुजनांचा आई-वडिलांचा सन्मान करावा व आपला विकास साधावा या सर्व विषयावर आधारित भजन सादर केले. व्याख्याते पंडित मनुदेवजी शास्त्री यांनी आपल्या व्याख्यानातून शिक्षणाचा उद्देश सांगितला. शिक्षणाबरोबर संस्कार अत्यंत महत्त्वाचे आहेत. ध्येय मोठे ठेवा त्याप्रमाणे मेहनत करा मनाने जिंका नक्कीच जिंकाल सकारात्मक विचार करा आपल्या कामात सातत्य ठेवा अत्यंत सहज सोप्या शब्दात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र शिंदे यांनी केले.

सूत्रसंचालन व स्वागत परिचय अनिता येलमटे यांनी केले. आभार किरण नेमट यांनी मानले.

# पोलिसांच्या वेशात भामट्यांचा सुळसुळाट; अहमदपूरकर सावधान

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १६ डिसेंबर :** अहमदपूर शहर आणि तालुक्यात सध्या 'मी पोलीस आहे' असे सांगून नागरिकांना लुटणाऱ्या चोरट्यांची टोळी सक्रिय झाली आहे. विशेषतः माळेगाव यात्रेच्या निमित्ताने शहरात अशा भामट्यांचा सुळसुळाट वाढला आहे.



या चोरट्यांनी अनेक नागरिकांना, विशेषत: महिला आणि पुरुषांना, 'मी पोलीस आहे' असे भासवून त्यांचे दागिने लुटण्याचे प्रकार सध्या मोठ्या प्रमाणात घडत आहेत. यामध्ये वयोवृद्धांना लुटण्याचे प्रमाण अधिक असल्याने ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही टोळी लोकांना आम्ही पोलीस आहोत असे भासवते. त्यानंतर, परिसरात पुढे धोका आहे किंवा गुन्हेगारी वाढली आहे असे खोटे कारण सांगून लोकांना घाबरवतात. याच संधीचा फायदा घेऊन ते हातचालाखीने नागरिकांचे दागिने आणि रोख रक्कम हडप करतात. अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी नागरिकांना अशा कोणत्याही भूलथापांना बळी न पडता अत्यंत जागृत राहण्याचे आणि सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

पोलिस अशा भामट्यावर विशेष लक्ष देत असून वयोवृद्ध नागरिकांनी याची विशेष दक्षता घ्यावी. सोन्याचे दागिने सोबत घेऊन फिरणे टाळावे. अनोळखी व्यक्तीने पोलीस असल्याचे सांगून दागिने काढण्यास सांगितल्यास, त्वरित नकार द्या आणि पोलिसांना माहिती द्यावी.

पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी स्पष्ट केले आहे की, जर असे कोणी व्यक्ती आढळले किंवा तुम्हाला लुटण्याचा प्रयत्न झाला, तर नागरिकांनी त्वरित अहमदपूर पोलीस स्टेशनशी (०२३८१-२६२१००) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अशोक पाटील निलंगेकरांची धुमाळे परिवारास सांत्वनपर भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरुर अनंतपाळ, १६ डिसेंबर :** शिरुर अनंतपाळ येथील ज्येष्ठ व्यापारी, काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते तथा निलंगेकर परिवाराचे स्नेही कै. वैजनाथराव धुमाळे यांचे काही दिवसांपूर्वी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने शिरुर अनंतपाळ शहरातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या दुःखद प्रसंगी निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे लोकप्रिय नेते तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अशोक शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी धुमाळे परिवाराच्या शिरुर अनंतपाळ येथील निवासस्थानी भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन केले.

कै. वैजनाथराव धुमाळे हे परिसरातील काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते होते. सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शिरुर अनंतपाळ शहरात आयोजित करण्यात आलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार मा. मल्लीकार्जुन खरगे साहेब यांच्या जाहीर सभेचे त्यांनी सभाध्यक्षपद भूषविले होते.



यावेळी अशोकभैय्या निलंगेकर साहेब यांनी धुमाळे परिवाराच्या दुःखात सहभागी होत, कै. वैजनाथराव धुमाळे यांनी समाजकारण व पक्षकार्यामध्ये दिलेले योगदान कायम स्मरणात राहील, अशा शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली. तसेच या दुःखातून सावरण्यासाठी कुटुंबीयांना बळ दिले. या भेटीमुळे धुमाळे परिवारास मोठा आधार मिळाल्याची भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली.

# प्रलंबित ८१, वादपूर्व २० प्रकरणे निकाली

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १६ डिसेंबर :** उदगीर तालुका विधी सेवा समितीतर्फे उदगीर न्यायालयात आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत १ हजार ८०३ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी प्रलंबित ८१ आणि वादपूर्व २० प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यातून एकूण १ कोटी ६५ लाख ६६ हजारांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

शनिवारी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत प्रलंबित ८१ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आली. त्यात १ कोटी ३० हजार रुपयांचे शुल्क वसूल करण्यात आले. तसेच वादपूर्व १ हजार ४७० प्रकरणे होती. त्यापैकी २० प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आली. त्यात ३५ लाख ६६ हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. प्रलंबित व वादपूर्व अशा एकूण ३ हजार २७३ पैकी १०१ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. एकूण १ कोटी ६५ लाख ६६ हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

शनिवारी झालेल्या लोकअदालतीत ८१ प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये १० मोटार वाहन अपघात प्रकरणांचा समावेश असून, मोटार अपघातातील जखमी व मृताच्या वारसांना एकूण १० मोटार वाहन अपघात प्रकरणांमध्ये १ कोटी ३० हजार रुपयांची तडजोड रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. जे. भारूका यांच्या निर्देशानुसार, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. बी. म्हालटकर यांच्या अध्यक्षतेखाली एकूण पाच पॅनल होते. त्यात दिवाणी न्यायाधीश एस. वाय. रचभरे, दिवाणी न्यायाधीश (व्ही. बी. कांबळे, सहदिवाणी न्यायाधीश व्ही. आर. घराळ, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश के. ए. यादव यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले.

वसूल उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी उदगीर विधिज्ञ

# शिवलिंगेश्वर फार्मसीच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १६ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या वतीने आयोजित केलेल्या विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करीत पाच पारितोषिके पटकावून महाविद्यालयासह विद्यापीठाचेही नाव उज्वल केले.या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नांदेड येथील विद्यापीठात स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत अनेक महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. महाविद्यालयाच्या मानाच्या आणि प्रतिष्ठित या स्पर्धेत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या यू.जी. आणि पी.जी. गटातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.

यू.जी. गट- ह्युमॅनीटीज, लॅग्वेज अण्ड फाईन आर्ट विनय काबरा फार्म-डी अंतीम वर्ष द्वितीय पारितोषिक, पी. जी. गट-कॉमर्स, मॅनेजमेंट अण्ड लॉ आकांक्षा जाधव फार्म-डी अंतीम वर्ष द्वितीय पारितोषिक, वैभव गबाळे फार्म-डी पाचवे वर्ष तृतीय पारितोषिक, यु.जी. गट- अतिका पठाण बी. फार्म अंतीम वर्ष तृतीय पारितोषिक, पी.जी. गट- इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी: खुल्लोड कुरेशी फार्म-डी पाचवे वर्ष द्वितीय पारितोषिक मिळवून विद्यालयाचे नाव उंचावले आहे.

सर्व विजेते विद्यार्थी राज्य स्तरावर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. संघव्यवस्थापक व मार्गदर्शक म्हणून येलम विद्या कापसे यांनी काम पाहिले. तर विजेत्या विद्यार्थ्यांना कविता सिरगीरे, डॉ. अशोक गिरी, डॉ. प्रसाद कटारे, डॉ. सचिन कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दुचाकी घसरून अपघात; उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
धाराशिव शहर पोलीस ठाणे :
धाराशिव बायपास रोडवर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयताचे नाव पंकज विद्यानंद देशमुख (वय २५), रा. देवळाली, ता. जि. धाराशिव असे आहे. याबाबत मयताचा भाऊ महेश अशोक देशमुख (वय ४०), रा. देवळाली यांनी फिर्याद दिली आहे.

दि. १५ जुलै २०२५ रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास पंकज देशमुख हे दुचाकी (क्रमांक एमएच २५ ए.ए. ०१४६) वरून जात असताना, गणेश मंगल कार्यालयाजवळील धाराशिव बायपास रोडवरील सांजा दिशेकडे जाणाऱ्या लेनवर त्यांनी दुचाकी हायगयी व निष्काळजीपणे चालवली. यावेळी दुचाकी घसरून ते रस्त्यावर पडले व गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



# रेड्यांच्या टकरीचे आयोजन; १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

### आगावू नोटीस असूनही नियमांचे उल्लंघन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
भुम तालुक्यातील आरसोली शेतशिवारात रेड्यांच्या टकरी (झुंजी) आयोजित केल्याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात १४ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळलेली माहिती अशी की, आरोपी विजयसिंह थोरात, यशवंत धनाजी थोरात (रा. भुम), बालाजी लाला काळे (रा. हिवरा), निलेश गुळमे (रा. भुम), रावजी उर्फ पल्या काळे (रा. कल्याणनगर, भुम), शंकर राजू काळे (रा. ढोकी), विलास भारती (रा. भुम), विलास लोढे (रा. भुम), ओंकार होळकर (रा. भुम), गुड्डू गाडे (रा. भुम), सुनील माळी, जावेद शेख, स्वप्निल उर्फ पिट्या हावळे (सर्व रा. भुम, ता. भुम, जि. धाराशिव).

दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ ते ४ वाजेदरम्यान आरसोली शेतशिवारातील कुरणात, खडी क्रेशर मशीनजवळील मोकळ्या मैदानात, रेड्यांच्या टकरीचे आयोजन करण्यात आले.



यापूर्वी भा.न्या. सं. कलम १६८ अन्वये रेड्यांच्या टकरी न घेण्याबाबत आगावू सूचना देण्यात आल्या होत्या.

मात्र, संबंधित आरोपींनी नोटीस स्वीकारण्यास नकार देत पैजेसाठी व मनोरंजनाच्या उद्देशाने दोन पाळीव रेड्यांमध्ये टकरी घडवून आणली.

या टकरी व झुंजीदरम्यान रेडे एकमेकांशी झुंजताना जखमी झाले.

तसेच झुंजीत उधळलेले रेडे पळून गेल्याने तेथील उपस्थित लोकांच्या जिवितास धोका निर्माण झाला, असे पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# विद्युत तारा तोडताना करंट लागून तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
विद्युत प्रवाह सुरू असलेल्या तारा तोडण्यास सांगितल्याने करंट लागून तरुणाचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा तुळ शिवारात घडली आहे. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### निष्काळजीपणामुळे जीवितहानी; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, मयताचे नाव दत्ता हब्बास वाघमारे (वय २५), रा. देवसिंगा तुळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव असे आहे. याबाबत निकिता अक्षय मस्के (वय २५), रा. भिमनगर, देवसिंगा तुळ, ता. तुळजापूर यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीतील माहितीनुसार, दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी सायं. ६.१५ वाजण्याच्या सुमारास, आरोपी विद्याधर तानाजी जाधव व जितेंद्र गुलाब मस्के (दोघे रा. देवसिंगा तुळ) यांनी देवसिंगा तुळ शिवारातील विद्याधर जाधव यांच्या शेतात असलेल्या रिन्यु कंपनीच्या विद्युत तारा तोडण्याचे काम मयत दत्ता वाघमारे यांना ५०० रुपये मजुरी देऊन करण्यास सांगितले.

विद्युत तारांमध्ये प्रवाह सुरू असल्याची माहिती असतानाही, मयतास पोलवर चढून तारा तोडण्यास सांगितले. दरम्यान, पोलवर चढून तारा तोडत असताना दत्ता वाघमारे यांना जोराचा विद्युत शॉक लागला. त्यामुळे ते पोलवरून खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेप्रकरणी फिर्यादीने दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०५ व ३(५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# ग्रामपंचायत कार्यालयात आग; सरकारी दस्ताऐवज जळून नष्ट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
कळंब तालुक्यातील हासेगाव शि. ग्रामपंचायत कार्यालयात अज्ञात व्यक्तीने आग लावून सरकारी दस्ताऐवज जाळल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी राजेंद्र धोडींराम राठोड (वय ३६), व्यवसाय नोकरी, ग्रामपंचायत अधिकारी, रा. नांदुर्गा, ता. औसा, जि. लातुर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.

दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० या कालावधीत, हासेगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागील खिडकीसमोरील उघड्या कपाटातील शासकीय दस्ताऐवजावर लाकडी काठीला कपडा गुंडाळून आग लावली गेली. यामुळे दस्ताऐवज जळून नष्ट झाले.




या घटनेप्रकरणी भारतीय दंड संहिता कलम ३२४(३) आणि कलम ३, ४ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास शिराढोण पोलीस करीत आहेत.

# खुदावाडी येथे चार एकर ऊस जळून खाक; शेतकऱ्याचे सहा लाखाचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथील शेतकरी सुबोध अहंकारी यांच्या शेतातील ऊसाच्या फडाला अचानक आग लागल्याने चार एकर ऊस जळून खाक झाला असुन शेतकऱ्याचे सहा लाखाचे नुकसान झाले आहे.

१५ डिसेंबर रोजी दुपारी शेतकरी सुबोध अहंकारी हे आपल्या शेतात पाणी देत असताना ऊसाच्या वरच्या बाजूने विजेची तार गेली आहे. अचानकच या तारचे स्पार्कींग झाल्याने ठिणग्या उसाच्या मध्यभागी पडल्याने उसाने पेट घेतला. उसाच्या मध्यभागी लागलेल्या आगीला विझवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न केला असता ते यशस्वी होऊ शकले नाहीत, त्यामुळे चार एकर ऊस जळून खाक झाला आहे.

दोनशे टन होणारा ऊस सोलापूर येथील सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना चार आठ दिवसांत ऊस घेऊन जाणार होता. शेतकऱ्याच्या तोंडाला आलेला घास नियतीने पळवून नेला आहे. संकटामध्ये असणाऱ्या शेतकऱ्यांने याच



उसावर अनेक स्वप्ने रंगवली होती ती स्वप्ने भंग पावली आहेत.

अशातच जळालेला ऊस कोणताही कारखाना ताबडतोब घेऊन जात नाही त्या मुळे आणखीन नुकसान होणार आहे. अशा हलाकीच्या स्थितीत हा शेतकरी अडकला असून, वर्षभर कष्ट करून, रात्र रात्र जागरण करून उसाला पाणी देऊन ऊस वाढवला या आगीमुळे होत्याचे नव्हते झाले.

तेंव्हा महावितरण विभाग व महसुल विभागानी शेतकऱ्याचे झालेल्या नुकसानीच्या जागेचा पंचनामा करून शेतकऱ्याला शासकीय मदत मिळवून द्यावी अशी मागणी शेतकऱ्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

# एनव्हीपी शुगरच्या वतीने ऊसाचे बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा. लि.च्या वतीने सन २०२५-२०२६ च्या द्वितीय गळीत हंगामात दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत गाळपासाठी आलेल्या ऊसाचे बिल दि. १६ रोजी संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे, अशी माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली.



एनव्हीपी शुगर कारखान्याच्या हिताचा विचार करून प्रत्येक पंधरवाडा पूर्ण होताच शेतकऱ्यांच्या खात्यात ऊसबिल जमा करण्याची परंपरा यंदाच्या गळीत हंगामातही कायम ठेवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, तिसऱ्या पंधरवाड्यात म्हणजे नोव्हेंबर महिन्यात कारखान्यात उत्पादित झालेल्या एक लाख जागरी पावडर पोत्यांचे पूजन कारखान्याच्या वर्धापन दिनानिमित्त करण्यात आले होते.

**चेअरमन नानासाहेब पाटील यांनी ऊसबिल देण्याचा शब्द पाळला**

यंदाच्या हंगामात ऑक्टोबर महिन्यात गळीत हंगाम सुरू झाल्यापासून चाचणी गळीत हंगामाप्रमाणेच नियमित गळीत हंगामातही पंधरा दिवसांत ऊसबिल अदा करण्याची परंपरा सातत्याने जोपासली जात आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे, त्यांनी संबंधित बँकेत जाऊन आपले ऊसबिल घ्यावे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी अद्याप बँक खाते दिलेले नाही, त्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., धाराशिव येथे ऊसबिल स्वीकारावे, असे आवाहन चेअरमन नानासाहेब पाटील यांनी केले आहे.

# नव्या दिवाणी न्यायालयासाठी बसथांबा व विशेष बस सेवेची मागणी

### माजी परिवहनमंत्री मधुकरराव चव्हाण यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ डिसेंबर -**
तुळजापूर येथे नळदुर्ग रोडवर नव्याने सुरू होणाऱ्या वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयासाठी सर्व बसेसना न्यायालयाजवळ थांबा देण्यात यावा, तसेच न्यायालयीन वेळेनुसार विशेष बस सेवा सुरू करावी, अशी मागणी माजी परिवहनमंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केली आहे.

यासंदर्भात चव्हाण यांनी धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन सादर केले आहे. नळदुर्ग रोडवर शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर नवीन दिवाणी न्यायालयाची इमारत उभारण्यात आली असून, तुळजापूर शहरातून तेथे जाण्यासाठी रिक्षाद्वारे १०० ते १५० रुपये भाडे आकारले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे भाडे न्यायालयीन कामासाठी येणाऱ्या पक्षकारांना परवडणारे नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.



तुळजापूरहून नळदुर्गकडे जाणाऱ्या सर्व एसटी बसेसना न्यायालयाच्या इमारतीजवळ थांबा देण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, सकाळी १०.३० वाजता आणि सायंकाळी ५.३० वाजता न्यायालयापर्यंत विशेष बस सेवा सुरू करण्याचीही विनंती करण्यात आली आहे.

या मागणीची अंमलबजावणी झाल्यास न्यायालयीन कामासाठी येणारे पक्षकार, वकील व न्यायालयीन कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# तुळजापुरात दोन गटात तुडूंब हाणामारी; कोयत्याने केले वार : एक जण गंभीर जखमी



शहरात तणावाचे वातावरण... भाजप कार्यकर्त्याकडून गोळीबार झाल्याची चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ डिसेंबर -**
शहरातील जनता बँकेसमोर रस्त्याच्या कामावरून दोन गटांमध्ये झालेल्या वादातून तुळजापूर शहरात गंभीर तणाव निर्माण झाला. मंगळवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद पिटू गंगणे आणि महाविकास आघाडी / काँग्रेसचे उमेदवार अमर मगर यांचे बंधू ऋषी मगर यांच्यात वाद सुरू झाला, जो हळूहळू दोन्ही गटांमध्ये तुडुंब हाणामारीत रूपांतरित झाला. रस्त्यावर मोठी गर्दी जमा झाली, परिणामी वाहतूक कोंडी निर्माण झाली.

थोड्यावेळाने हॉस्पिटल समोर कुलदीप मगर यांच्यावर कोयत्यांनी तीन वार केले गेले, ज्यामुळे हा वाद पुन्हा पेटला. कुलदीप मगर यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सोलापूरमध्ये रॅफर केले गेले.

घटनेनंतर नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालयासमोर घेराव घालून आरोपींना ताब्यात घेण्याची मागणी केली.

रस्त्यावर झालेल्या गर्दीमुळे वाहतूक ठप्प झाली, तर शहरातील व्यापाऱ्यांनी नळदुर्ग रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्टँड परिसर, विश्वनाथ कॉर्नर लातूर रोड इत्यादी ठिकाणी दुकाने बंद ठेवली.

पोलीस प्रशासनाने चौक चौकात तगडा बंदोबस्त लावला. रात्री उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदणी व तपासाचे काम सुरू होते.

# महाराष्ट्र शक्तीपीठ एक्स्प्रेस-वे प्रकल्पाची पर्यावरणीय सार्वजनिक सुनावणी २३ डिसेंबरला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
एमएसआरडीसी (एमएसआरडीसी) मार्फत राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (पॅकेज-II) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत पर्यावरणीय सार्वजनिक सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. ही सुनावणी दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे होणार आहे.

या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) कडून मिळालेला पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (ईआय) अहवाल तसेच Executive Summary संबंधित गावांमध्ये ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना प्रकल्पामुळे होणारे पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक परिणाम समजून घेणे सुलभ झाले आहे.

प्रकल्पग्रस्त गावांची यादीमध्ये नितळी, घुगी, लासोना, सांगवी, कामेगाव, चिखली, महालिंगी, बरमगाव बु., मेडसिंगा, धाराशिव ग्रामीण, देवळाली, शेकापूर, गावसुद, वरवंटी, पोहनेर, बेगडा आणि सुर्डी. या गावांतील प्रकल्पग्रस्त नागरिकांनी लेखी सूचना, मतं व आक्षेप महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालय, लातूर तसेच संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे तात्काळ सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सुनावणी दरम्यान नागरिकांना आपल्या समस्या, सूचना व भूमिका मांडण्याची संधी मिळणार असून, त्या नोंदी अंतिम निर्णय प्रक्रियेसाठी विचारात घेतल्या जातील.

त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित सर्व गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवावा, असे चझउइ उप प्रादेशिक कार्यालय, लातूरचे सब रिजनल ऑफिसर यांनी आवाहन केले आहे.

## भुममध्ये जुगार विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
जुगार विरोधी कारवाई दरम्यान भुम पोलीस पथकाने दि.१५ डिसेंबर रोजी भुम पो ठाणे हद्दीत दोन ठिकाणी छापे टाकले.

यावेळी आरोपी दशरथ दत्ता पवार (वय २२, रा. कल्याणनगर, भुम) यांच्याकडून सुरट जुगाराचे साहित्य व ८१० रूपये रक्कम पोलीस पथकास हस्तगत झाली. त्याचप्रमाणे आरोपी तानाजी उर्फ पप्पु राजेंद्र काळे (वय ३६, रा. कल्याणनगर, भुम) यांच्याकडून सुरट जुगाराचे साहित्य व ८५० रूपये रक्कम जप्त केली आहे.

# जवाहर महाविद्यालयाला विद्यापीठ अंकेक्षणात 'ए' ग्रेड

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ डिसेंबर -**
येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत झालेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात 'ए' ग्रेड प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे. सदर अंकेक्षणात महाविद्यालयाला एकूण ४५० गुणांपैकी उल्लेखनीय गुण प्राप्त झाले.





या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वास माने, अंकेक्षण प्रमुख प्रा. डॉ. सहदेव बिराजदार तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. अंकुश कदम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष भारत कस्तुरे, सचिव रामचंद्र आलुरे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रा. भालचंद्र बिराजदार आणि ज्येष्ठ विधिज्ञ लक्ष्मीकांत पाटील यांनी अभिनंदन केले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांनी ग्रामीण भागातील वंचित घटकांना आणि मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचेच आम्ही पाईक आहोत.

संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या उत्तम पायाभूत सुविधा, उच्च दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता तसेच प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या विविध नवोपक्रमांमुळे विद्यार्थी-केंद्रित शिक्षण देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न महाविद्यालयात होत असल्याचे गौरवोद्गार सचिव रामचंद्र आलुरे यांनी काढले. त्यांनी सर्वांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लोहाऱ्यात अवैध मद्य जप्त; पोलीस कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ डिसेंबर -**
हॉटेल वैभवी च्या पाठीमागील मोकळ्या जागेत पोलीस पथकाने अंदाजे १,८०० रूपये किंमतीच्या देशी-विदेशी मद्याच्या १८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे उघड केले.



यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त केले आणि संबंधित व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शेतातील शेड फोडून शेळ्यांची चोरी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ डिसेंबर -
फिर्यादी आलम साहेबलाल पटेल (वय ४८), रा. तामलवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांच्या तामलवाडी शिवारातील शेतातील शेडचे कुलूप अज्ञात व्यक्तीने फोडून आत प्रवेश करत मोठी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

दि.१३ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजल्यापासून ते दि.१४ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने शेडमधील २३ शेळ्या, १ बोकड व ५ शेळीची पिल्ले, असा एकूण अंदाजे १,४५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादित नमूद आहे.



याबाबत फिर्यादी आलम पटेल यांनी दि.१५ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तामलवाडी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३३४ (१), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास तामलवाडी पोलीस करीत आहेत.

## ▶▶ शोक संदेश...



### मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांचे दिल्लीत स्वागत

धाराशिव, दि.१६ डिसेंबर -
मराठा समाजाच्या हक्कासाठी अखंड संघर्ष करणारे मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे आज दिल्लीत आगमन झाले. त्यांच्या आगमनावेळी रूपामाता परिवाराचे संस्थापक ॲड. व्यंकट गुंड पाटील तसेच प्रभारी, भाजपा दिल्ली प्रदेश (मराठी प्रकोष्ठ) व श्री गणेश सेवा मंडळ, लक्ष्मीनगर (दिल्ली)चे संस्थापक अध्यक्ष महेंद्र लड्डा यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी हरियाणाहून आलेले शिष्टमंडळ पारंपरिक भगवे फेटे परिधान करून स्वागतासाठी उपस्थित होते. स्वागतानंतर मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो वाहनांचा ताफा न्यू महाराष्ट्र सदनच्या दिशेने रवाना झाला. याप्रसंगी मराठा समाजातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विजय दिन साजरा

धाराशिव, दि.१६ डिसेंबर -
पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासेसर यांच्या मार्गदर्शनाखाली विजय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बांगलादेश मुक्ती संग्रामात मुक्ती वाहिनीला मदत करत भारताने पाकिस्तानविरुद्ध १६ डिसेंबर १९७१ रोजी ऐतिहासिक विजय मिळवला होता. या स्मरणार्थ भारतात दरवर्षी १६ डिसेंबर हा दिवस विजय दिन म्हणून साजरा केला जातो. सदर युद्ध ३ डिसेंबर १९७१ रोजी सुरू होऊन १६ डिसेंबर १९७१ रोजी समाप्त झाले. या दिनाचे औचित्य साधून इयत्ता पहिली 'ड' वर्गाच्या वर्गशिक्षिका रेश्मा माळाळे मॅडम यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांनी भारतीय जवानांच्या वेशभूषेत देशभक्तीपर गीतांवर देखण्या पद्धतीने सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी जीवन कुलकर्णी, प्रदीप शिंदे, कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश, पालकवर्ग तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




### सुभाष वैरागकर यांच्या बालकथासंग्रहास प्रथम पुरस्कार

उमरगा, दि.१६ डिसेंबर -
येथील सहशिक्षक सुभाष वैरागकर यांच्या 'अभय साधक आणि इतर गोष्टी' या बालकथासंग्रहास मराठा मंदिर साहित्य शाखेच्या वतीने देण्यात येणारा साहित्य पुरस्कार २०२४ मधील बालवाङ्मय विभागातील प्रथम पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण मुंबई सेंट्रल (पूर्व) येथील मराठा मंदिरच्या श्री. जीवाजीराव शिंदे सभागृहात नुकतेच पार पडले. नामवंत शास्त्रज्ञ व साहित्यिक डॉ. गजानन पुरुषोत्तम फोंडके (बाळ फोंडके) यांच्या हस्ते सुभाष वैरागकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. बाळ फोंडके यांनी विज्ञान आणि मानवी जीवन या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. कार्यक्रमास मराठा मंदिर साहित्य शाखेचे पदाधिकारी, मान्यवर साहित्यिक तसेच मोठ्या संख्येने साहित्यरसिक उपस्थित होते. बालसाहित्य क्षेत्रातील वैरागकर यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### गोठ्यातून म्हैस चोरी; ८० हजारांची म्हैस लंपास

धाराशिव, दि.१६ डिसेंबर -
लोहगाव शिवारातील शेतातील गोठ्यातून अज्ञात चोरट्याने म्हैस चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



फिर्यादी नामदेव मधुकर येडगे (वय २५), रा. लोहगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता ते दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ६.०० वाजेच्या सुमारास, संजय शिवाजीराव मोरे यांच्या लोहगाव शिवारातील शेतातील गोठ्यातून अंदाजे ८०,००० रुपये किमतीची एक म्हैस अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

# पूर्ववैमनस्यातून मित्रांनीच केला मित्राचा 'खून'! अपघाताचा बनाव उघड

▶▶ घटनेनंतर काही तासांतच दोन्ही आरोपींना अटक... ▶▶ पोलिसांनी तपास केला गतिमान... ▶▶ कंडारी परिसरात खळबळ...

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.१६ डिसेंबर -
तालुक्यातील कंडारी ते सोनारी रस्त्यावर सोमवारी, दि.१५ डिसेंबर रोजी रात्री ९ ते १० वाजेच्या सुमारास झालेल्या एका संशयास्पद 'अपघाता'मागे खुनाचे गंभीर षडयंत्र असल्याचे उघड झाले आहे. जुन्या भांडणाच्या रागातून दोन मित्रांनी आपल्याच ३५ वर्षीय मित्राच्या डोक्यात जड वस्तूने वार करून क्रूरपणे खून केल्याचा आरोप मयताच्या पत्नीने केला आहे. आंबी पोलिसांनी या घटनेत तात्काळ सूत्रे फिरवत, खुनाचा गुन्हा नोंदवून दोन्ही संशयित आरोपींना रात्रीच ताब्यात घेतले असून, या घटनेमुळे कंडारी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

कंडारी येथील रहिवासी सोनाली मोतीराम जाधव (वय ३५) यांनी आंबी पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली आहे. सोनाली यांचे पती मोतीराम जाधव हे सोमवार रात्री ९ वाजेच्या सुमारास कुटुंबासह घरी जेवण करत होते. त्याच वेळी त्यांचे मित्र विष्णु कालीदास तिंबोळे आणि योगेश नागेश तिंबोळे (दोघे रा. कंडारी) हे मोटारसायकलवरून त्यांच्या घरी आले. त्यांनी मोतीराम यांना पप्पु रावखंडे यांच्या



बंगल्यावर पार्टी केली आहे, तिकडे जेवण करायला चल, असे सांगून त्यांना चालू जेवणाच्या ताटावरून उठवले आणि मोटारसायकलवर बसवून सोबत घेऊन गेले. रात्री १० वाजेच्या सुमारास मोतीराम यांना घेऊन गेलेल्या दोन मित्रांपैकी विष्णु तिंबोळे हा एकटाच मोतीराम यांच्या घरी परतला आणि त्याने कंडारी ते सोनारी रोडवर पप्पु रावखंडे यांच्या बंगल्यासमोर अपघात झाल्याचे सांगितले.

मयताची पत्नी सोनाली जाधव आणि आई रतन यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असता, मोतीराम जाधव हे रस्त्यावर पडलेले होते. त्यांच्या डोक्याला मोठी दुखापत झाली होती, चेहरा ठेचला गेलेला होता आणि रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रक्त सांडलेले होते.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, काही ठिकाणी सांडलेल्या रक्तावर पाणी आणि माती टाकलेली दिसून आली. 'अपघाता'त तिघांपैकी केवळ मोतीराम यांचाच अपघात कसा झाला, असा जाब पत्नीने विचारला असता, आरोपी मित्रांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

या परिस्थितीमुळे 'अपघाता'बाबतचा संशय बळावला. सोनाली जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मोतीराम जाधव, विष्णु तिंबोळे आणि योगेश तिंबोळे यांच्यात जुन्या भांडणावरून वाद होता. सदरील भांडण तात्या रावखंडे व पप्पु रावखंडे यांनी सोडवण्याचा प्रयत्नही केला होता.

ज्यात तात्या रावखंडे हे जखमी झाले आहेत. जुन्या भांडणाच्या रागातून विष्णु तिंबोळे व योगेश तिंबोळे यांनी मोतीराम जाधव यांच्या डोक्यात जड वस्तूने वार करून त्यांचा खून केला आणि अपघाताचा बनाव करण्याचा प्रयत्न केला, असा गंभीर आरोप फिर्यादीने केला आहे.

### पंचनाम्यात रक्ताचे डाग धुण्याचा प्रयत्न उघड...

पोलीस आणि फॉरेन्सिक टीमकडून करण्यात आलेल्या पंचनाम्यात हा अपघात नसून घातपातच असल्याचे स्पष्ट झाले आहे. कंडारी - सोनारी रस्त्यावर घटनास्थळी तात्या रावखंडे यांच्या घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये रक्ताचे डाग दिसून आले. या ठिकाणाहून रस्त्यापर्यंत रक्ताचे डाग दिसत होते. एवढेच नव्हे तर, काही ठिकाणी रक्ताचे डाग पाण्याने धुऊन काढले असून, काही ठिकाणी माती व वाळू टाकून रक्ताचे निशाण लपवण्याचा प्रयत्न झाल्याचे पंचनाम्यात स्पष्ट झाले आहे. यावरून आरोपींनी खुनानंतर पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. पोलीस अधिक तपास करत आहेत.

### पोलिसांची तात्काळ कारवाई, आरोपींना रात्रीच अटक...

घटनेची माहिती मिळताच आंबी पोलीस ठाण्याचे सपोनि गोरक्ष खरड व पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. फिर्यादीतील गंभीर आरोप आणि घटनास्थळावरील परिस्थिती (रक्तावर माती टाकणे, अपघाताबाबतचा संशय) लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली. आंबी पोलिसांनी आरोपी विष्णु कालीदास तिंबोळे आणि योगेश नागेश तिंबोळे यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवला आहे. घटनेनंतर काही तासांतच दोन्ही संशयित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे. हा अपघात नसून, पूर्ववैमनस्यातून केलेला खून आहे का, डोक्यात कोणत्या जड वस्तूने मारले गेले, तसेच तात्या रावखंडे यांना झालेल्या दुखापतीचा आणि खुनाचा काय संबंध आहे, याचा सखोल तपास पोलीस करीत आहेत.



### घटनास्थळी नातेवाईकांचा आक्रोश...

मंगळवार, दि. १६ रोजी अनाळा आरोग्य केंद्रात मयत मोतीराम जाधव यांचे शवविच्छेदन करण्यात आले. यावेळी कुटुंबातील नागरिक व नातेवाईक यांनी आक्रोश केला. नंतर घटनास्थळीही शेकडो नातेवाईक व नागरिकांनी जमा होऊन संताप व्यक्त केला. आरोपींना फाशीची शिक्षा होण्यासाठी पोलिसांनी तपास निष्पक्ष व अचूक करावा, अशी मागणी संतप्त नागरिकांनी पोलिसांकडे केली.

## गोवंशीय वासरांची कत्तलीसाठी वाहतूक; सात वासरे परंडा पोलिसांकडून जप्त

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ डिसेंबर -
परंडा पोलिसांनी गोवंशीय वासरांची कत्तलीसाठी वाहतूक करताना एका तरुणास ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

आरोपीचे नाव अकीब महमद अली कुरेशी (वय २०), रा. कुरेशी गल्ली, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव असे आहे. दि.१५ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १.३० वाजेच्या सुमारास जामगाव-परंडा रोडलगत शेत गट क्रमांक २०६ च्या बांधावर, आरोपीने गोवंशीय जातीची ७ वासरे (एकूण किंमत अंदाजे ४९,००० रुपये) आखुड दोरीने बांधून, चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने ठेवले होते.

ही वासरे कत्तलीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर परंडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीस ताब्यात घेतले व वासरे जप्त केली.

या प्रकरणी सरकारतर्फे आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास परंडा पोलीस करीत आहेत.

## श्री बाळेश्वर विद्यालयात सीएसआरअंतर्गत स्वच्छतागृहाचे लोकार्पण



तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.१६ डिसेंबर -
तुळजापूर तालुक्यातील बारूळ गावातील श्री बाळेश्वर विद्यालय येथे बालाजी अमाईन्स लिमिटेड कंपनीच्या वतीने सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व) अंतर्गत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचे लोकार्पण आज बालाजी अमाईन्सचे सीएसआर विभागप्रमुख अनिल विपत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख ए.एस. पाटील तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.एम. अणदूरकर उपस्थित होते.

बारूळ येथील श्री बाळेश्वर विद्यालयाच्या नवीन इमारतीचे नुकतेच बांधकाम पूर्ण झाले असून, नव्या शाळेमध्ये स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी शाळेतील शिक्षक, गावातील नागरिक व संस्थेच्या सभासदांनी बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळाकडे व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत बालाजी अमाईन्सच्या वतीने सीएसआर अंतर्गत मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र असे एक स्वच्छतागृह युनिट उभारण्यात आले आहे. सध्या या शाळेत इयत्ता आठवी ते दहावीचे तीन वर्ग असून सुमारे ११० विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या सोयीसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

लोकार्पणप्रसंगी केंद्र प्रमुख ए. एस. पाटील यांनी बालाजी अमाईन्सच्या वतीने करण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच मुख्याध्यापक एम. एम. अणदूरकर यांनी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळाचे व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांचे आभार मानले.

या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक हजारे, बलसुरकर, लाखाडे नाईक सर, वठारे, रणदिवे, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, बसवराज अंटद, गणेश नकाते, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक समितीचे सदस्य, गावातील नागरिक, पालकवर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## ३,२६,६५० रुपयांचा दंड वसूल; ३६२ वाहनांवर कारवाई

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ डिसेंबर-



दि.१५ डिसेंबर रोजी धाराशिव शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहन चालवताना मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन केल्याबाबत एकूण ३६२ कारवाया केल्या गेल्या. याप्रकरणी, ३,२६,६५० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले असून, वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.


### ▶▶ प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

**धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...**

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपुरी, आवारपिंपरी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी बु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**
दैनिक सोलापूर तरुण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.

- अनिल आगलावे
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९७९११


# खंडोबा यात्रेपूर्वी अर्धवट रस्त्यांची कामे अपूर्ण





### यात्रा विस्कळीत होण्याची शक्यता

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१६ डिसेंबर -
खंडोबा यात्रा सुरू होण्यापूर्वी श्रीक्षेत्र मैलारपूर येथे अर्धवट अवस्थेत राहिलेल्या रस्त्यांची कामे प्रशासनाने संबंधित ठेकेदाराकडून तात्काळ पूर्ण करून घेणे गरजेचे आहे. अन्यथा या अपूर्ण रस्त्यांमुळे यात्रा विस्कळीत होण्याची शक्यता असून भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. याबाबत तातडीने दखल घेऊन रस्त्यांची कामे पूर्ण करावीत, अशी मागणी भाविक व यात्रेकरूंनी केली आहे.

श्रीक्षेत्र मैलारपूर येथे भरणारी खंडोबा यात्रा संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असून यात्रेच्या काळात भाविकांचा अक्षरशः महापूर उसळतो. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून येथे अनेक रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात आली आहेत. मात्र, श्री खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या दोन ते तीन प्रमुख रस्त्यांची कामे संबंधित ठेकेदाराने अर्धवट अवस्थेत ठेवली आहेत.

रस्त्यांच्या दोन्ही बाजूंची कामे करण्यात आली असली, तरी मध्यभागी सुमारे ५० फुटांहून अधिक अंतराचे काम अपूर्ण आहे. या अपूर्ण भागामुळे यात्रेच्या काळात मोठ्या प्रमाणात गर्दी व वाहतुकीचा खोळंबा होण्याचा धोका आहे. मंदिराकडे जाणारे रस्ते रुंद व चांगले असताना, मध्ये राहिलेला हा अपूर्ण भाग यात्रेकरूंना धोकादायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नळदुर्ग शहराकडून श्रीक्षेत्र मैलारपूरकडे जाणारा रस्ता ऐन उतारावर व कालव्यालगत अर्धवट अवस्थेत आहे. हा रस्ता अत्यंत अरुंद असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. तसेच वसंतनगरजवळील पाण्याच्या टाकीमार्गे येणारा रस्ताही उतारावर व कालव्यालगत अपूर्ण राहिल्याने तेथेही वाहतूक विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

श्रीक्षेत्र मैलारपूर येथील खंडोबा यात्रा यावर्षी दि.२, ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी भरणार असून ३ जानेवारी हा मुख्य यात्रेचा दिवस आहे. या दिवशी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगणा राज्यांतून सुमारे ५ ते ६ लाख भाविक श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी उपस्थित राहतात.

यात्रेदरम्यान हजारो वाहने याच रस्त्यांवरून मंदिराकडे ये-जा करतात. त्यामुळे रस्त्यांची कामे अपूर्ण राहिल्यास वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता आहे.

या यात्रेला शेकडो वर्षांचा इतिहास असून नळदुर्गच्या पावन भूमीत श्री खंडोबा व माता बानू यांचा विवाह झाल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे या ठिकाणाला खंडोबा भक्तांसाठी अनन्यसाधारण धार्मिक महत्त्व आहे. यात्रेच्या काळात अनेक भाविक वाहनांतून तर अनेक भाविक पायी मंदिराकडे येतात. २, ३ व ४ जानेवारी रोजी सर्व मार्गांवर प्रचंड गर्दी असते व पाय ठेवायलाही जागा उरत नाही.

या पार्श्वभूमीवर मंदिराकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांची कामे यात्रेपूर्वी पूर्ण करून घ्यावीत, अशी जोरदार मागणी भाविक व यात्रेकरूंनी केली आहे.

तसेच आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनीही या प्रकरणात लक्ष घालून संबंधित ठेकेदाराकडून कामे यात्रेपूर्वी पूर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.